महाराष्ट्राचे

# शिल्पकार

# रामजोशी



RAJA BADSAL

शिरीष गंधे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# लोककवी शाहीर रामजोशी

शिरीष गंधे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रम

प्रथमावृत्ती : जून २००४
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. २३

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
प्रमोद भोगटे,
स्नेहेश प्रिंटर्स,
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-१३. (दूरध्वनी : २४९४ ५६१५)

मुखपृष्ठ : राजा बडसल
भारतीय संस्कृतिकोश, आठवा खंड
संपादक : पं. महादेवशास्त्री जोशी
— यांच्या सौजन्याने

किंमत : रु. ४५/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

## अनुक्रम

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींची साधारणतः शंभर ते सव्वाशे पानाची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती "महाराष्ट्राचे शिल्पकार" या योजनेअंतर्गत पुस्तकरुपाने प्रकाशित करण्याची मंडळाने योजना आखली असून या चरित्रग्रंथमालेतील "लोककवी शाहीर रामजोशी" हा तेविसावा चरित्रग्रंथ आहे.

शाहिरांचं मराठी कवितेला मिळालेलं योगदान विशेषत्वानं लक्षात घेण्यासारखे आहे. ज्या काळात मराठी कविता पांडित्याच्या जोखडात अडकून पडलेली होती, आध्यात्माशिवाय अथवा भक्तीशिवाय इतर विषय जिनं वर्ज्य मानलेले होते त्या काळात शाहिराने आध्यात्म्याच्या जोखडातून तिला मुक्त केले. भक्तीशिवाय अथवा आध्यात्माशिवाय इतरही विषय कवितेचे विषय होऊ शकतात हा आत्मविश्वास लोकांच्या मनात जागविला. इतकेच नव्हे तर लावणीच्या रूपानं तिला जनसामान्यांपर्यंत घेऊन जाण्याचं ऐतिहासिक कार्य केलेलं आहे. शाहिरांचं हे ऋण मराठी कवितेनं मान्य करायलाच हवे.

लोककवी शाहीर रामजोशी हा शाहिरांचा मुकूटमणी आहे आणि म्हणूनच "महाराष्ट्राचे शिल्पकार" या मंडळाच्या चरित्रग्रंथमालेअंतर्गत या शाहिरावरचा चरित्रग्रंथ प्रकाशित करण्यात मंडळाला विशेष आनंद होत आहे. प्रा. शिरीष गंधे यांनी या चरित्रग्रंथाचे लेखन समरसून तर केलेले आहेच; पण त्याशिवाय चरित्रग्रंथासाठी रूढ असलेल्या लेखन पद्धतीचा अवलंब न करता कथात्मक लेखन पद्धतीचा अवलंब केला आहे. प्रसंगाची मांडणीही अतिशय नाट्यपूर्ण रीतीने केलेली आहे. अर्थात अशा लेखन पद्धतीचा अवलंब केल्यास चरित्रग्रंथात काही त्रुटी संभवतात; पण या ग्रंथात अशा त्रुटी अभावानाच आढळतात.

कथात्मक स्वरुपाच्या लेखनाला पोषक असलेली शैली मूलतः प्रा. शिरीष गंधे यांना लाभलेली आहे. शाहीर रामजोशींच्या निधनामुळं निर्माण झालेल्या स्थितीचं खाली उद्धृत केलेलं वर्णन या संदर्भात पुरेसं बोलकं आहे, असं मला वाटतं.

> मराठी काव्यसुंदरीच्या पायातील घुंगरु निखळले, डफ अबोल झाला, वीणेचा झंकार थांबला, ढोलकीवर बंद बोल पडला. मराठी भाषेत नितांतसुंदर लावणी रचना करून, मराठी शारदेची उपासना करणारा सच्चा उपासक काळाच्या पडद्याआड गेला. पंडिती कविता आणि शाहिरी कविता यांना जोडणारा साकव कोसळून पडला. सामान्य माणसांच्या प्रेमापोटी घरातून बाहेर पडलेली पावलं अगतिक झाली तर डफावर नर्तन करणारी बोटे कायमची विसावली.

अनुक्रम

लौकिक अर्थानं शाहीर रामजोशींची बोटं भलेही विसावली असतील; पण या बोटातून झरलेली कवनं अजरामर झालेली आहेत.

**रा. रं. बोराडे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई

दिनांक : १९ मे, २००४

अनुक्रम

“शाहिरांच्या प्रतिभेस...”

अनुक्रम

# अनुक्रम


निवेदन ........ ४

❑ भाग - १ : व्यक्तित्व ❑ ........ ८

कुलवृत्तांत विद्या - व्यासंग यांची परंपरा जन्म बालपण जडणघडण इ. ........ ८

❑ भाग - २ : कर्तृत्व ❑ ........ ६०

परस्पर विरोधी प्रवृत्तींचा मनोज्ञ संगम विविध कामगिरी ........ ६०

❑ भाग - ३ ❑ ........ ७९

❑ रामजोशी यांच्या लोकप्रिय अशा काही रचना ❑ ........ ७९

❑ भाग - ४ ❑ ........ ९८

परिशिष्ट - १ ........ ९९

परिशिष्ट - २ ........ १००

परिशिष्ट) - ३ ........ १०१

परिशिष्ट - ४ ........ १०२

परिशिष्ट - ५ ........ १०३

परिशिष्ट -६ ........ १०४

परिशिष्ट - ७ ........ १०५

रामजोशी निर्देशपर लेख ........ १०६

❑ रामजोशी निर्देशपर ग्रंथसूचि ❑ ........ १०७

❑ शाहीर रामजोशी यांच्या लावणी व पोवड्यांची आकारविल्ह्यानुसार सूची ........ १११


❑❑

## ❑ भाग - १ : व्यक्तित्व ❑

कुलवृत्तांत

विद्या - व्यासंग यांची परंपरा

जन्म

बालपण

जडणघडण इ.

❑ ❑

अनुक्रम

**“किती श्रृति मनोहरा रसिक रामजोशी कृती**
**कृती न कविते तुझी करिती नूपुरें झंकृती”**

## ❑ करिती नूपुरें झंकृती

‘शाहिरांचा तुरा’, ‘कविराय’, ‘कविप्रवर’ अशा विविध संबोधनांनी ओळखले जाणारे लोकशाहीर रामजोशी हे अत्यंत मनस्वी व्यक्तिमत्व असलेले पेशवाईतील महत्त्वाचे, लोकप्रिय, तसेच राजाश्रय लाभलेले कवी होते.

एकावन्न वर्षांच्या आयुष्यात रामजोशी यांनी आपल्या नितांतसुंदर लावण्यांनी अवघा मराठी मुलुख डोलायला लावला. रामजोशी यांनी विपूल लावणीरचना केलेली असून, लावणीरचनेतील शब्दचमत्कृतीमुळे ते सामान्यांचे प्रिय तर बनलेच तथापि मराठी समीक्षकांचे कुतूहल विषयही ठरले.

कवीवर्य चंद्रशेखर म्हणतात त्याप्रमाणे रामजोशींची लेखनकृती (कविता) श्रृती मनोहर तर आहेच तथापि त्यांची कविता ही केवळ लेखन कृतीच नाही, तर या कवितारूपी लावण्यवतीने आपल्या नूपुरांचे जे झंकार मराठी मनाला ऐकवले त्यामुळे अवघे मराठी मन फार फार आनंदून गेले. मराठी रसिकता शाहीर रामजोशींची या बद्दल फार ऋणी आहे.

जवळपास दोनशे वर्षे मराठीमन कविरायांच्या कविता-सुंदरीचा नूपुरझंकार ऐकते आहे. मग ही ‘काव्यरूपी सुंदरा’ मराठी ‘मनामधी’ भरली नाही तरच नवल!

## ❑ कुलवृत्तांत

शाहीर रामजोशी यांचे संपूर्ण नाव रामचंद्र जगन्नाथ जोशी हे होय. नाथ संप्रदायाशी जवळीक असलेल्या विश्वनाथ नामक सद्‌गृहस्थांच्या कुळात रामजोशी यांचा जन्म झाला. विश्वनाथ यांना कृष्णभट नावाचा पुत्र होता, कृष्णभटांना ‘धोंडू’ आणि ‘पुतळ’ अशी दोन मुले होती. ती अनुक्रमे धोंडभट जोशी व पुतळजोशी या नावानेच प्रसिद्ध पावली. हे दोघेही बंधू वेदशास्त्रसंपन्न असून, आपली व कुलाची प्रतिष्ठा राखून होते. तत्कालीन मुसलमान धोंडभटांचा उल्लेख गंमतीने फत्तरेजोशी असा करीत. पुतळजोशी यांना संतती झाली नाही. धोंडभटांचा वंश पुढे चालून त्यांना बाळकृष्ण नामक पुत्र झाला.

बाळकृष्णाला महादेवभट, विठ्ठलभट, गोविंद आणि काशिनाथ अशी चार अपत्ये झाली. पैकी काशिनाथ यांना जगन्नाथ व अनंत तथा आंतोबा अशी दोन अपत्ये झाली. जगन्नाथ हेच रामजोशी यांचे वडील होत.

हे जोशी घराणे मूळचे सोलापूर जवळील तासे या गावचे. तथापि जोशी घराण्यात चालत आलेली जोशीपणाची वृत्ती तत्कालीन मुसलमान राजाकडून त्यांना प्राप्त झाल्यावर, हे घराणे सोलापूरी दाखल झाले.

सोलापूर हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असून, सोलापूर याचा अर्थ सोळा गावे असा होतो. शहर समुद्रसपाटीपासून १८०० फूट उंच असून सीना नदीच्या अदिला फाट्यावर वसलेले आहे. येथे एक जुनाट किल्ला आहे. शहराभोवती अडीच मैल लांबीचा कोट आहे. येथे मुख्य व्यापार कापसाचा आहे. येथे गिरण्याही बऱ्याच आहेत. १८५३ मध्ये नगरपालिका अस्तित्वात आली. इ. स. १८७९-८१ या अवधीत लक्षावधी रुपये खर्च करून एकरूक तलावाचे पाणी गावास पुरविण्याची व्यवस्था केली आहे. सिध्देश्वर तलावातील सिद्धेश्वराचे देऊळ प्राचीन व प्रेक्षणीय आहे. याशिवाय दत्तात्रेय, पांडुरंग, मल्लिकार्जून इत्यादी दुसरी देवळे ही आहेत. सोलापूर हे पूर्वीपासून बहुभाषिकांचे गाव म्हणून ओळखले जाते. वर्षानुवर्षे हे बहुभाषिकांचे गाव गुण्यागोविंदाने नांदते आहे.

असो. जोशीपणाच्या वृत्तीमुळे जोशी हे पुढे उपनाम बनले. सोलापूरला आल्यानंतर तेथील मातीशी, परंपरांशी जोशी घराणे एकरूप होऊन गेले. इतके की, रामजोशींचा उल्लेख 'रामजोशी सोलापूरकर' किंवा 'सोलापूरकर-कवी' असा होऊ लागला. रामजोशींच्या घराण्यातील पूर्वज हे संस्कृतभाषाभिमानी, संस्कृत पंडित असल्याने हे जोशी घराणे सोलापूरातील सुसंस्कृत, प्रतिष्ठित असे घराणे म्हणून प्रसिद्ध पावले.

### ❑ विद्या आणि व्यासंग यांची परंपरा

रामजोशी यांचे वडील जगन्नाथ आणि चुलते अनंत जोशी हे सोलापूरातील अत्यंत विद्याप्रेमी आणि विद्याव्यासंगी गृहस्थ म्हणून प्रख्यात होते. पेशवेदरबारात या दोघांचे चांगले वजन होते. बाळाजी बाजीराव तथा नानासाहेब पेशवे यांनी 'ज्योतिष विश्व', 'अतिनिपुण' आणि 'सिद्धांत वक्ते' या शब्दांनी जगन्नाथ जोशींना गौरविले होते.

आपले वक्तृत्व आणि विद्याव्यासंग या बळावर जनसामान्यात अत्यंत आदराचे स्थान उभय बंधूंनी मिळविले होते. ज्योतिष सांगणे आणि कीर्तन माध्यमातून प्रबोधन करणे हा त्यांचा पेशा होऊन गेला. इ. स. १७५८ या वर्षी नानासाहेब पेशव्यांनी पुणे मुक्कामी एका सनदेद्वारे या दोघांना तीस बिघे जमीन इनाम म्हणून बहाल केली.

अनुक्रम

सोलापूरातील प्राचीन विठ्ठल मंदिरात रोजची पूजाअर्चा करणे हे काम जोशी घराण्यात पूर्वापार चालत आलेले होते. या मंदिरात जगन्नाथ शास्त्रींची कथा-कीर्तने होत असत. विठ्ठल मंदिराची देखभाल नि विठ्ठलाची पूजाअर्चा यामुळे पूजारी असेही एक उपनाम जोशी नामाबरोबर येऊन मिळाले. अशा रितीने संपन्नता आणि सुसंस्कृतता, विद्या आणि व्यासंग यांची एक भक्कम परंपरा रामजोशींच्या मागे असलेली दिसते.

रामजोशींना सोलापूरविषयी किती अभिमान होता हे पुढील ओळी वाचतांना लक्षात येते.

> "पाय धरिल कविराय दुजा अशी काय लावणी करी
> माय कुणाची व्याली या गगनाखाली कविता सोलापूरी"

**❑ जन्म व बालपण**

वेदशास्त्रसंपन्न, बहुश्रुतविद्वान जगन्नाथशास्त्री यांच्या कुळात इ.स. १७६२ मध्ये रामजोशी यांचा जन्म झाला. सुसंस्कृत आणि संपन्न घराण्यात जन्माला येणं, हा एक योगायोग म्हणावा लागेल. नियतीने हा योग रामजोशींच्या भाळी लिहिला असावा. जगन्नाथशास्त्रींना दोन अपत्ये झाली. मोठा मुलगा मुद्‌गल आणि लहान मुलगा म्हणजे आपले चरित्रनायक राम तथा रामजोशी हे होत. संस्कार आणि संपन्नता हातात हात घालून जोशी कुलावर प्रसन्नता उधळीत होती. साहजिकच रामचा बालपणीचा काळ अत्यंत सुख-समाधानात गेला. विद्याभ्यासात त्याचे अजिबात लक्ष नव्हते.

संपन्नतेमुळे रामची शारीरिक आणि मानसिक वाढ मोकळेपणाने झाली असल्यास नवल नाही. कुठलीही चिंता व समस्या नाही. असल्यास घरातील वडीलधारी मंडळी ती सोडविण्यास समर्थ असल्याने, रामला चार मित्र जमवून हुंदडायला भरपूर वेळ मिळू लागला.

रामचे घराणे वैदिक शास्त्री, पंडितांचे असल्याने, नित्य होमहवन, व्रतवैकल्य, सणवार यात कुटुंबियांचा वेळ जात असे. याच्या जोडीला पै-पाहुण्यांची वर्दळही असेच. यामुळे रामवर खास नजर ठेवणारे असे कोणी कुटुंबात नव्हते. नाही म्हणायला रामचा मोठा भाऊ मुद्‌गल अधून-मधून रामला दटावित असे. रामने चार पोरे टोरे जमवून घराबाहेर वेळ घालवणे मुद्‌गलला खटकत असे. मुद्‌गल वृत्तीने गंभीर, अभ्यासु, घराण्याचा नावलौकिक, प्रतिष्ठा यांचे भान असलेला मुलगा होता तर राम हा मुळातच स्वच्छंदी वृत्तीचा. दोन्ही भावात वयाचे अंतरही पुष्कळच होते. मुद्‌गल शास्त्री विवाहित होता. रामला बालपणीच मातृवियोग सहन करावा लागला. यानंतर कालांतराने त्याचे पितृछत्रही हरपले. जात्याच बुद्धीमान असलेला राम मातृसुखाला तर मुकला होताच आणि आता वडिलांच्या मृत्यूनंतर तो काहीसा एकाकी पडून सैरभर झाला. अशा कठीण प्रसंगात ज्येष्ठबंधू मुद्‌गल आणि त्याची पत्नी गंगाबाई यांनी रामला मातापित्यांचे प्रेम दिले. रामवर या

उभयतांचे मनस्वी प्रेम होते. रामच्या स्वच्छंदीपणाला आवर घालतांना दोघा पती-पत्नीची चांगलीच तारांबळ उडत असे.

**❑ मनस्वी राम**

दिवे लागणीची वेळ झाली तरी रामचा घरी पत्ता नव्हता. गंगाबाईंना काळजी वाटू लागली. त्यांनी भराभर दिवे लावले. देवाजवळ समई लावली. मुद्‌गलशास्त्रींचे संध्यावंदन सुरू झाले. अवचित कुठूनतरी राम येऊन घाईघाईनेच पाठमोऱ्या दादाजवळ बसला. त्याला पाय धुवायचे भानही राहीले नाही. गंगाबाईंनी चमकून त्याच्याकडे पाहिले. रामने ओशाळून खाली मान घातली. मुद्‌गलशास्त्रींचा धीरगंभीर स्वर घरभर घुमला.

> "ॐ आपः पुनन्तु पृथिवीं पृथिवी पूता पुनातु माम्
> पुनन्तु ब्रह्मणस्पतिर्ब्रह्मपूता पुनातु माम् यदुच्छिष्टम-
> -भोज्यंच यद्वादुश्वरितं मम सर्व पुनन्तु मामापोऽ -
> -सतांच प्रतिग्रहँ स्वाहा"

संध्यावंदनानंतर मुद्‌गलशास्त्रींनी आरती केली. मंत्रपुष्पांजली म्हणतांना त्यांचा अनुनासिक स्पष्ट उच्चार वातावरणात एक वेगळीच रंगत भरत चालला. रामला मंत्रपुष्पांजलीतील शब्दांची लय खूप आवडे. शब्दांचा अर्थ त्याला माहित नव्हता आणि तो माहीत करून घेण्याची त्याला आवश्यकताही वाटत नव्हती. रंग, रूप, रस, गंध आणि नाद यांनी नादावण्याच्या वयात त्याचे एकेक पाऊल पडत होते.

"अविक्षितस्य कामप्रेविश्वदेव : सभासद इति" झाले. रामने ओंजळभर फुले देवावर उधळली. त्या फुलांच्या सुगंधाने सारा देव्हारा न्हाऊन निघाला. समईतील वात सारून मुद्‌गलशास्त्री बैठकीत जाऊन बसले. गंगाबाई स्वयंपाकाच्या तयारीला लागल्या. संध्यावंदनानंतर वडिलधाऱ्यांना नमस्कार करण्याच्या रिवाजनुसार राम बैठकीत आला. दादाला घाईघाईत नमस्कार करून तो वळणार इतक्यात-

"थांब राम" मुद्‌गलशास्त्रींचा आवाज बैठक खोलीभर चांगलाच घुमला.

"राम, गेले चार दिवस मी बघतोय संध्यावंदनानंतर कधीतरी तू येऊन बसतोस. वेळ पाळत नाहीस. कुठे असतोस? आणि हा काय अवतार करून घेतलाहेस?"

राम काहीच न बोलता खाली मान घालून स्तब्ध उभा होता.

"काय म्हणतोय मी? जरा आपल्या कुळाचा अभिमान बाळगा. कुळाला बट्टा लावणार आहेस का अशा वागण्याने? उठ-सूठ लुंग्या-सुंग्या पोरांना घेऊन वेळ वाया घालवतोस, त्यापेक्षा

काही पाठांतर म्हणायला शिका." रामने कोणतेच प्रत्युत्तर न देता नुसती होकारार्थी मान हलवली. इतक्यात गंगाबाईंनी जेवायला हाक दिली आणि रामने सुटकेचा निश्वास सोडला.

जेवतांना दोघे भाऊ एकत्र जेवायला बसत. मात्र मुद्गलशास्त्री जेवतांना एकही शब्द बोलत नसत. सारा मामला खुणेचा. आजही ते गप्पच होते. जेवण उरकल्यावर त्यांची शतपावली सुरू झाली. शतपावली करतांना मनातल्या मनात संस्कृत धातूरुपावलीचा पाठ सुरू होता. हा त्यांचा नित्यक्रम होता. थोड्यावेळाने ते झोपायला निघून गेले. गंगाबाई मागचे आवरून झोपण्याच्या तयारीला लागल्या. रामने कसेतरी जेवण उरकले. लवकर झोपून लवकर उठण्याची घराची परंपरा रामला अगदी न मानवणारी होती. सकाळी लवकर उठतांना त्याला या साऱ्याचा कंटाळाच नाही तर रागही येईल. रामने पाहिले वहीनीपण गेली. तो बैठकीच्या खोलीला लागून असलेल्या मेघडंबरीत आला. दूरवर काळोखाचे साम्राज्य पसरले होते. मधूनच लुकलुकणारा एकादा दिवा सोडला तर बाकी काजळी रात्र. लांबवर मंदिरात चाललेल्या भजनाचा क्षीण स्वर त्याला अस्वस्थ करत होता. राम कितीतरी वेळ तिथेच उभा होता नि अचानक 'तत्'तीना तिरकिट धीनगीन धागेन धा तिरकिट' ढोलकीचा स्वर त्याच्या कानावर आदळला. रामला मनस्वी आनंद झाला. ज्या क्षणाची तो वाट पाहात होता. तोच हा क्षण. रामने एकवार चाहूल घेतली. दादा, वहिनी गाढ झोपलेले पाहून तो हळूच मुख्य दरवाज्यापाशी आला. दरवाजाचा कडी अडसर हळूच काढून, त्याने दरवाजा उघडला. आणि धूम ठोकली ती धोंडी कडे. रामच्या घरासमोरच काही अंतरावर धोंडी शाहिराचा तमाशाचा फड होता. या धोंडीवर रामचा फार जीव. आणि धोंडीला तर रामशिवाय करमतच नसे.

धोंडी शाहिराचा तमाशा सोलापूरात चांगलाच नावारूपाला येत चालला होता. रामला या ढोलकीच्या नादाने चांगलेच नादाला लावले होते. दिवस रात्र धोंडीच्या फडावर कवने ऐकत पडायचे हाच एक छंद रामने जोपासला होता. धोंडी शिवभक्त होता. त्याच्या कवनातील शब्दरचना रामला फार आवडे. राम धोंडीच्या फडावर आला तेव्हा धोंडी तल्लीनतेने गात होता...

> "पृथ्वीचं केलं ताट, चंद्र सूर्याच्या केल्या ज्योती
> पार्वती शंकराला ओवाळायला उभी राहिली तेव्हा
> उभी कुठे होती?"

बाकीचे सुरत्ये धोंडीला मनापासून साद देत होते.

"मी सांगतो..." रामचा खणखणीत आवाज चांगलाच घुमला. सारे जण आवाजाच्या दिशेने पाहात राहिले.

"मी सांगतो, पार्वती मेरू पर्वतावर उभी होती.." राम आत येता येता म्हणाला मात्र... धोंडीने रामला मिठीच मारली. रामच्या तल्लख बुद्धीचे त्याला फार कौतुक वाटले. फडावर कवनांची आतशबाजी सुरू झाली. तेव्हा वर आभाळात नवमीचा चंद्र हळूच हजेरी लावत होता.

अनुक्रम

❑ **रामचा व्रतबंध संस्कार**

गंगाबाईंनी सूर्यदर्शनासाठी वाड्याचा दरवाजा किलकिला केला मात्र, पहाट वाऱ्याने लडिवाळपणाने आणलेली परिजाती झुळूक हलकेच त्यांच्या पदरात ओतली. गंगाबाई सुखावल्या. मुद्‌गलशास्त्री स्नान करून, सोवळं नेसून अग्निहोत्रासाठी तयार होऊन आले, तरी त्या दरवाजातच उभ्या होत्या. राम पहाटे केव्हातरी गुपचूप येऊन झोपला. पण कडीअडसर लावायचे भानही त्याला राहिले नाही. हे लक्षांत येताच त्यांची काळजी वाढली. ‘काय म्हणावे या रामला? का असा वागतो? ही गोष्ट जर यांना कळली तर...’

“सूर्याय स्वाहा... सूर्याय इदं न मम्...” मुद्‌गलशास्त्रींच्या आवाजाने त्या केवढ्याने दचकल्या. स्वतःला सावरीत त्यांनी सूर्यदर्शन केले नि त्या सकाळच्या कामाला लागल्या.

मुद्‌गलशास्त्रींची अन्हिके आटोपल्यानंतर ते बैठकीच्या खोलीत येऊन बसले. गेले कितीतरी दिवस त्यांच्या मनात कालिदासाच्या रघुवंशावर आधारित संस्कृत काव्यग्रंथ करण्याचे मनात होते.

आज श्रावणी सोमवार. आजच प्रारंभ केला तर? मुद्‌गलशास्त्रींनी जवळची संदूक उघडली. त्यातून बोरू काढून, ते बोरू साळू लागले. समोरच्या गवाक्षातून उन्हाचा एक छान कवडसा त्यांच्या चेहऱ्यावर पडून त्यांचा चेहरा उजळून निघाला. बोरू साळून झाल्यावर त्यांनी संदूकीतून खर्डे काढले. खर्डे व्यवस्थित जुळवून त्यांनी टपोऱ्या अक्षरात सुरूवात केली ॥ ॐ स्वस्ति श्रीगणेशाय नमः ॥

गंगाबाईंनी फुलपात्रात त्यांच्यासाठी दूध आणले आणि थाळीत ओतून त्या थांबल्या मुद्‌गलशास्त्रींचे त्यांच्याकडे लक्ष जाताच त्या म्हणाल्या-

“एक विचारायचे होते.”
“दिवटे रामभट उठले नाहीत वाटते...”
“नाही अजून, आताच हलवून आले त्याला..”
“त्याचा काय उपयोग? चांगले कासंडीभर पाणी ओता.”

“मी काय म्हणते, रामला आता आठवे वर्ष लागले, त्याचा व्रतबंधसंस्कार उरकून टाकावासे वाटते. त्याने तरी त्याच्या वागण्यात फरक पडेल.”

“तुम्ही भोळ्या आहात. त्या कुलांगाराला कसला फरक पडतोय.”

"तरीपण विचार केला पाहिजेच. आठवे वर्ष सरले म्हणजे नसता लोकापवाद यायचा." थाळी, फुलपात्र गंगाबाईंच्या हाती देत मुद्‌गलशास्त्री पुन्हा एकदा लेखनाकडे वळले.

"मग लवकरच मुहूर्त काढून टाका." म्हणत गंगाबाई माजघराकडे वळल्या.

यशावकाश एका शुभ मुहूर्तावर रामचा व्रतबंधसंस्कार संपन्न झाला. सारा वाडा आप्तस्वकियांनी भरून गेला. रामला हे सारे संस्कार आणि सोहळे अत्याचार वाटत होते. पण नाईलाजनेच त्याने सारे सोपस्कार पार पाडले.

**❑ धोंडीच्या फडावर पुन्हा एकदा**

रामला योग्य वळण लावण्यासाठी त्याचा व्रतबंधसंस्कार मुद्‌गलशास्त्रींनी केला. परंतु राम काहीसा नाराजच होता. आता दररोज संध्यावंदन आणि गायत्रीमंत्राचा जप आपल्याला करावा लागणार या कल्पनेनेच राम बेचैन झाला. त्याला या साऱ्या बंधनांचा तिटकारा वाटू लागला. छान मानेपर्यंत रूळणारे कुरळे केस एका झटक्यासरशी काढून, आपला तुळतुळीत गोटा करणाऱ्या शिवाबद्दल आणि त्याला हे करायला सांगणाऱ्या आपल्या दादाबद्दल त्यांच्या मनात कमालीचा संताप उफाळून आला.

मुद्‌गलशास्त्रींच्या चाहुलीने त्याने संध्यावंदनाचे नाटक सुरू केले. अखेर नाटक ते नाटकच. मुद्‌गलशास्त्री काही न बोलता बैठकीत निघून गेले. गंगाबाईंनी देवाजवळ तेलवात केली आणि त्या निघून गेल्या. जेवणं उरकल्यानंतर नेहमीप्रमाणे जोशीवाड्यात सामसूम झाली. बाहेर श्रावणसरीचा आवाज तेवढा शांततेचा भंग करीत होता. सोलापूर गाव निद्रिस्त झाले. फक्त धोंडीच्या फडावर तेवढी जाग होती. सोलापूरात अलीकडे कलगीतुऱ्याचे सामने चांगलेच रंगू लागले होते. तुरेवाले शिवोपासक तर कलगीवाले शक्तीचे उपासक त्यांच्यात रंगतदार स्पर्धा होत. धोंडी हा तुरा पक्षाचा शाहीर होता.

रात्रीच्या पहिल्याप्रहरी राम नेहमीप्रमाणे फडावर आला. व्रतबंधसंस्काराच्या सोहळ्यात अडकल्यामुळे त्याला दोनतीन दिवस घरातून बाहेर पडता आले नव्हते. राम फडावर पोहचला तेव्हा शंकर सुरत्या ढोलकीची ओढ काढत होता. रामला पाहताच सगळ्यांनी त्याला घेरले.

"अरे, ह्यो बघा ढाल्या तबला." शंकर फिदीफिदी हसत म्हणाला.

"पण हा ढाल्या आपल्या सुरात लागलाय नव्हं?" पांड्या रामच्या तुळतुळीत डोक्यावर हात फिरवत म्हणाला.

इतक्यात, धोंडीला राहवले नाही. तो रामजवळ आला नि त्याच्या तुळतुळीत डोक्यावर हात हापटत त्याने “तिरकिट धाकत् धाकत् धा...” अशी बेदम तिहाई वाजवली. राम वैतागून सगळ्यांवर खेकसला तसे सारे शांत झाले. रामची समजूत काढत धोंडी म्हणाला—

“हे बघ रामा, नाग्या शाहिराची आपल्याला चांगली जिरवायची आहे. तुझी साथ हवी आहे. मग डोक्यात राख घालून काय उपेग? काय म्हणतो मी? आलं का टाळक्यात?”

रामने एकवार धोंडीकडे पाहिले. आणि त्या टोळक्यात तो रंगून गेला. आता प्रत्येक रात्र या टोळक्यात रंगवायची त्याने मनाशी पक्के केले. त्याला दादा वहिनीवर जणू सूडच उगवायचा होता.

❑ **बंडखोर राम**

श्रावणमास असल्याने सारे सोलापूर शिवमय झाले असल्यास नवल नव्हते. सिद्धेश्वराला भल्या पहाटपासून अभिषेक करणाऱ्यांची ही गर्दी उसळे. सोलापूर हे शैव आणि शाक्त उपासकांचे माहेर घरच जणू! बाराव्या शतकापासून शैवपंथीयांचे हे तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. प्राचीन काळी इथे एक शक्तीपीठही होते. सिद्धेश्वर तर सोलापूरचे प्राणतत्त्व. याशिवाय नाथपरंपरेतील सिद्धांचे श्रीनाथमठ आणि सिद्धनाथमठ या दोन मठांमुळे सोलापूरच्या सांस्कृतिक वैभवात भरच पडलेली.

श्रावण भाद्रपदातला प्रत्येक दिवस पवित्र, सणावाराचा, व्रतवैकल्यांची. धामधुम असणारा असल्याने साऱ्या सोलापूरात, घराघरात चैतन्याचा बागा फुललेल्या असत. जोशी घराणे तर वैदिक शास्त्री पंडितांचे. गंगाबाई आणि मुद्गल शास्त्री यांचा दिवस भल्या पहाटे सुरू होई. दिवसभर मग त्यात्या दिवसाची व्रते, उद्यापने, याने सारा दिवस धामधुमीचा जाई. दिवसभराच्या श्रमाने कधी एकदा जमिनीला पाठ लागेल असे गंगाबाईंना होऊन जाई. मुद्गलशास्त्रींची दिनचर्या तर अतिशय काटेकोर! त्यात जरा इकडे तिकडे झालेले त्यांना खपत नसे. त्यामुळे दोघेही पतीपत्नी लवकर निद्रेच्या आधीन होत.

नेमकी हीच वेळ रामने अचूक हेरली होती. आता तर त्याला आयतीच संधी मिळाली. व्रतबंधन संस्कारामुळे काहीश्या चिडलेल्या रामने मनाशी पक्के ठरवून टाकले, सारी बंधने झुगारायची. बस्स! आता आयुष्यात एकच व्रत चालवायचे ते म्हणजे धोंडीची संगत. कवने ऐकायची, कवने रचायची हीच आपली संध्या आणि हीच आपली गायत्री, त्यामुळे दिवस म्हणू नये, रात्र म्हणू नये. राम अष्टौप्रहर धोंडीच्या फडावर काढू लागला. कित्येकदा तिकडेच दोन घास गिळू लागला.

रामचे हे स्वैरवर्तन पाहून गंगाबाई काळजीने पुरत्या खचून गेल्या. मुद्‌गलशास्त्रींच्या चाणाक्ष नजरेने रामचे हे हे बेताल वर्तन केव्हाच टिपले होते. दिवस भराभर चालले होते.

मजबूत हाडापेराचा नि गौरवर्णाचा राम आता सोळाव्या वर्षात पर्दापण करीत होता. नुकत्याच मिसरूड फुटलेल्या या पोराला कसे आवरावे याची चिंता दोघा पतीपत्नीला सतावू लागली. मुद्‌गलशास्त्री शिस्तीचे भोक्ते नि काहीसे तापट स्वभावाचे होते. रामशी त्यांचे वारंवार खटके उडू लागले. राम कोणतेच प्रत्युत्तर न देता दादाची बोलणी ऐकून घेई. मात्र करणीला चुकत नसे. गंगाबाई आपले दुःख जगदंबेजवळ व्यक्त करीत.

**❑ स्वच्छंदी राम**

धोंडीच्या फडावर रामची नित्य उठबस सुरू झाली. धोंडीच्या फडावर त्याला कुणाला घाबरण्याचे कारण नव्हते. मुक्त स्वच्छंदी जीवनाचा रामचा पहिला अध्याय इथे सुरू झाला. थोंडीच्या फडातील साथीदारांना गांजा, तमाखुचे सेवन केल्याशिवाय साथ संगतीला रंग भरता येत नाही, हे सारे तो उघड्या डोळ्यांनी पाहात होता. शंकर आणि पांड्याला चिलीम भरून देतांना, तमाखू चोळून देतांना कधी कधी कुतूहलाने एखादा झुरका मारून पाहात होता. तर कधी तमाखूची चिमूट अलगद तोंडात सोडून डफावर थाप देतांना, नकळत काहीबाही गुनगुनत होता.

बालपणापासून संस्कारांच्या चौकटीत वाढलेला राम त्या संस्कार चौकटीत आता मावेनासा झाला, तरी बालपणी घरात ऐकलेल्या विविध संस्कारक्षम गोष्टी, कहाण्या, आरत्या, भूपाळ्या, संस्कृतस्तोत्रे ती म्हणण्याची विशिष्ट पद्धती, मंत्रजागर, त्याची लय आणि मुद्‌गलशास्त्रीसारख्या व्युत्पन्न कवी असलेल्या, ज्येष्ठ बंधूचा लेखन प्रपंच, वेळोवेळी घरात झडलेल्या शास्त्री पंडितांच्या मैफलीतील ज्ञानचर्चा, काव्यचर्चा यातून रामच्या मनात काव्यनिर्मितीची ज्योत तेवू लागली. राम जरूर स्वच्छंदी होता पण या बरोबरच त्याचे निरीक्षणही अफाट होते.

आजुबाजुला असलेले माणसांचे असंख्य नमूने - राग, लोभ, रूसवे, फुगवे यातच गुरफटलेले तो बघत होता. पंथा-पंथातील संघर्ष, स्त्रीपुरुष संबंध, नात्यातील तणाव तो तटस्थपणे अनुभवत होता. संस्कारांच्या चौकटीत उभे आयुष्य काढणाऱ्या गंगावहिनी सारख्या असंख्य स्त्रिया जशा त्याच्या समोर होत्या, त्याचप्रमाणे पती युद्धावर गेल्याने त्याच्या आठवाने व्याकूळ होणाऱ्या विरहिणीही तो बघतच होता. इतकेच नव्हे त परपुरुषाशी चोरून संबंध ठेवणाऱ्या स्वैरिणीही आजुबाजुला वावरतांना तो पाहात होता.

व्रतवैकल्ये, उपासतापास, नवससायास, मुहूर्त, दाने यात अडकून पडलेल्या समाजाचा राम हा एक प्रतिनिधी होता. त्यामुळेच एका बाजूला स्वच्छंदी जगण्याची ओढ असलेल्या रामच्या मनात कधीतरी घरातील संस्कारांची विद्युल्लता चमकून जायची. आणि मग तो विलक्षण अस्वस्थ

व्हायचा. त्याची प्रचंड घुसमट व्हायची. आपल्याला नेमके काय हवे आहे? स्वच्छंदी जीवन की, संस्कारांची चौकट असलेले जीवन? राम गोंधळून जायचा. मग किती किती वेळ नुसताच शून्यमनस्क बसून राहायचा. आजही कितीतरी वेळ राम नुसताच गुढघ्यात मान घालून बसला होता. अचानक त्याच्या कानावर ढोलकीचे स्वर आदळले.

शंकर ढोलकी घुमवू लागला. धा धिंऽ धा धा धिंऽ ता तिंऽ धा धा धिंऽ मध्य लयीतल्या त्या दीपचंदीने राम एकदम अस्वस्थ झाला. रस्त्यावरून येणारा जाणारा ढोलकीच्या आवाजाने मान वेळावून पाहात पाहात जाई. रामने पाहिले वतनदार देशपांड्याची उमा लगबगीने रस्त्यावरून जाता जाता दिसेनाशीही झाली. तो गुनगुनु लागला.

“पाहून सख्या मी भुललो रमलो अघटित करणी ब्रह्माची
नार नवी तरणी काय सांगू रमणी जशी नागीण देवाघरची
पटपट तिची गती पाहुनी मी झटपट गति विसरलो उदमाची
तटतट उरावरी लटपट हार करी जसी काय पुतळी कनकाची.”

**❑ संगीत साधक**

शंकरची ढोलकी ऐकतांना श्रोता कसाही असो, भान हरपून जायचा. रामला त्याची ढोलकी घुमू लागली की, काहीच सूचत नसे. ढोलकीवर शंकरची थाप पडली की, तो कमालीचा अस्वस्थ होई. त्याच्या पोटात गलबलून येई. कित्येकदा तर त्याची भावसमाधी लागून त्याच्या डोळ्यात पाणी जमा होई. कुठे शिकला असेल हा? याचा गुरु कोण? केव्हा शिकला हा इतकी सुंदर कला? असंख्य प्रश्नांचे मोहोळ त्याच्या मनात तयार होई आणि इतकी कला अवगत असून, हा इतका साधा-भोळा कसा राहिला, याचे त्याला विलक्षण आश्चर्य वाटे. ही कला आपल्याला शिकता येईल? शंकर शिकवेल आपल्याला?

“ता तिरकिट धाऽ” शंकरने आपल्याच तंद्रीत असलेल्या रामच्या कानाजवळ ढोलकी नेऊन एक बोल काढला खरा, राम केवढ्याने दचकला! शंकरची नि त्याची डोळा भेट झाली मात्र—

“राम...”
“अंऽ काय?”
“राम तुझ्या डोळ्यात पानी?”
“अं, नाही... ते”
“राम खरं सांगनार का नाय?”

शंकरच्या आवाजातली जरब ओळखून, रामने चमकून त्याच्याकडे पाहिले. त्याच्याशी आपले मन मोकळे करताना रामने आपल्या मनातली इच्छा त्याला सांगितली.

अनुक्रम

“आरं— देवा एवढंच व्हय, जमतं... जमतं.”

मग रामच्या डोळ्यात आतुरता वाढत चालली पाहून, शंकर पुन्हा उसन्या रागाने म्हणाला—

“नाय जमत खेळ!”
“कायऽ?” राम जवळजवळ ओरडलाच.
“यवढं आरडायला काय झालं? सांगितलं ना, जमत नाय म्हून.”
“अरे, पण का?”
“का म्हंजी... काय गुरुदकसिनाचं बोलणार का नाय?”

“आंऽऽ”, रामचे डोळे विस्फारले. दोघांची डोळाभेट झाली. दोघेही हसले. अंतरीची खूण एकमेकांना पटली. रामने शंकरची शार्गिदी स्वीकारली. या दिवसापासून शंकरकडून तालशास्त्राचे नियमित धडे गिरवायला रामने प्रारंभ केला.

रामची बोटे लांबसडक होती. त्यामुळे अनवट बोल काढतांनाही त्याला ते सहज जमे. शंकर मनस्वी कलावंत होता. गांजा, तमाखु, दारू सारी व्यसने करणारा छांदिष्ट होता. पण आपल्या कलेशी इमान राखणारा होता. रामला ढोलकीची ओढ कशी काढायची इथपासून ते सारे तुकडे, मुखडे, प्रचलित-अप्रचलित बोल शंकरने शिकवले. अट एकच शंकरचे सारे छंद पुरे करण्यासाठी लागणारा पैसा रामने पुरवायचा.

रामही कोणती खळखळ न करता शंकरची मागणी पूर्ण करू लागला. शंकरच्या व्यसनाभर पैसा उधळू लागला. अशा रितीने रामची संगीत साधना सुरू राहिली. शंकरने रामकडून चांगली तालीम करवून घेतली. साथसंगत कशी करायची, वादनात माधुर्य, रंजकता कशी आणायची याची संथा रामने शंकरकडून घेऊन वादन कलेत चांगलेच प्राविण्य मिळविले.

**❑ धोंडीचे गूढ/कलगीतुऱ्याचे कोडे**

रामचा आत्मविश्वास आता वाढला. आपण आता साथसंगत करू शकतो या कल्पनेने तो कल्पनेने तो सुखावला. पण एक गोष्ट त्याच्या लक्षात येईना, की धोंडी अलिकडे आपल्याच तंद्रीत असतो, काही बोलायला जावे तर धड बोलतही नाही. रात्रीही कधी एकटाच साऱ्यांना तालीम करायला सांगून, बाहेर पडतो. सकाळ उजेडेपर्यंत येत नाही. कुठे जातो? काय करतो? काय चाललंय याच्या मनात? राम या विचाराने बेचैन होई. त्याने एकदोघांना विचारलेही पण त्याला समाधानकारक उत्तर मात्र कोणीच दिले नाही.

रामने मनाशी ठरवले, आता सरळ धोंडीलाच विचारावे. एका पहाटे तो योग जुळून आला. फडावर तोंडावरून पांघरूण घेतलेल्या रामला जाग आली तीच मुळी कोणाच्या तरी बोलण्याने.

त्याने तोंडावरील पांघरूण बाजूला केले. साऱ्या खोलीभर प्रकाश पसरलेला त्याला दिसला. हिलाल कुणी पेटवला? दिसतं तर कुणीच नाही. आवाज तेवढा ऐकू येतोय. राम घाईने अंथरूणात उठून बसून पाहू लागला. उशाशी असलेल्या कोपऱ्यात त्याला दिसले. धोंडी डोळे मिटून बसलेला. तोंडाने ॐ नमः शिवाय चा जप चाललेला. पुढ्यात डफ ठेवलेला. त्यावर हळदकुंकू, फुले वाहिलेली. राम ते दृश्य पाहून चांगलाच हादरला. कारण धोंडीचे असे रुप त्याने आजवर कधीच पाहिले नव्हते. त्याच्या मनातले कुतूहल अधिकच वाढले. धोंडीच्या पूजेत व्यत्यय नको म्हणून तो तसाच अंथरूणात बसून राहिला. धोंडीची पूजा संपली. त्याने पाहिले राम जागा आहे. दोघांची डोळाभेट झाली. बाकीच्या मंडळींची साखरझोप चालू होती. रामला क्षणभर काय बोलावे तेच सूचेना. धोंडी उठून त्याच्याजवळ आला.

“काय पायलसं? काय समजलास?”

“धोंडी, मला काहीच समजत नाही. हे सारं काय आहे?”

“येड घिऊन पेड गावाला जाऊ नका बामणबुवा, शास्तर तर तुमालाच आमच्यापेक्षा जास्त ठावं हाये की!”

“ते शास्त्रबिस्त्र जाऊ दे सगळं, तू सरळ सांगणारहेस की...”
“तूला काय कळलं?”
“काहीच नाही.”
“खरं म्हणतूंयस?”
“अगदी खरे, शपथ तुझ्या गळ्याची!”

धोंडीने रामच्या डोळ्यात रोखून पाहिले. रामला तोंड धुवून यायला सांगून तो शंकर, पांड्याला उठवू लागला. राम तोंड धुवून, धोंडीजवळ येऊन बसला. कोपऱ्यातली ती पूजा पाहून त्याला प्रसन्न वाटले. चाफ्याची फुलावळ आणि बेलाची पाने याने डफ अर्धाअधिक झाकून गेला होता.

“राम, ही शंकराची पूजा आहे.”
“म्हणजे? आणि तू...?”

“राम आपण तुरा पक्षाचे. आपण जी कवनं गातो ती भगवान शंकराची, त्याला स्मरून गातो. आन् बाकीचे गात्यात ती कलगीची कवनं.”

“कलगीची कवने म्हणजे?”
“म्हंजे देवीची कवनं, शक्तीची कवनं.”

अनुक्रम

“म्हणजे मी कलगीवाला असेच ना? कारण आमच्या घरात पूर्वीपासून जगदंबेची पूजा चालत आली आहे.”

“काय म्हनलास?” धोंडी जवळ जवळ किंचाळलाच.
—रामने पाहिले धोंडीच्या चेहऱ्यावर संताप स्पष्ट दिसत होता.

“राम.. जे बोललास ते बोलला. माघारी असं बोलू नको. आपण शिवाचे पूजारी. शक्ती म्हंजी माया. शिव मूळ आहे. माया नव्हं.”

“अरे पण?”

“राम, दुनियेतली समदी शक्ती शिवालाच आखरीस जाऊन मिळते. शिवशंकरच दुनियेचा आधार हाये. आपण करून राह्यलोय ते एका परीनं एकदम बरूबर हाये. कारण, आपण मूळालाच पकडलंय. मूळाशिवाय फुलाला काय किंमत. ते कलगीवाले फुलागत हायेत. समदी फुलाला तेवढे भुलतात. पण मुळाच्या आधारावर फुल टिकून असतं. आणि टेच मात्र सवताचीच मिरवतंय. म्हून सांगतो, कलगीची कवनं नाय तर, तुऱ्याची कवनं हीच आपली वळख. ते बाकीचं फोलकट इसरून जा!”

—राम आश्चर्याने धोंडीकडे पाहातच राहीला. सोप्या शब्दात त्याने सांगितलेलं शिवशक्तीचे तत्त्वज्ञान कुणालाही आश्चर्य वाटायला लावणारे असेच होते.

—धोंडी पुन्हा रामकडे वळून म्हणाला—
“राम, आपल्या तुऱ्याला येश मिळावं अन् बरकत राहावी म्हून मी रातच्याला बाहीर जातो.”

“आणि काय करतोस?”
“तुला नसत्या पंचाइतीच फार, सांगितलं ना, तुऱ्याला येश मिळावं म्हणून...”

“पण... रात्रभर भूतासारखा भटकून तुऱ्याला यश कसे मिळणार?” रामने आपले असमाधान व्यक्त केले.

“म्हंजी, मी रातच्याला भूतावाणी भटकतुय काय?”
“मग सांग तरी... लवकर...”

—धोंडी विचारात पडला. रामच्या डोळ्यातला आग्रहाचा भाव त्याला स्पष्ट दिसत होता. पुन्हा कोंबड्याने बांग दिली. बाकीच्या मंडळींचे उठण्याचे नाव नव्हते. विषय बदलण्यासाठी धोंडी

अनुक्रम

शंकर पांड्याच्या नावाने ओरडला. तो उठून उभा राहणार तोच, रामने त्याचा हात घट्ट पकडून त्याला पुन्हा खाली बसविले. त्याच्या डोळ्यात रोखून पाहात राम म्हणाला—

“नसेल सांगायचं तर नको सांगूस, पण जरा आमच्याशी तरी धडपणे बोलत जा!”
—रामच्या स्वरातली नाराजी ओळखून, धोंडी म्हणाला—
“राम!” — त्याच्या स्वरात एकदम ओलेपण आलं.

“तसं नाय पण, खरं सांगू का... आता तुलाच हा वारसा चालवायचा आहे. तूच तुरापक्षाचं नाव दुनियेत करशील याची मला पुरी आशा हाये.”

—मग धोंडीने रात्ररात्रभर आपण शंकाराची साधना नदीकाठी एकांतात कशी करतो. आपल्याला ती कुणी शिकवली ते सारं रामला सांगून टाकले. धोंडीच्या वर्तनातील गुढ अशा रितीने उकलले. कलगी-तुऱ्याचे कोडे सुटले तरीही समाधान मात्र झाले नाही.

**❑ गुरूच्या शोधात**

रामच्या मनातले कुतूहल धोंडीच्या बोलण्याने काहीसे शमले. मात्र पूर्णपणे शमले नाही. ‘कलगीची कवनं नाही तर तुऱ्याची कवनं’ या धोंडीच्या उद्‌गारांनी तो अस्वस्थ झाला. या साऱ्याचा नीट अभ्यास केला पाहिजे हे त्याने मनाशी ठरविले. इच्छा असली की मार्ग सापडतो असे म्हणतात या वचनाला अनुभवही रामला लवकरच आला.

कलगीतुरा हा विषय आपल्याला मुळातून कोण समजावून देईल या एकाच विचाराने रामला खाणेपिणेही सूचेना. त्याची भटकंती सुरू झाली ती गुरुच्या शोधार्थ. सोलापूरच्या नाथमठात अनेक साधूमहंत काही काळ मुक्काम करून मार्गस्थ होत असत. उच्च कोटीचे साधक, कानफाटे, अशा सर्वांची अधूनमधून मठात उठबस असे. राम शोधक नजरेने शोध घेत राहिला. पण प्रत्येक वेळी त्याला निराश व्हावे लागे. त्याच्या मनाचे समाधान करू शकेल असा कोणी गुरु त्याला दृष्टीस पडेना.

एकदा असाच नदीकाठी विचार करीत बसलेल्या रामच्या कानावर अचानक शब्द पडले... ‘पशुनां पति... पापनाशं—परेशं..’ रामने चमकून पाहिले एक तेजस्वी संन्यासी आपल्याच तंद्रीत गात चालला होता. राम घाईने उठला. संन्यासाच्या वाटेवर उभा राहून त्याने हात जोडले. संन्यासी किंचितकाळ थबकले, त्यांनी रामकडे एकवार पाहून स्मित केले. आणि आपल्याच तंद्रीत ते पुन्हा एकदा रस्ता चालू लागले. राम त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघून, भारावून तिथेच कितीतरी वेळ उभा होता. पश्चिमेला केशरीरंग गडद होत गेला. राम भानावर आला तेव्हा आभाळभर चांदण्या लुकलुकू लागल्या होत्या. राम माघारी फिरला. त्याने ठरवले या

अनुक्रम

साधुपुरुषाला भेटायचेच. रामने त्यांच्या राहण्याच्या जागेचा छडा लावला. नाथमठातच त्यांचे वास्तव्य होते. तथापि नाथमठात त्यांना न भेटता स्वतंत्र भेटायचे त्याने ठरवले.

रामच्या आणि त्या संन्यासी बुवांच्या गाठीभेटी झाल्या. ते संन्यासी एक उच्च कोटीचे सिद्ध पुरूष असून, नाथसंप्रदायी होते. रामच्या मनातल्या अनेक शंका त्यांनी दूर केल्या. शिवशक्ती या कल्पनांचा बोध केला. शिवशक्ती सामरस्यच कसे श्रेष्ठ आहे हे रामला त्यांनी समजावून सांगितले. रामच्या मनातला गोंधळ यामुळे बराच कमी होण्यास मदत झाली. शिव आणि शक्तीचे अभिन्नत्व त्यांनी रामच्या मनावर ठसवून, त्याला व्यावहारिक उपदेशही केला. राम त्यांच्या ज्ञानाने आणि व्यक्तिमत्वाने भारावून गेला. आपले गुरुपद त्यांनी घेऊन, आपल्याला शिष्य म्हणून स्वीकारावे ही रामची मागणी त्यांनी अमान्य केली. योग्य वेळ येताच पाहू असे म्हणून, त्यांनी रामला प्रपंच विज्ञान समजावून सांगितले.

रामने विचार केला होता त्या पेक्षा हे गुरु कितीतरी वेगळे होते. मी कुणाचा गुरु नाही वा माझा कुणी शिष्य नाही असे त्यांनी जेव्हा निक्षून रामला सांगितले, तेव्हाच रामची खात्री पटली की, आपली जिज्ञासा बस्स इथेच पूर्ण होणार.

रामला त्यांच्या अमृततुल्य सहवासात अनेक गोष्टींचा उलगडा झाला. अनेक प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाली. याचा परिणाम असा झाला की, रामची कविता उत्तरोत्तर अधिक समंजस, प्रौढ, प्रगल्भ होत गेली. मात्र व्यक्तीगत आयुष्यात धोंडी हाच त्याचा श्वास होता. धोंडीच्या फडावर सारी सारी बंधने गळून पडत. जगण्याचा मुक्तछंद इथे छान आस्वादता येत होता. कशाची कमी होती? त्यामुळे फडावर त्याचा फारच जीव होता.

### ❑ मुक्तविद्यापीठाचा स्नातक

धोंडीचा फड हा रामच्या दृष्टीने मुक्तविद्यापीठच होते. या विद्यापीठात कसलेच बंधन नव्हते. सारेच मुक्त विद्यापीठाचे स्नातक. त्यामुळे रामचा वेळ इथे मजेत जाऊ लागला. कवने ऐकायची, कवने रचायची, खाणे, पिणे, धुंद जगणे यात कसा वेळ जाई ते कळतही नसे.

तिकडे मुद्‌गलशास्त्रींनी आपला ग्रंथ पूर्णत्वास नेला. कालिदासाच्या ग्रंथाचे नाव रघुवंश म्हणून त्यांनी आपल्या ग्रंथाचे नाव ‘यदुवंश’ असे योजले. त्यानंतरही त्यांचे लेखनकर्म सुरूच होते. आता त्यांनी मराठी भाषेत ग्रंथ रचण्याचा संकल्प सोडला. गंगाबाईंची व्रतवैकल्ये, उपासतापास नेहमीप्रमाणे चालूच होती. रामला मात्र या साऱ्या घडामोडींची गंधवार्ताही नव्हती. तो आपल्याच धुंदीत छान जगत होता. धोंडीची कवने ऐकता ऐकता धोंडीला कवने रचून देत होता. मात्र कवने रचताना स्वतःची मुद्रा न टाकता धोंडी म्हणे अशी मुद्रा घालत होता.

आपल्यापायी दादा वहीनीला कमीपणा यायला नको यासाठी हा सारा अट्टहास होता. फडावरच्या साथीदारांकडून संगीताचे धडे गिरवण्यासाठी त्यांच्यावर पैसे उधळीत होता.

रामला स्वतःची ओळख निर्माण करायची होती. मुद्‌गलशास्त्रीचा भाऊ ही ओळख त्याला असह्य होत होती. आपली स्वतंत्र ओळख निर्माण व्हावी यासाठी झटणारा राम मित्रांवर, चैनीखातर पैसे उधळतांना न कळत कर्जबाजारी होत होता. इथे मात्र मुद्‌गलशास्त्रीचा भाऊ हीच ओळख न कळत त्याच्या कामास येत होती.

**❑ दादाने घेतलेली 'फारिखत'**

रामच्या मनमोकळ्या, उधळ्या स्वभावावर फडातला प्रत्येकजण खूष होता. चैन. विलास, नाना ढंग करतांना राम साऱ्यांच्या उपयोगाला येत होता.

तथापि लागतील त्या वस्तू कुठलाही विचार न करता आणण्याचा सपाटा चालवल्या मुळे कर्जाची रक्कम फुगत चालली. इतकी की, मुद्‌गलशास्त्रींकडे सावकार जेव्हा तगाद्याला आले तेव्हा कर्जाचा आकडा पाहून मुद्‌गलशास्त्री आंतरबाह्य थरारले. दोन्ही भाऊ मिळून साडेनऊशे इतके कर्ज झालेले होते. मुद्‌गलशास्त्रींनी सखोल चवकशी केली तेव्हा, एकट्या रामच्या नावावर सहाशेरुपयांचे कर्ज असलेले त्यांना आढळले. त्यांचा तोल सुटला.

रामची आता गय करण्यात अर्थ नाही. त्याच्यावर दया दाखविण्याचेही कारण नाही, हे त्यांना कळून चुकले. त्यांनी रामला बोलावून त्याची खूप निर्भर्त्सना केली. मुद्‌गलशास्त्री आज सारे व्युत्पन्नत्व, पांडित्य बाजूला ठेवून रामशी बोलत होते. त्यांच्या शब्दाशब्दातून अंगार बाहेर पडत होता. हा अंगार रामला जाळू लागला. तथापि रामला त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याशिवाय इलाज नव्हता. तो मुकाट्याने दादाचे म्हणणे ऐकत होता. गंगाबाईंच्या काळजाचे पाणी पाणी होत होते. अनेकदा समज देऊनही रामने मुद्‌गलशास्त्रींना जुमानले नव्हते. त्यामुळेच मुद्‌गलशास्त्रींनी आज एक महत्त्वाचा निर्णय घेण्याचे ठरवून टाकले होते. त्यांनी संतापून संदुकीच्या खणातून खर्डे काढले आणि त्यावर थरथरत्या हातांनी ते लिहू लागले—

> "लोकांचे देणे तुमचे व आमचे, उभयतांचे मारफतीचे
> निघाले ते वारूं... आपण व तुम्ही एकस्थळी असतां चालेनासे
> जाहले. कजिया होऊं लागला, या निमित्य विभक्त जालो."

ता. २२-३-१७७८

**❑ अस्वस्थ राम**

त्या दिवशी राम घरी फिरकलाच नाही. फडावर बसून राहण्याचा कंटाळा आला म्हणून सिद्धेश्वराच्या देवळात पाय मोकळे करण्यासाठी गेला खरा, मात्र साऱ्यांच्या नजरा आपल्यावरच

रोखलेल्या लक्षांत आल्यावर त्याला कसेसेच झाले. सिद्धेश्वराचे दर्शन करून तो परिसरात भटकत राहिला. त्याच्या मनातील वादळ काही कमी होईना. रात्र वर चढू लागली. राम पुन्हा धोंडीच्या फडावर परतला. सारेजण काळजी करत त्याचीच वाट पाहात होते. साऱ्यांची जेवण आटोपली होती. शंकर चिलमीचा झुरका मारतांना, मधूनच ढोलकीवर थाप देऊन स्वरात लागली की नाही पाहात होता. दोन दिवसांनी तासे गावात खेळ करायचा होता. त्याची जोरात तयारी चाललेली होती.

धोंडी जेवून कुठेतरी बाहेर गेला होता. तो आला की, कवने गायचा आरंभ होणार. पांड्याने एकतारीची तार घट्ट केली. बाकीचे सुरते तोंडातल्या तोंडात गुनगुनत मधूनच इनोद करीत होते. राम हे सारे तटस्थपणे बघत होता खरा, पण त्याच्या डोळ्यासमोरून दादाचा थरथरता लिहिता हात जात नव्हता. 'या निमित्य विभक्त जालो' ही अक्षरे डोळ्यासमोर नाचत होती. डोक्यातील विचार जराही कमी होत नव्हते. एक दोघांनी रामला दोन घास खाऊन घेण्याची सूचना केली. रामने मानेनेच नकार दिला. काही वेळ तसाच गेल्यावर त्याने शंकरच्या हातातून ढोलकी घेतली आणि तो ढोलकीवर जोरदार थाप देऊन वाजवू लागला—

धा धा धा धा तुन्ना किडनग तिरकिट तकता तिरकिट
धिट धागे न धा तिरकिट धा धा धा धा धिट धागे न धा
तिरकिट धा धा धा धा धिट धागे नधा तिरकिट धा धा धा धा...

राम घामाघुम होईपर्यंत वाजवत राहिला. मनातल्या घुसमटीला वाट करून देऊ लागला. ढोलकीवर नर्तन करणारी रामची बोटे पाहून जो तो अवाक होऊन त्यांच्याकडे पाहू लागला.

दादाने घेतलेल्या निर्णयाने सुन्न झालेला राम — धोंडीच्या फडावर, साथीदारांच्या घोळक्यात कितीतरी वेळ मग नुसता बसून होता. कुणी कुणाशी बोलत नव्हते. झाल्या घटनेने जो तो अवाक झाला होता. राम आता काय निर्णय घेणार? कुणालाच ठाऊक नव्हते. धोंडी बाहेरून आला. ते विलक्षण दृश्य पाहून तो अचंबित झाला. झाला प्रकार समजल्यावर त्याने रामला विचारले—

"राम तू काय ठरवलंयस?"

"मला आता गावात राहायचे नाही" गळ्यातला हुंदका दाबत राम म्हणाला.
"मग कुठं जाणार?" रामच्या पाठीवर हात फिरवत धोंडी म्हणाला.
"कुठेही जाईन, पण या गावात..."

गुढघ्यात मान घालून राम स्फुंदू लागला. दादा असा काही निर्णय घेईल असे त्याला स्वप्नातही वाटले नव्हते. धोंडी आणि साऱ्या साथीदारांनी रामचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. राम साऱ्यांनाच तोंडावर हो, हो म्हणत राहिला.

रात्र वर चढू लागली. दूरवर गावात मंदिरातले शेजारतीचे घंटानाद ऐकू येऊ लागले. रातकिड्यांनी आपले संगीत सुरू केलं. वर आकाशात वाघळांची एक रांग कालवा करीत डोक्यावरनं पलीकडे निघून गेली. या साऱ्यांना आपापलं घर आहे. आपण मात्र, रामच्या डोळ्यातलं अश्रु ओघळू लागले. शंकर, पांड्या इतर सारेजण पुन्हा रामची समजूत घालू लागले. रामच्या मनाला झाली घटना खूपच लागली होती. पांड्याने हिलालाच्या चिंधीबुडी तेल ओतले. वर आभाळात चारदोन अगावू ढगांनी चंद्र झाकोळून टाकला होता. सोलापूर हळूहळू निद्रिस्त झाले.

### ❑ अयशस्वी मध्यस्थी

या प्रसंगानंतर चारदोन शहाणी माणसे मुद्गलशास्त्रींना भेटून गेली. यामुळे एक झाले, रामने जास्तीत जास्त घरातच राहावे, जेवणे-खाणे व इतर व्यवहार एकत्रच होतील, रामने छंदफंद कमी करावेत या अटींवर रामची भलामण करणाऱ्यांना मुद्गलशास्त्रींनी चांगलेच सुनावले आणि रामला घरात ठेवून घ्यायची तयारी दर्शवून आपला राग आवरण्याचा प्रयत्न केला. तरी एकूण वातावरणात ताण कायमच होता. एरवीही दोघे बंधू तसे आपापसात कमी बोलत. गंगाबाईंच्या मध्यस्थीनेच बऱ्याचदा दोघे संवाद साधत. आता तर प्रश्नच नव्हता.

जेवायला बरोबरीनेबसणारे दोघे बंधू... आज मात्र मुद्गलशास्त्री रामची वाट न पाहता एकटेच पाटावर येऊन बसले. गंगाबाई गोंधळून गेल्या. त्या म्हणाल्या-

“राम येईलच इतक्यात, मी बोलावणे केलेय.”
“बरे मग?”
“नाही... आपण...”
“मला त्याच्याशी बोलणे सोडाच, त्याचे तोंड देखील पाहायचे नाही.”
“पण...”
“पण नाही आणि काही नाही...” मुद्गलशास्त्री भराभर एकेक घास घेऊ लागले.

गंगाबाई हताशपणे सारे बघत, घरकाम करीत राहिल्या. रामची वाट पाहात राहिल्या. मनातल्या मनात जगदंबेला साकडे घालीत राहिल्या.

❑ **रामची घुसमट**

अस्वस्थ रामच्या आयुष्याने आता निराळेच वळण घेतले. दादाने घातलेल्या अटी त्याला मान्य होणे शक्यच नव्हते. त्यातच दादाने आपल्याशी बोलणेही बंद केले यामुळे रामला वाईट तर वाटलेच पण चीड देखील आली.

मातृतुल्य गंगावहिनीच्या प्रेमाच्या धाग्याने त्याचे घराशी नाते टिकून होते इतकेच. बाकी त्याचे खरे नाते धोंडीच्या फडाशीच अधिक होते. घरी दादाकडून मिळणारी वागणूक आणि इथे फडावर आपल्यासाठी जीव टाकणारे मित्र! किती फरक असतो माणसामाणसात. ती देखील माणसेच आहेत. खालच्या जातीत जन्माला आली म्हणून काय झाले? कुठल्या जातीत जन्म घ्यायचा हे काय आपल्या हातात असते? आणि आपण उच्च जातीत जन्माला आलो म्हणजे काय? आपण त्यांची संगत करून कुळाला बट्टा लावतो म्हणे! हा बट्टा म्हणजे तरी काय? याने कुळ बुडते म्हणे!

जिथे माणुसकी, प्रेम मिळते त्यांच्या संगतीने कुळ बुडते? आणि माणुसकीला टाकून, प्रेमाचा साधा शब्दही जिथे मिळत नाही अशाने कुळ तरते? किती फोलकट विचार आहेत हे. कुणी निर्माण केले असले हे जीवघेणे विचार? धोंडीचा किती जीव आहे आपल्यावर. काय संबंध आपला नि त्याचा? कोणते नाते आहे हे? हा कुठला ऋणानुबंध? ही केवढी समज धोंडीकडे आहे. आणि त्याची ही उपेक्षा! तो केवळ खालच्या जातीत जन्माला आला म्हणून? त्याला साधी अक्षर ओळखही नाही म्हणून? त्याची भाषा गावंढळ आहे म्हणून?

विचार करून करून राम पुरता थकून गेला. त्याचा डोळा केव्हा लागला हे कळलेच नाही.

❑ **रामची कानउघाडणी**

जोशी वाड्यात आज सकाळपासूनच लगबग सुरू होती. सोलापूरातले अनेक प्रतिष्ठित शास्त्री, पंडित मंडळी वाड्यावर जमली होती. मुद्‌गलशास्त्रींचे अनेक आप्तही आजच्या प्रसंगात हजर होते. वेदमूर्ती जगन्नाथशास्त्रींचे श्राद्धकार्य वाड्यात संपन्न होत होते. त्यासाठीच जगन्नाथशास्त्रींचे वयोवृद्ध मित्र, त्यांच्या हाताखालून तयार झालेले काही स्नातक एकत्र जमले होते. त्यांच्या मंत्रजागराने वाडा दुमदुमून गेला.

राम चार दिवसांनी आज प्रथमच वाड्यात आला होता. गंगाबाई आणि काही नातेवाईक स्त्रियांनी सोवळ्यात स्वयंपाक शिजवला होता. श्राद्धविधीसाठी जमलेल्या ब्रह्मवृंदाची भोजने आटोपली. यथासांग दक्षिणा स्वीकारतांना रामची चवकशी एक दोघांनी केली. त्याला नमस्काराला बोलवा अशी सूचना आल्यावर, राम उठला. त्याने मांडून ठेवलेल्या पिंडाला ब्राह्मण

सांगतील त्याप्रमाणे नमस्कार केला. उपस्थित ब्राह्मणांना नमस्कार करण्यासाठी तो वाकला तेव्हा मुद्गलशास्त्री म्हणाले—

“आता स्वर्गस्थ पितरांनीच चिरंजीवाच्या डोक्यात काही फरक पाडला तर ठीक.”

“कसे योग्य बोललात हो, मुद्गलशास्त्री तुम्ही! अरे, रामा जरा घराण्याचा, ज्ञातीचा तरी अभिमान बाळगावा.”

—यदुभट तुंदीलावरून हात फिरवित म्हणाले.

“छै, आपल्या बोलण्याचा काहीही परिणाम होणार नाही. पालथ्या घड्यावर पाणी दुसरे काय?”

—मुद्गलशास्त्री उद्वेगाने म्हणाले.

“उमर काय रे तुझी?”कुणीतरी विचारले.

“विशीचा झाला असशील नाही” आणखी एक आवाज.

— रामने काहीच उत्तर दिले नाही.

“मुद्गलशास्त्री आता याचे दोनाचे चार हात लवकर करून टाका हो. त्याने तरी..” यदुभट म्हणाले.

“अहो, कसचे दोनाचे चार घेऊन बसलात यदोबा. वधूपक्षाला नवरदेवाचे कर्तृत्व काय कपाळ सांगणार? का सांगणार की, डफड्याच्या नि ढोलग्याच्या तालावर नवरदेव दिवसरात्र पानचट कवने म्हणत असतात म्हणून!”

—मुद्गलशास्त्री रामकडे तिरपा कटाक्ष टाकत म्हणाले.

“काय म्हणता? शिव शिव!”

“रामा, अरे हे काय ऐकतो आहोत आम्ही?”दत्तुशास्त्रींनी विचारले.

“त्यास काय पुसता? मी सांगतो. अहो, शृंगाररसाची महती आम्हास काय ठाऊक नाही? पण कुठे संस्कृतातील शृंगार नि कुठे तमासगिरांचा शृंगार! काय ती कवने आणि कसली ती बिभत्स भाषा. पण आपल्याला अक्कल नको काय? लुंग्या-सुंग्यांच्या नाही लागून भ्रष्ट व्हावयास कितीसा वेळ लागणार? म्हणूनच म्हणतो, आता पितरांनीच सुबुद्धी द्यावी. दुसरे काय?”

—यावर कुणीच काही बोलले नाही, मुद्गलशास्त्रींच्या बोलण्यातली खोच रामला कळत होती. सारे जण भराभर उठून बैठकीच्या खोलीत येऊन बसले.

अनुक्रम

जेवणानंतर साऱ्या ब्रह्मवृंदाला यथासांग दक्षिणा आणि दाने मुद्गलशास्त्रींनी दिली. बैठकीतल्या जाजमावर मंडळी जरा स्थिरावली. तांबुलभक्षण करतानाच. यदुभटांनी नवीन लेखन कर्माविषयी मुद्गलशास्त्रींना विचारले. साऱ्यांचीच तशी इच्छा दिसल्याने, मुद्गलशास्त्रींनी संदुक उघडून, नव्या ग्रंथांची पाने चाळवली आणि ते म्हणाले–

"ऐका, मंडळी ही तांबूलप्रशंसा ऐका..." यदुभटांनी चमकून त्यांच्याकडे पाहिले. मुद्गलशास्त्री खड्या आवाजात म्हणू लागले–

"पक्की पाने, लवंगा पटगलित चुना आणि कापूरवेला केली ओली सुपारी, चिकण मृदु गुलाबात जी फार वेळा पत्री, जाति फळे, स्वादिर मिळविले ज्यात कस्तुरिकेला वाटे हा मुद्गलाते तरी मधूर विडा, पै प्रियेनेच केला!"

"व्वा! काव्य म्हणावे तर याला!" यदुभट दत्तुशास्त्रींना टाळी देत म्हणाले, मग साऱ्यांनीच मुद्गलशास्त्रींची प्रशंसा करीत, रामचा विवाह तेवढा लवकर उरकून टाका अशी सूचना करीत, हास्य विनोदात वाड्याचा निरोप घेतला.

मागचे सारे आवरून गंगाबाई नि इतरजणी सुखदुःखाच्या गोष्टी करत माजघरात बसल्या होत्या. त्यात व्यक्तीगत गोष्टीपेक्षा रामचाच विषय अधिक होता.

राम मात्र आपल्या खोलीत, झाल्या प्रकाराचा आठव करीत, गुढघ्यात मान घालून सुन्न बसला होता. त्याला घर खायला उठत होते. त्याला ओढ लागून राहिली होती फडावर जाण्याची. चटईवर पडलेला राम तळमळत कुस बदलत राहिला.

### ❑ राम घराला मुकतो

रामच्या लेखी घर आता नावालाच उरले होते. कधीतरी तो घरी येई. गंगाबाईंनी त्याला खूप समजावून पाहिले तरी त्याच्या वागणूकीत फरक पडला नाही.

रामच्या अनिर्बंध वर्तनाला जरा तरी आळा बसावा म्हणून घरात त्याच्या विवाहासंबंधी बोलणी सुरू झाली. नातेवाईकांना सांगावे गेले. स्थळांची चौकशी सुरू झाली. रामला हे कळताच त्याने वहिनीशी वाद केला. वहिनीने समजूत काढल्यावर राम नाईलाजाने का होईना तयार झाला.

यथावकाश साधेपणाणेच रामचा विवाहही पार पडला. रामचा संसार सुरू झाला. त्याची पत्नी उमा धर्मपरायण स्त्री होती. तिने गंगावहिनींच्या मार्गदर्शनाखाली संसाराचा श्रीगणेशा केला. गंगाविहनीनी तिला खूप प्रेम दिले.

लग्नानंतर रामच्या स्वभावात बदल होईल असे सगळ्यांनाच वाटले होते. परंतु रामच्या वर्तनात काहीच फरक दिसेना. मुद्गलशास्त्री आतापर्यंत राग आवरून रामच्या वर्तनातील सुधारणेबाबत आशा धरून होते. पण आता त्यांना कळून चुकले. त्यांनी वाटण्यांचे कागद आधीच तयार करून ठेवले होते. रामला घराबाहेर काढल्याशिवाय गत्यंतर नाही हे त्यांच्या मनाने घेतले. एक दिवस त्यांनी रामला समोर बसवून त्याच्या साऱ्या कृत्यांचा पाढा वाचायला सुरुवात केली. मुद्गलशास्त्रींनी रौद्र अवतार धारण केला होता. रामला काय म्हणायचे आहे याची पर्वा न करता ते आपल्या मनातील राग त्याच्यासमोर ओकत होते. राम सारे शांतपणे ऐकून घेत होता.

मुद्गलशास्त्रींनी आज एक घाव दोन तुकडे करायचे ठरवले होते. त्यांनी रामला बजावले, की रामने आता गृहत्याग करावा. रामने कुठेही जावे, काहीही करावे तथापि या घरात त्याला आता थारा नाही. त्याने आपल्याला जुमानले नाहीच, पण त्याहीपेक्षा घराण्याचे नाव बदनाम केले अशी पक्की समजूत झालेले मुद्गलशास्त्री आज काहीही ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत नव्हते. रामने गृहत्याग केल्याशिवाय आपण अन्नग्रहण करणार नाही असे निर्वाणीचे शब्द बोलून मुद्गलशास्त्री तावातावाने बैठकीच्या खोलीत निघून गेले. रामबरोबरचे सारे संबंध मुद्गलशास्त्रींनी अशा रितीने तोडून टाकल्यावर राम पुढे कोणताच पर्याय उरला नाही. राम घराला मुकला. आतापर्यंत राम एकटा असल्याने, त्याने कोणाच्या रागलोभाची पर्वा केली नव्हती. पण आता सारीप्रापंचिक जबाबदारी एकट्याने निभवावी लागणार या विचाराने तो कमालीचा अस्वस्थ झाला.

रामची काव्यप्रतिभा एकीकडे बहरत होती आणि उधळ्या स्वभावामुळे लक्ष्मी त्याच्याजवळ टिकत नव्हती. राम निःसंशय सरस्वतीचा उपासक होता. लक्ष्मीची पर्वा म्हणूनच त्याने कधी केली नाही. आणि आतापर्यंत नाही म्हटले तरी त्याला दादाचा आधार होता. दादा कितीही रागावला, भांडला तरी वेळप्रसंगी घराण्याच्या प्रतिष्ठेसाठी का होईना सांभाळून घेत असे. आता मात्र तोही आधार सुटला.

राम उठून देवघरात गेला. काही क्षण तसाच देवासमोर उभा राहीला आणि त्याने ठरवले घरच नव्हे तर गावही सोडायचा. राम मागे वळला गंगावहिनी आणि उमा उभ्या असलेल्या त्याने पाहिल्या. त्याने पत्नीला मागोमाग येण्याची खूण केली. पण गंगावहिनींनी त्याला शांत राहण्यास सांगितले. गोंधळलेल्या रामला काहीक्षण काय करावे ते सूचेना. त्याने दूरूनच वहिनीला नमस्कार केला आणि तो शांतपणे घराचीपायरी उतरू लागला.

धोंडीकडे न जाता वाट नेईल तिकडे तो चालत राहीला. उन्हे कलू लागली. परतीची पाखरं घरी परतू लागली. राम कितीतरी वेळ एकटाच अंधारपडेपर्यंत नदीकाठी बसून राहीला. असंख्य विचारांचे वादळ त्याच्या मनात घोंघावत होते. अंधारात नदीच्या पाण्याचा खळखळाट तेवढा ऐकू येत होता.

अनुक्रम

❑ **लोकरंगभूमीचा 'पूजारी'**

१७८१ साल संपून १७८२ साल उजाडले तेच मूळी महाराष्ट्राच्या इतिहासात अनेक घडामोडीने भरलेले असे. १७८० पासूनच इंग्रज मराठ्यांच्या चकमकी चालू होत्या. १७८१ साली इंग्रज आणि मराठ्यांचे शूर सरदार महादजी शिंदे यांच्यात एक समझोता झाला. तर १७८२ हे वर्ष सालबाईच्या तहाने आणि इंग्रज मराठ्यांच्या युद्धाच्या समाप्तीने गाजले.

इकडे रामच्या जीवनातही अनेक घडामोडी चालू होत्या. राम आता वीस वर्षांचा झाला. तारुण्याची झळाली त्याच्या शरीरावर दिसू लागली. गौरवर्णी राम आता अधिकच देखणा दिसू लागला.

मुद्‌गलशास्त्रींच्या काव्यभाषेचे नकळत झालेले संस्कार आणि धोंडीच्या फडावर स्वरतालाचे मिळणारे बाळकडू यातून त्याच्यातील 'शाहीर' आकारात होता. 'कवी' आकार घेत होता.

राममध्ये अनेक परस्परविरोधी गोष्टींचा संगमच झालेला होता. जीवनाला समरसून सामोऱ्या जाणाऱ्या रामची पहिली पसंती मैत्री हीच होती. जातीपातीच्या पलीकडे जाऊन रामने मित्र गोळा केले होते. तेच त्याचे पोशिंदे होते. त्यांची मैत्री तोडून टाकणे म्हणजे स्वतःच्या अस्तित्वालाच संपविणे होय. राम ही गोष्ट कोणत्याही किंमतीत करू शकत नव्हता. त्यामुळेच दादाचा आणि पुष्कळ प्रतिष्ठितांचा रोष पत्करूनही त्याने फड सोडला नव्हता.

या फडावरच त्याला लोकरंगभूमीचा परिचय झाला. लोकरंगभूमीचे दालन केवढे अफाट आहे याची खात्री त्याला इथेच पटली. इथेच त्याची काव्य प्रतिभा बहरास येऊ लागली. एकाहून एक सरस लावण्यांची निर्मिती करताना त्याला खाणेपिणे यांचाही विसर पडे. स्वर, ताल, काव्य अंगात भिनलेला राम बेभान होऊन लिहू लागला.

> "ऐक सखे गडणी कुंजवनी हरि खेळतो बसलीस निजभुवनी
> या वनांत नंदाचा नंदन करी आनंद याच भवता अरविंदाचा
> बाई तशात रंगाचा संगम यदुपति अंग भिजवितो बहर अनंगाचा"

तर युद्धावर गेलेल्या पतीची वाट पाहणाऱ्या विरहिणीचे दुःख व्यक्त करताना राम लिहीत होता.

> "झाली तरुणपणाची धूळ
> पति नाही सेजेवरी सुंदरा रडे मुळमूळ
> हा वसंत ऋतु अनिवार करि मदन शरांचा मार बहुत बेजार
> आता काय करूं मी संसार सर्पापरी गमती गडे गळ्यामध्ये हार

अनुक्रम

जासुद करति वेरझार नाही पत्र साजणी कथिते तपसिलवार
या विरहसमुद्रापार कधी होईन बाई येति कधी सरदार”

कधी तारुण्य सुलभ आकर्षणातून त्याच्या लेखणीतून शब्द झरू लागत तेच मूळी, अंगभूत सौंदर्याचा साज लेवून. मग साहजिकच त्याचा त्यालाच प्रश्न पडे-

“कोण्या ग सुभगाची मदन मंजरी सांग सखे सुंदरी
इच्या सौंदर्याची सीमा झाली गडे रतिहुनि अति उत्तमा
पाहुनिया मुखचंद्रमा सखे गडे अमा गमति पोर्णिमा”

अशारितीने हा लोकरंगभूमीचा ‘पूजारी’ मराठी शारदेच्या गळ्यात एकेक लावण्यसर चढवत होता. स्वतःच्या काव्यधुंदीत जगत होता. स्वर तालाच्या आधाराने रामची ‘काव्यरुपी सुंदरा’ आता विलंबितातून द्रुतात पदन्यास करू लागली होती.

**❑ राम स्वतंत्र फड काढतो**

मुद्गलशास्त्रींनी अशा रितीने फारिखत पत्र तयार केल्याने, रामचा घराशी संबंध नावापुरताच उरला. धोंडीचा फड हेच त्याचे सर्वस्व बनून गेले. धोंडीला तमाशासाठी लावण्या रचून देणारा राम आता स्वतःच लावणीरचना करू लागला. तथापि एवढ्यावर त्याचे समाधान होईना. आपला स्वतःचा फड असावा अशी त्याची खूप दिवसांची इच्छा होती. धोंडीच्या फडाशी एकरूप झालेल्या रामने मग एक दिवस स्वतंत्रपणे आपला फड काढला. आणि गावोगाव तमाशाचे खेळ करीत तो लोकांना शृंगाररसात आकंठ बुडवू लागला.

रामचा आवाज पहाडी आणि मधूर होता. धोंडीच्या फडावर त्याने तालशास्त्राचे धडे गिरविलेच होते. डफ, हलगी, तबला, ढोलकी या सारखी वाद्ये तो अप्रतिम कौशल्याने वाजवित असे. रामची डफावर थाप पडली की, सारा जनसमुदाय क्षणात शांत होत असे. आज कोणत्या नव्या रचना ऐकायला मिळणार याची उत्कंठतेने वाट पाहणाह्या जनसमुदायाची उत्सुकता शिगेला पोहचली की, रामचा आवाज शांततेला छेद देऊन जाई.

“करू तरी काय गे सइबाई
सखा घरी नाही गेला बाई
तनु तरी जशी बहरात आंबराई
कामही मारितो शर सर्सरा
नीरद सोडितो बाई जळधारा
मारूत वाहतो जेवि निखारा
चंदन शीतल चंपक सुख काही
इंदुहि रिपु मज जाळी अग आई...”

यातील ‘अगआई’ शब्दावर राम असा काही अभिनय करी की श्रोते पुरते शृंगार रसात न्हाऊन निघत. शेकडो मुखातून चित्कार, शिट्याची बरसात होई. जसजशी रात्र चढत जाई तसतशी शृंगार रसाची परिसीमा होत जाई.

श्रोत्यांना जराही इकडे तिकडे हलू न देता मग रामची शृंगार नायिका म्हणू लागे—

> “अरे काही बोल वाणी झाले पहा दीनवाणी
> करू नको वेड्यावाणी दिसते मी केविलवाणी
> तुझि माझी प्रीत कैसी अरे सख्या कोठे गेली
> काहि तरी आण चित्ती हे काय बोली”

रात्र रात्र हिलालाच्या प्रकाशात रामचा तमाशा शृंगाररसाची मुक्त उधळण श्रोत्यांवर करीत रंगात येत असे. काळ वेळेचे कोणतेच भान कोणालाच उरत नसे. उत्तररात्री कधी तरी खेळ संपे आणि एका बाजूला धन्यतेचा अनुभव घेतानाच दुसरीकडे खेळ संपला याची चुटपूट लोकांना लागून राही. खेळ संपूच नये असे साऱ्यांनाच वाटे. रामच्या लावणीने लोकांना भुरळ पाडली होती. रामची लावणी ऐकून लोक तृप्तीचा अनुभव घेता घेताच पुन्हा पुन्हा अतृप्तच राहात असत. रामने नवनवीन आणखी रचना ऐकवाव्यात अशी मागणी जोर धरी. रामला हा श्रोत्यांचा हट्ट पुरवण्यासाठी पुन्हा लेखणी हाती धरण्याशिवाय गत्यंतरच नसे.

### ❑ महाराष्ट्रभर काव्यसुंदरीचा पदन्यास

राम आता ‘शाहीर रामजोशी’ या नावाने गावागावात प्रसिद्धीस येत होता. गावोगावची हार्दिक निमंत्रणे त्याला मिळत होती. त्याच्या तमाशाच्या खेळावर लुब्ध झालेली शेकडो मित्रांची मांदियाळी रामच्या काव्यसुंदरीची आतुरतेने वाट पाहत रात्र जागरित असत.

अफाट लोकप्रियता, अमाप पैसा मिळवित रामजोशींची महाराष्ट्रभर भ्रमंती चालू होती. रामजोशींजवळ अचाट निरीक्षणशक्ती होती. त्यामुळेच समाज मनाचे अचूक निरीक्षण करून त्यांची कविता निर्माण होत होती. रामजोशींची कवितासुंदरी लोकांना आवडण्याचे कारण ती याच मराठी मातीच्या कुशीत जन्माला आलेली होती. या मातीशी तिचे घट्ट नाते होते. या मातीत निर्माण झालेली सुखदुःखे यांची ती साक्षीदार होती. तशी मराठे सरदारांच्या पराक्रमाचीही ती चाहती होती.

मराठे सरदारांच्या मोहिमा फत्ते होऊन घराच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवताच त्यांच्या रंगेल जीवनाचा आरंभ होई. अशा वेळी ती कधी ‘वासकसज्जिका’ बने तर कधी ‘प्रोषितपतिकाः कधी ‘कलहांतारिता’ बनून तर कधी अभिसारिका बनून भेटायला येणारी ही काव्यसुंदरी आपल्या नुपूरांचा झंकार असा काही उमटवे की, तो झंकार ऐकताना ऐकणाऱ्याच्या काळजाचे पाणी झाले नाही तरच नवल!

असे मराठी मुलुखाला डोलायला लावून रामजोशींचा मुक्त संचार साऱ्या महाराष्ट्रभर चालू होता.

**❑ दैवे ही गाठ बयाबाईची**

रामजोशींच्या भ्रमंतीत त्यांची गाठ चिमा आणि बया या दोन गणिकांशी पडली. या दोघींच्या कानावर रामजोशींची कीर्ती गेलेलीच होती. रामजोशींच्या लावणीने दोघींनाही भुरळ पाडली होती.

बया ही उत्तम गायिका होती. दिसायला सुंदर होती. रामजोशींनी आपल्या फडात दोघींना सामावून घेतले. बया रामजोशींच्या लावण्यांना सुंदर चाली लावून आपल्या सुरेल आवाजात त्या सादर करी.

आपल्या सौंदर्याने समोरच्याला घायाळ करणारी बया, सुरेल कंठी कोयाळही होती. रामजोशी आणि बया परस्परांवर अनुरक्त होऊन, इष्काच्या रंगपंचमीत रंगून शृंगाररंगाची मुक्त उधळण करू लागले.

बयेच्या आगमनाने रामजोशींची शाहीर म्हणून लोकप्रियता बरीच वाढली. बयेच्या आपल्याशी पडलेली गाठ हा दैवयोगच आहे असे रामजोशींना वाटे. त्यामागे कारणही तसेच होते.

पुणे शहर हे मराठ्यांच्या राजधानीचे शहर. खुद्द पेशवे हे कलाप्रेमी असल्याने, संगीत, नृत्यदिकलांना चांगला आश्रय मिळून अनेक कलावंत पुण्यात आपली कला पेश करू लागले होते. याच काळात उत्तर हिंदुस्थानातून शास्त्रीय संगीत दक्षिणेत येऊन स्थिरावू लागले होते. पुण्यात रागदारीवर आधारित गाणे आणि नृत्ये यांना प्रतिष्ठा मिळू लागली होती. यातूनच रागदारीसंगीत तेवढेच श्रेष्ठ आणि इतर कलाप्रकार वा संगीत हे अगदीच दुय्यम दर्जाचे असे मानणाऱ्यांचा एक पक्ष तयार झाला होता. त्यांच्या दृष्टीने लावणी आणि तमासगीर या अगदीच दुर्लक्ष करण्याजोग्या गोष्टी होत्या.

रामजोशींना या गोष्टीची चांगलीच जाणीव होती. म्हणूनच बयेची गाठ हा दैवयोगच आहे असे त्यांचे मत होते. या भेटीचे वर्णन करताना त्यांनी लिहिले—

“दैवे ही गाठ बयाबाईची
मज पडली साची
कविता इजसंगे रंगा आली
नानाविध चाली
वाणी काय परीक्षा झाली
गाणारी धाली

अनुक्रम

ऐशि मति नरात विरळ रसाची
बायकांत कैची
आहे घरोघरी पुण्यामधि गाणे
परि खोटे नाणें
आलाफ कंठामधि घेति किराणे
हे लाजिरवाणे
पुण्याविण कविता नच येयाची
शूद्रास कशाची
कवितारस मनात झडकरि यावा
पुण्याचा ठेवा
दाता परि नीरस काय करावा
जन मार्मिक व्हावा
धन्य सत्कविता कविरायाची
रसिकता बयाची...”

कवितारस मनात चटकन उलगडत जावा. ऐकणारा नीरस असून काय उपयोग? काव्यरस चाखण्यास तेवढीच रसिकता ही हवी. रागदारी संगीत आपलीच मक्तेदारी आहे असे समजणाऱ्यांचाही समाचार त्यांनी या निमित्ताने घेतलेला दिसतो.

बयेमुळे रामजोशींच्या आयुष्याला वेगळीच कलाटणी मिळाली. बयेचं सौंदर्य, तिचा स्वर्गीय स्वर, तिचं कलासक्त मन यामुळे रामजोशी तिच्या रुपगुणावर कमालीचे आसक्त झाले. लहानपणापासून विशिष्ट संस्कार नि शिस्तीचा आग्रह धरणाऱ्या दादा वहिनीच्या छत्राखाली वाढल्याने, होणारी घुसमट आता जरा कुठे शांत होऊ लागली. आजवरचा ढोलकीवरचा ‘बंद’ बोल आता कुठे ‘खुला’ पडू लागला. आणि ते साहजिकही होते म्हणा. कारण चेंडू जितक्या जोराने जमीनीवर आदळावा तितक्याच वेगाने तो पुन्हा उसळी मारून वर झेपावतो. हाच अनुभव रामजोशींच्या वर्तनावरून लक्षात येतो.

बालपणापासूनच कोणत्याही चौकटीत सामावणारं, रामजोशींचं व्यक्तीमत्व नव्हतं. मुक्त, स्वैर, स्वच्छंदी जगावं, जीवनातल्या प्रत्येक बऱ्यावाईट अनुभवाला सामोरं जावं. जीवनातला प्रत्येक्ष क्षण उत्कटतेनं जगावा या वृत्तीला अर्थातच घरात थारा नव्हता.

मुद्गलशास्त्री परंपरेची चौकट मानणारे, संस्कारी, विद्वान तथापि पापभिरू गृहस्थ होते. घराण्याचा नावलौकिक, प्रतिष्ठा या गोष्टींचा एक विळखा त्यांच्या व्यक्तीमत्वाला वेढून होता. या पलीकडचं जगणं त्यांच्या कल्पनेच्या पलीकडचं असल्याने, रामचं वर्तन त्यांना सदोदित खटकत राहावं हे ओघानेच आलं.

न कळण्याच्या वयात राम हे सारं साहत राहिला. वय आणि समज जसजशी वाढत चालली तसतसे दादाचे वर्तन त्यालाही खटकू लागले होते. परंतु दादाच्या विरुद्ध काही करावे

याला त्याचे मन साथ देईना. याचे आणखी एक कारण म्हणजे वहिनीने दिलेली माया. वहिनीमुळेच राम दादाची बोलणी सहन करीत राहिला. वहिनीच्या अलौकिक प्रेमामुळेच आजवर घराचा धागा क्षीण होऊन का होईना, तुटला नव्हता. तथापि दादाच्या हटवादी भूमिकेने तो ही एकदाचा तुटला. अशा वेळी रामजोशींची काय घुसमट झाली असेल याची कल्पना केलेली बरी.

बयेशी पडलेली गाठ हा दैवयोग आहे. असे म्हणणाऱ्या रामजोशींचे आर्तच यातून व्यक्त झालेले आहे. त्यामुळेच बालपणापासून ज्या गोष्टींचे आकर्षण, कुतूहल वाटत होते. ते सौंदर्य, तो स्वर, ते स्वच्छंदीपण या साऱ्याच गोष्टींना आता अवकाश मिळाला.

बयेजवळ आपलं मन मोकळं करून, तिचा आपल्या कार्यात हार्दिक पाठिंबा मिळविणाऱ्या रामजोशींनी आपलं सारसर्वस्व तिला दिलं. रामची कैफियत ऐकून बयेनेही हातचं राखून न ठेवता सार काही मुक्तपणे त्याला देऊन टाकलं. परस्परांवर अनुरक्त झालेल्या या दोघांनीही उभा महाराष्ट्र दणाणून सोडला. रामजोशींनी काव्यरचना करावी आणि बयेनं त्याला सुरेल चाल लावून ती पेश करावी यामुळे हा हा म्हणता साऱ्या महाराष्ट्रात बया नि रामजोशी ही नावे लोकांच्या ओठावर खेळू लागली.

रामजोशी आणि बया यांचा खेळ जिथे जिथे असेल तिथे तिथे लोक प्रचंड गर्दी करून असत. जीवाचे कान करून, एकाहून एक सरस रचना सादर होत असताना तासन्तास नव्हे, रात्ररात्र बसून राहत.

रामजोशी नि बाया यांनीही आपल्या कलेशी एक निष्ठ राहून लोकांचे अफाट प्रेम मिळवले. आता कुठे रामजोशींना स्वतःला हवे तसे जगण्याचे आपले स्वप्न आपण खात्रीने पुरे करूच हा विश्वास आला.

### ❑ चिमा- बंधअनुबंध

पूर्व दिशा केशरी रंगाने न्हाऊन निघाली. रामजोशींच्या फडावर मात्र एकदम शांतता होती. रात्रीच्या तीन प्रहरांपर्यंत खेळ झाल्याने, सगळे कलाकार थकून निद्रादेवीच्या आधीन झाले होते. हिलाल विझण्याच्या बेतात असतानाच रामजोशींनी बुधलीतले तेल हिलालावर ओतले. पुन्हा सर्वदूर प्रकाश फाकला. त्या प्रकाशात चिमाचा चेहरा त्यांना दिसला. प्रसन्न, शांत असा. रात्री चिमाने आपल्या बेभान नृत्याने रसिकांची झोप उडवली होती. रामजोशी तिच्या चेहऱ्याकडे बघत राहीले. किती कमाल करते ही पोर! तिची ढोलकीच्या तालावर थिरकरणारी पावले लोकांच्या काळजाचा ठोका चुकवित जेव्हा, बेभानपणे पदन्यास करू लागत तेव्हा; पायतली घुंगरेही शंभर तोंडांनी चित्कार करून तिला मनापासून दाद देत असत.

रामजोशींना दोन वर्षांपूर्वीचा प्रसंग आठवला. एके सकाळी श्रीपतीला ढोलकीची ओढ काढायला रामजोशी शिकवत होते. ढोलकी वा तबला असो, प्रत्येक घर स्वरात लागलेच पाहिजे याबद्दल सूचना देणाऱ्या रामजोशींचे लक्ष अचानक आलेल्या घुंगुरनादाने नादावून गेले. रियाजाबद्दल कमालीचे जागरुक असलेल्या रामजोशींचे लक्ष असे अचानक विचलित झालेले पाहताना श्रीपतीलाही कमालीचे आश्चर्य वाटले.

"कोण ते?"
"आत यावं का आमी?"
"हां- या!"
"कोण तू?"
"मी... चिमा..."
"आम्ही समजलो नाही."
"त्याची कायबी आवशकता नाय."
"म्हणजे?"
"म्हंजी... तुमी... आमास्नी खेळात शामिल करून घ्या!"
"मी... समजलो नाही..."
"आवो... तुमी मर्द म्हनायचे का...?"
"चालती हो.. इथनं... आताच्या आत्ता!"
"रायलं, चुकलं, चुकीबद्दल मापी असावी!"
"कोण आहेस तू? नाव काय तुझं? काय काम आहे माझ्याकडे?"
"बाई... बाई... नुसतं सवालच पुछता, जरा घडीबर बसू दे तरी..."
"हे बघ, असली थेरं माझ्याजवळ अजिबात चालायची नाही... आणि..."
"आणिक काय?... ते सुदिक सांगितलं नाय?"
"तुझा शहाणपणा पूरे, तुला माझ्याकडून काय हवंय?"
"माला, तुमा बिगर काय नोको, आमची ठेप ठिवा एवढीच इनवणी...."
"काय म्हणालीस?"
"काय ते तुमी समजला की!"

चिमाच्या धीटपणाने आपणाला पुरतं वेड लावलं. तिचं नृत्य हे तर कोणाही स्वर्गीय अप्सरेपेक्षा श्रेष्ठाच होतं. पण नृत्य करताना तिच्या चेहऱ्यावर अशी उदासीनता का साचलेली असते?

आणि मग आपण त्याचं कारण शोधू लागताच, चिमानं आपल्या साऱ्या कर्माची हकिगत ऐकवली होती. त्यावेळेस तिचा चेहरा जितका निरागस होता, तितकाच आणि तसाच तो आजही होता. चिमा गणिकेची मुलगी म्हणून साऱ्या समाजाच्या हेटाळणीची शिकार झालेली. पण तिचा चेहरा तिच्या मनाचं प्रतिबिंब होता. तिचं मन? वेश्येला किंवा तिच्या मुलीला मन असतं? तिच्या

अनुक्रम

जवळ असलीच तर फक्त एकच एक गोष्ट असते आणि ती म्हणजे, तिचं पौरुषाला आव्हान देणारं शरीर!

-आपणही तिच्या कमनीय सौंदर्याने तिला पाहताक्षणीच पुरे नादावलो नव्हतो? आणि पुढे साऱ्या शारिरगोष्टी बिनबोभाट पार पडल्याही. पण तरीही तिच्या मनाची थोडीफार ओळख झाली तेव्हा मात्र आपण ठरवलं की, चिमाच्या मनाविरुद्ध कोणतीही गोष्ट करायची नाही. आणि खरंच आपण तसंच केलं? रामजोशींना त्याही परिस्थितीत हसू आले. खरं तर आपण व्यभिचारीच! फक्त उच्च कुळात जन्मलो म्हणून त्याला सुसंस्कृत (?) व्यभिचार म्हणायचे. व्यभिचारात सुसंस्कृतता कुठली असते? असते फक्त नर मादीचे नाते. आपण या साऱ्या गोष्टी करून नामानिराळे कसे राहू शकतो? तिने आपल्याला सारे हवे ते भरभरून दिले. आपण तिला साधे आपले नाव तरी दिले? नाही आपण फक्त शरीराशी प्रामाणिक राहिलो, तिने तर तन आणि मनही आपल्याला देऊन टाकले. आपण आपले नाव मात्र... उमाला.. आणि उमेच्या आपल्या पत्नीची आठवण येताच रामजोशी कमालीचे अस्वस्थ झाले.

बाहेर चांगलेच उजाडले होते. पक्ष्यांचा किलबिलाट चांगलाच वाढला होता. आणि रामजोशींचे मन मात्र आतून चांगलेच पोळून निघाले होते. सकाळची वेळ असूनही दुपारच्या रणरणत्या उन्हाचा चटका ते अनुभवत होते.

**❑ आठवणींच्या डोहात**

रामजोशींनी दरवाजा किलकिला करून बाहेर डोकावले. बाहेर सारी धांदलगर्दी हळूहळू सुरू झाली होती. उमाच्या विचाराने अस्वस्थ झालेल्या रामजोशींनी नदीचा रस्ता धरला. गावाबाहेरील नदीत स्नान करावे या हेतूने, बाहेर पडलेल्या रामजोशींच्या मनाची अस्वस्थता मात्र दर पावलागणिक वाढत होती.

आपल्या आयुष्याचा अर्थ आपल्या मनाशी लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या रामजोशींचे प्रत्येक पाऊल उमाच्या विचाराने नेमके अडखळत होते. उमाशी विवाह करून आपण तिला फसवले तर नाही ना? उमावर बालपणापासून आपले अगदी मनापासून प्रेम होते. बाकीच्या गोष्टी या अपरिहार्य तडजोडी होत्या. फक्त ते प्रेम अबोल होते, ही गोष्ट मात्र निश्चित. त्याला कारणही तसेच होते. शास्त्री-पंडितांच्या घराण्यात झालेला आपला जन्म! दुसरेकाय? आपले घराणे, कुल, शील हा सारा डोलारा शेवटी कुठल्या पायावर उभा असतो? दुसऱ्यांचे विचार, भावना यांच्या बलिवेदीवरच ना? आणि त्यांचे मन भूतकाळात गेले......

रामजोशींना तो प्रसंग लख्ख आठवू लागला....

.....पाच वर्षांचा राम चंपकवृक्षातळी निरर्थक उभा होता. अचानक त्याचे डोळे दोन हातांनी अलगद झाकले गेले.

“कोण ते!”
“ओळख... पाहू!”
“अं....हं... नाही बुवा...”
“हा....हा...हा....”
“कोण?... उमा तू?”
“हात पुढे कर...”
“का...?... कशाला?”
“हे....रे काय? हात पुढे कर म्हटलं ना?”
“बरं...बाई!”
“आधी डोळे मिट!”
“ए, उमे हे काय ऽ?”
“मिट म्हटले ना!”
“हुंऽ”

- आणि तो मखमली स्पर्श! अहाहा!! आणि तरीही किती किती निरागस! तिने डोळे उघडायला सांगितले नि आपल्या उजव्या हाताच्या मधल्या बोटात तिने देव चाफ्याची तयार केलेली अंगठी! डोळ्यावर विश्वासच बसेना. डोळे उघडायला सांगून ती पळून जाताना, पाठमोरी दिसली तेवढीच. बस्स! आणि आपण तिच्या नावाने किती ठो, ठो ओरडलो....पण-

“आई ग ऽ!” किती जोराने आपला कान....छे! नको ती जीवघेणी आठवण!

-दादाने त्यानंतर किती घर डोक्यावर घेतले. नाही... नाही ते बोलला. वहिनीची समजावणीही त्याला कळली नाही... की, तो सारेच मुद्दामहून हे करत होता? काय चुकलं आपलं? नि उमाचही?

-या साऱ्या आठवणींनी अस्वस्थ झालेल्या रामजोशींनी नदीपात्रात जोरदार सूर मारला. जोरदार डुबकी मारूनही ही जुनी आठवण की जखम? विरघळायला तयार नव्हती. एक डुबकी लगावून ते पुन्हा काठावर येऊन बसले नि शेजारच्या वडावरच्या पाखरांनी एकच कलकलाट करायला सुरुवात केली.

.... आणि म्हणूनच कोणाचीही कसलीही चूक नसताना दादाने वेळोवेळी केलेल्या आततायीपणामुळेच आपण बया, चिमा यांच्या बरोबरही संबंध राखले. हो, मुद्दामच राखले. आपल्याला दादावर सूड उगवायचा होता..... होता? नव्हे.... सूड उगवायचा आहे. अस्वस्थ अशा मनस्थितीत रामजोशींनी पुन्हा एकदा नदीत सूर मारला. सारं पात्र जोरदार हिंदकाळून पुन्हा शांत झालं.

अनुक्रम

### ❑ संस्थानिकाचा थाट

इ. स. १७८२ ते १७९२ अशा दहा वर्षात रामजोशींनी साऱ्या महाराष्ट्रात आपल्या नितांत सुंदर लावणीरचनेने श्रोत्यांना तल्लीन करून सोडले. एखाद्या संस्थानिकाच्या थाटात आपल्या ताफ्यासह जेव्हा रामजोशी गावात प्रवेश करीत तेव्हा सारे लहानथोर कमालीचे आश्चर्य व्यक्त करीत. रामजोशींच्या ताफ्यात त्यांचे शार्गिद, वादक, हरकामे, चिमा, बया यांच्या बरोबरच एक उमदा घोडा, दोन कुत्री, दोन माकडे, दोन राघू असा भव्य सरंजाम असे. याशिवाय एक सुंदर झालरीदार राहूटी आणि सुंदर रेशमी काढण्याचा झोपाळा देखील असे.

गावात मुक्काम पडला की, राहुटी उभी केली जाई. एखाद्या मोठ्या झाडाला झोपाळा टांगून रामजोशी त्यावर बसले की, एखादा मोठा संस्थानिक गावभेटीला आला आहे असा भास होई. आपल्या कर्तृत्वाने मिळवेले अमाप द्रव्य जवळ असल्यावर कशाची कमी होती? केवळ द्रव्यच कशाला? कनक, कांता आणि कीर्ती या तीनही गोष्टी हात जोडून या मराठी सारस्वता पुढे उभ्या होत्या. त्यामुळे कशाचीही फिकीर करण्याचे कारणच काय होते? कविरायांच्या मुखातून शब्द निघण्याचा अवकाश की, पाहिजे ती वस्तू काही क्षणात हजर होई.

रामजोशींच्या खास काही आवडी-निवडी होत्या. पहिली आवड सौंदर्याची हे उघडच होते. परंतु केवळ मानवी सौंदर्याचेच ते चाहाते होते असे नाही तर शब्दसौंदर्य आणि अर्थसौंदर्याचेही ते उपासक होते. बयेवर तर रामजोशींचे मनच जडलेले होते. बयेच्या संगतीत आपली कविता रंगात आली याची कबुली त्यांनी दिलीच होती. अशारितीने संस्थानिकाच्या थाटात इष्काची उधळण करीत रामजोशींची गावोगाव भ्रमंती चाल होती. चैन, विलास यांनी परिसीमा गाठली होती. ‘अनंत हस्ते कमलावराने देता घेशिल किती दो कराने’ अशी अवस्था फडावरचा प्रत्येकजण अनुभवत होता. आलेल्या लक्ष्मीची मुक्त उधळण करीत, मन मानेल तसे बेधूट आयुष्य रामजोशी जगत होते. याच काळात काही शाक्त पंथियांची कविरायांशी गाठ पडली.

### ❑ शाक्त पंथाची दीक्षा

हिंदू धर्मातील पंथोपथंयाचा इतिहास पाहता त्यात शाक्तपंथ हा एक तांत्रिक पंथ आहे. ओरिसा, बंगाल इत्यादी पंथात पूर्वीपासून शाक्त पंथ कार्यरत आहे. वामाचारी असेही एक नाव या पंथास आहे. मद्य, मांस निषेध या पंथात नाही. या पंथाचा प्रसार रामजोशींच्या काळी पुण्यात फार झाला होता. अनेक उच्चवर्णियांनी शाक्तपंथाची दीक्षा त्याकाळी घेतलेली होती.

रामजोशींचा या पंथीय विचार धारेशी परिचय होऊन ते या पंथाकडे आकृष्ट झाले. या पंथाची दीक्षा घेऊन, रामजोशींनी कळसच गाठला. नीतिमूल्यांच्या पारंपारिक चौकटी रामजोशींना बालपणापासूनच मान्य नव्हत्या. आता तर या चौकटी तोडून, कविराय खऱ्या अर्थाने मुक्त झाले. राजरोस मद्यपान करून, बया आणि चिमा यांच्या संगतीत-

अनुक्रम

इष्काचे प्यालेही रिते करावयास ह्यांनी सुरुवात केली.

पुण्यासारख्या शहरात मराठे सरदारांचे रगेल नि रंगेल जीवन रामजोशी उघड्या डोळ्यांनी पाहात होते. सरदारांचे भव्य वाडे, हवेल्या, त्यात चाललेली चोरटी इष्कबाजी हे त्यांच्या नजरेतून सुटले नव्हते. संकेत करून प्रियकराला भेटायला जाणारी अभिसारिका त्यांच्या निरीक्षणातून सुटणे शक्य नव्हते. याचा परिणाम रात्री हिलालाच्या प्रकाशात तमाशाचा आरंभ होऊन, बयेच्या कोकिळकंठातून आलाप बाहेर पडताच रामजोशींची बोटे डफावर नर्तन करू लागत आणि मुखातून शब्द येत-

"सुंदरा मनामध्ये भरली जरा नाही ठरली हवेलित शिरली मोत्याचा भांग

अरे गड्या हौस नाही पुरली म्हणोनि विरली पुन्हा नाही फिरली कुणाची सांग"

शाक्तपंथाची दीक्षा घेतल्यापासून कविरायांच्या आयुष्याने वेगळेच वळण घ्यायला आरंभ केला. गावोगावच्या कार्यक्रमातून अफाट, कीर्ती आणि पैसा रामजोशींना मिळत होता आणि व्यसने, विलास इष्कबाजीत तो पाण्यासारखा खर्चही होत होता. दिवस भराभर चालले होते. कनक, कांता, कीर्ती यांच्या विळख्यामुळे धुंद झालेल्या कविरायाला वास्तवाचे भान राहिले नव्हते. येणारा प्रत्येक दिवस आपल्याच साठी, आपल्या बेधुंद आयुष्याचे स्वागत करण्यासाठीच उगवला आहे या भ्रमात व्यतीत होत होता.

**❑ पश्चातबुद्धी नि पंढरपूरकडे प्रयाण**

'कालो गच्छति धीमताम्' काळ हळुहळू पुढे सरकत होता. आणि कविरायांचे छंदफंद जराही कमी होत नव्हते. विलासी थाट कुठेही कमी होत नव्हता. पैसा ज्या प्रमाणात येत होता त्याच्या चौपटीने तो कविरायांच्या व्यसनापायी जातही होता.

आरंभी याची कुणालाच कल्पनाही आली नव्हती. कविराय आणि त्यांचा गोतावळा मौजमस्तीत मग्न होता. हळुहळू पैशांची चणचण निर्माण होऊ लागली. तथापि कविरायांच्या बेफिकीर वृत्तामुळे त्याची दखलअंदाजी त्यांनी घेतलीच नाही. आपली व्यसने आणि विलासी थाटामाटात राहणे यात कसलीच तडजोड करायला रामजोशी तयार नव्हते. फडाची व्यवस्था पाहाणाऱ्यांना दर दिवसाची व्यवस्था पाहणे कठीण जाऊ लागले. व्यवस्थेसाठी लागणारा पैसा कविरायांकडे मागायला जावे तर ते आपल्याच धुंदीत! मद्यधुंद अवस्थेत त्यांना कशाची शुद्धही नसायची.

अशी अवस्था आरंभ झाल्यावर. विपन्नावस्था यावयास कितीसा वेळ मिळणार? आणि घडलेही तसेच. हळुहळू कविरायांना लक्ष्मी सोडून जाऊ लागली. विलासी जीवन, उधळ्या

स्वभाव यामुळे पैशाची जबर चणचण भासू लागली. व्यसने आणि मिळणारी कमाई यांची तोंड मिळवणी होईना. एक एक दिवस परीक्षा पाहणारा ठरू लागला. आणि बघता बघता लक्ष्मीने कविरायांकडे पाठ फिरवली, आणि रामजोशी कफल्लक बनले. सनातनी 'दारुडी' म्हणून संभावना करू लागले. या सगळ्याचा पश्चाताप होऊन रामजोशी अंतर्मुख होऊन विचार करू लागले.

दिवस अत्यंत कठीण होते. प्रत्येक दिवस नव्या संकटाचा ठरू लागला. रामजोशींना ही अवस्था फारच जड गेली. निर्णय होईना. पण काहीतरी निर्णय घेणेही आवश्यक होते. शेवटी तमाशा सोडून द्यायचा कविरायांनी निर्णय घेतला. तो सर्वांना सांगितला. सारे जण डोळे फाडून कविरायांकडे पाहू लागले. शेवटी काही दिवस मला एकट्याला राहू द्या. मी पुन्हा तुम्हाला येऊन भेटेन असे काहीतरी सांगू, रामजोशींनी सर्वांचा निरोप घेतला. दुसरा इलाजच नव्हता. पण पुढे काय? हा प्रश्नही सुटलेला नव्हता.

फडाचा निरोप घेऊन, संथ पाऊले टाकत रामजोशी निघाले. मन पश्चातापदग्ध होऊन पोळत होते. विचारांचे थैमान डोक्यात चाललेले होते. वाट नेईल तिकडे चालत राहणे एवढेच हातात होते. चालताना एक विचार मनात चमकून गेला. मन आनंदले. बस्स! ठरले. असेच करूया. पंढरपूरला जाऊन बाबाकाकांना भेटायचे या विचाराने पायातली गती वाढली. गाव मागे पडले.

मजलदरमजल करीत, प्रचंड पायपीट करून रामजोशी पंढरपूरात दाखल झाले. दूरवर चंद्रभागेचे वाळवंट पसरलेले त्यांनी पाहिले. दूरून दिसणारा विठ्ठल मंदिराचा कळसही पाहिला. बाबांच्या भेटीची उत्सुकता ताणली जाऊ लागली.

बाबा पाध्ये हे पंढरपूरातील अत्यंत नावाजलेले संस्कृत पंडित होते. वेदशास्त्रसंपन्न असे पाध्ये घराणे, पंढरपूरातील अत्यंत प्रसिद्ध घराणे होते. जोशी घराणेही वेदशास्त्रसंपन्न शास्त्रीपंडितांचे असल्याने दोन्ही घराण्यांचा उत्तम स्नेह होता. बाबांजवळ विद्यार्जन करायचे. त्यासाठी लागतील ते कष्ट घ्यायची तयारी कविरायांनी मनाशी केली. या विचाराने डोक्यातील विचारांचे वादळ जरा कमी झाले. पाध्येशास्त्रींच्या घराकडे जाताना रामजोशींचे एकेक पाऊल आत्मविश्वासाने पडू लागले.

### ❑ वेदमूर्ती बाबा पाध्यांच्या सहवासात

राम पाध्येशास्त्रींच्या घरी पोहचला तेव्हा बाबा सकाळची अन्हिके आटोपून वेदविकृती म्हणत होते.

> "यज्ञेन यज्ञं यज्ञं यज्ञेन यज्ञेन यज्ञमयजन्त
> अयजन्त यज्ञंयज्ञेन यज्ञेन यज्ञमयजन्त

अनुक्रम

यज्ञमयजना अयजन्त यज्ञं यज्ञमयजन्त देवाः
देवा अयजन्त यज्ञं यज्ञमयजन्त देवाः"

शांतपणे डोळे मिटून, खर्ज स्वरात वेदविकृती म्हणणाऱ्या बाबांची ती गौरकाय भव्यमुद्रा पाहून राम प्रभावित झाला. बाबांची आणि रामची डोळाभेट होताच, बाबांनी त्याला आत बोलावले. विचारपूस केली. साऱ्यांचे कुशल पुसले, रामला ज्या परिस्थितीत घरातून बाहेर पडावे लागले. ती हकिगत ऐकताना, बाबांना किंचित वाईटही वाटले. पण स्थितप्रज्ञ असलेल्या बाबांनी 'गतं न शोच्यम्' असे म्हणत रामला घरात राहण्याची अनुमती दिली.

रामला काव्यशास्त्र, व्याकरण, वेदाध्यायन, कीर्तनकला इत्यादी विषय शिकविण्याचीही तयारी दर्शविली. राम मनोमन आनंदून गेला. रामच्या आयुष्याचा एक नवा अध्याय इथे चंद्रभागेतीरी सुरू होणार होता. स्वतःची आणखी एक वेगळी ओळख निर्माण करण्याची संधी रामला इथे मिळणार होती. मुळात तल्लख बुद्धीमत्ता आणि प्रतिभेचे जन्मजात लेणे लाभलेल्या रामच्या व्यक्तीमत्वाला इथे सुरेख पैलू पडणार होते. बाबा पाध्यांसारख्या कुशल शिल्पीच्या हातून नकळत एका 'कविरायाचे' शिल्प इथे घडवले जाणार होते.

पहिल्या दोन दिवसातच राम सुसंस्कृत अशा पाध्ये कुटुंबात रुळनू गेला. कुटुंबातील एक सदस्य अशा नात्याने बाबांच्या कुटुंबातील प्रत्येक जण त्याच्याशी वागत होता. त्यांच्या प्रेमाने राम भारावून गेला. सारे पाध्ये कुटुंब विद्याप्रेमी नि विद्याव्यासंगी म्हणून सर्वज्ञात होते. इतकेच कशाला? या कुटुंबाचे आप्तस्वकीयही विद्याप्रेमी असेच होते. आपल्या अप्रतिम काव्यरचनेने अबालवृद्ध मराठी माणसाला डोलायला लावणारे विख्यात पुराणिक आणि पंडितकवी मोरोपंत हे तर बाबांचे मित्र नि व्याहीदेखील होते.

बाबा पाध्ये हे तर केवळ पंढरपुरातच नव्हे तर साऱ्या महाराष्ट्रात वेदमूर्ती म्हणूनच प्रसिद्ध होते. त्यांच्या चरणापाशी बसून राम मनसोक्त विद्याव्यासंग करीत होता. काव्य, व्याकरण, वेदांत, याज्ञिकी अशा विविध विद्याशाखेत मुक्त विहार करत होता. संस्कृत भाषेचे वेगवेगळ्या अंगाने अनुभवत होता.

एकदा संस्कृत भाषेची थोरवी नि सामर्थ्य या विषयी बोलताना बाबांनी रामला कालिदास आणि भोज राजाची गोष्ट सांगितली. भोज, राजा असूनही व्युत्पन्न होता. तो एकदा जेवायला बसला आणि तो म्हणाला—

'विना गोरसं को रसं भोजनानाम्'
-भोजन उत्तम आहे पण गोरसा (गायीचे तुप) शिवाय त्यात मौज नाही.
कालिदास यावर म्हणाला, "खरे आहे हे, पण तुम्ही असे बघा...
विना गोरसं को रसं भूपतिनाम्'

अनुक्रम

-राजा श्रेष्ठ आहे, पण त्याच्या बाहूत (गो) बळ नसेल तर काय अर्थ आहे. किंवा
'विना गोरस को रसं कामिनीनाम्'
कमिनी (स्त्री) सुंदर आहे पण तिला जर नेत्रच (गो) नसतील तर?....आणि....
'विना गोरसं कोर सं पंडितानाम्'
-पंडित श्रेष्ठ आहे तथापि त्याला वाणीच (गो) नसेल तर काय अर्थ आहे?

'गो' हा संस्कृत धातु कालिदासाने अशा रीतीने तीन वेळा चालवून दाखवला. राम बाबांच्या तोंडून संस्कृतचे माहात्म्य ऐकताना मंत्रमुग्ध होऊन गेला. आपल्याला असे काही वेगळे जमेल काय? कितीतरी वेळ मग तो या विचारात गढून गेला.

पाध्ये कुटुंबाने रामला भरभरून प्रेम दिले. बाबांनी हातचे काहीच राखून न ठेवता रामला गीर्वाण भाषेत पारंगत करून सोडले. आणि पंढरपूर तीर्थ क्षेत्राने जातीभेदाच्या भिंती तोडल्याशिवाय भक्तीभावनेला काहीच अर्थ नाही हा संदेश रामच्या मनावर पक्का बिंबवला.

चंद्रभागेच्या वाळवंटात व्यक्तीगत स्वार्थ जाळून लाखो लोक एका विठ्ठलसाठी कसे एकत्र येतात हे राम पाहत होता. अठरा पगड जातीची माणसे विठ्ठल भक्तीत सारे भेदाभेद विसर्जित करून एकमेकांना उराउरी भेटताना तो बघत होता. या साऱ्या गोष्टींचा रामच्या मनावर सखोल परिणाम होत होता. एकदा असाच सकाळची अन्हिके आटोपल्यावर राम चंद्रभागेच्या वाळवंटात आणि विठ्ठल मंदिर परिसरात पाय मोकळे करण्यासाठी गेला. विठ्ठल मंदिरातले ते सावळे सुंदर ध्यान पाहिल्यावर रामची तंद्री लागली अनिमिष नेत्रांनी ते वैभव डोळ्यात साठवताना तो गुनगुनु लागला.....

"क्षमातली इज समान नाही उमामहेश्वर पुरी ।
पुरी पडेना काशी मग इतरा दासी न कोण असी हो पंढरी ॥
पांडुरंग जगदंतरंग जीमाजि रंगला धणी ।
पार्श्वि रमा रखुमाई पृष्ठतो राहि जशी सुखाची खणी ।
............
असो महार यातिचा जातीचा हरिच्या भागवतोत्तम कवी
..............
उभी नदीच्या काठी जन येती भेटी वकीलसा पालवी...."

### ❑ पाध्ये कुटुंबियांशी बंध-अनुबंध

रामजोशींची पंढरपूर भेट अनेक दृष्टींनी संस्मरणीय ठरली. पाध्ये कुटुंबियांनी दिलेलं प्रेम आणि दैनंदिन जीवनातील शिस्तीचा आग्रह यामुळे रामजोशींच्या व्यक्तीमत्वाला एक वेगळेच पैलू इथे प्राप्त झाला.

अनुक्रम

ब्राह्ममुहूर्तावर उठून प्रातर्विधी आटोपून अभ्यासाला लागायचे नंतर हलकी न्याहारी घेऊन पाध्ये कुटुंबियांची व्यक्तीगत कामे करून, पुनश्च अभ्यास, उजळणी, नैमत्तिक कामे यामुळे रामचीही दृष्टी व्यापक होत चालली.

एक अनोखा अनुभव घेत रामजोशींचे व्यक्तीमत्व इथे समृद्ध होत चालले. स्वच्छंदी जीवनाचा अनुभव घेत वाटचाल करणारे रामजोशी इथे शिस्तीचाही एक अनोखा अध्याय अभ्यासू लागले. पाध्ये कुटुंबातली सारी माणसे प्रेमळ, सरळपणाने वागणारी, आपल्या घराण्याचा आब राखून होती. मुदगलशास्त्री आणि त्यांचे घराणे याविषयी पाध्ये कुटुंबियांना खूप जिव्हाळा होता. जोशी घराण्याप्रमाणेच पाध्ये कुटुंबियांनाही विद्यार्जन, प्राच्यविद्या याविषयी कमालीचा आदरभाव होता. मोरोपंतांच्या भेटीने तो अधिकच दृढ होत गेला.

पंडित कवी मोरोपंत अधूनमधून पंढरपूरास येत तेव्हा पाध्ये कुटुंबियांबरोबर त्यांची जमलेली मैफल ही ज्ञानपिपासूंना तर पर्वणीच वाटे. मोरोपंतांची आर्या म्हणायची लकब त्यातून निघणारे विविध अर्थ यामुळे ऐकणाऱ्याचे कान तृप्त न झाल्यासच नवल! मोरोपंतांविषयी पाध्ये कुटुंबाकडून ऐकलेल्या गोष्टींमुळे रामजोशींच्या मनात मोरोपंताविषयी आकर्षण निर्माण झाले. या पंडितकवीची आणि आपली भेट कधी होईल या विचाराने त्यांच्या मनाला हुरहूर लागून राही.

या अध्ययन काळात रामजोशींना बाबापाध्यांनी कितीतरी गोष्टींची शिकवण देऊन त्यांच्याकडून सखोल विद्याभ्यास करवून घेतला. विशेषतः संस्कृत भाषेबरोबरच ज्ञानेश्वरी, दासबोध, नाथांचे रुक्मिणीस्वयंवर अशा ग्रंथांचा परिचय करवून दिला. अधिकधिक ग्रंथवाचनाला प्रवृत्त केले. प्रोत्साहन दिले.

ज्ञानेश्वरीतील ओव्यांवर बाबा सुरेख भाष्य करीत. ज्ञानेश्वरांनी व्यक्त केलेला मराठी भाषेबद्दलचा अभिमान या विषयीच्या ओव्या ऐकताना, रामजोशी अंतर्मुख होत. विचार करीत.

दुपारच्या वेळी जुन्या हस्तलिखितांची पाने कशी लावायची हे सप्रयोग बाबा दाखवित. जुनी कागदपत्रे, हस्तलिखित यातून केवढे सांस्कृतिक संचित साठवलेले आहे याची प्रत्यक्ष प्रचिती रामजोशी या काळात घेत होते. इतके नव्हे तर जुने ग्रंथ नव्याने नकलून घेताना, कागद कसा असावा, शाई कशी तयार करावी, प्रमाणबद्धता कशीराखावी, या साऱ्या बारीकसारीक गोष्टीही रामजोशींना शिकायला मिळाल्या. या साऱ्या गोष्टी आत्मसात करतानाच बाबांशी घडणाऱ्या संवादातून, ज्ञानाच्या एकेक यत्ता रामजोशी उत्तीर्ण होत होते. एकदा असेच दुपारी दोघेही बसले असता बाबा म्हणाले-

“राम, केवळ प्राचीन ग्रंथांची घोकंपट्टी म्हणजे शिक्षण नव्हे. ग्रंथातील अर्थ आपल्याला समजतो का? या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यानुसार केलेले आचरण होय, काय समजलास?”

अनुक्रम

-रामने होकारार्थी मान डोलावताच बाबा पुढे म्हणाले-

"हा झाला एक भाग. दुसरी गोष्ट म्हणजे आपल्याला प्राप्त झालेल्या ग्रंथांची काळजी घेणे. तू ग्रंथांची पाने कशी चाळतोस यावरूनही तुझ्या व्यक्तीमत्वाची परीक्षा होते. आणि नव्याने नक्कल करताना, तू हस्ताक्षराकडेही लक्ष पुरविले पाहिजे. अरे, तुझ्या हस्ताक्षरावरून तुझ्या मनाचीही ठेवण कळते, बरं का! ज्याचं हस्ताक्षर सुंदर त्याच मनही सुंदर असते. हे- हे सारं शिक्षण आहे. केवळ घोकंपट्टी करणाऱ्यांबद्दल कविराज तुकोबा काय म्हणतात ठाऊक आहे ना, 'वेदांचा तो अर्थ आम्हांनीच ठावा, येऱ्यांनी वाहावा भार माथा' काय, कळले ना!"

अशा रितीने रामजोशीं बाबांकडून एकेककरून कितीतरी गोष्टी शिकले. पंढरपूरातले दिवस रामला खूप काही देऊन गेले. 'नित्य नवा दिवस जागृतीचा' या प्रमाणे बाबा रोज रामजोशींकडून नव्या नव्या गोष्टी करवून घेत होते. पाध्ये कुटुंबाबरोबरच हा बंध-अनुबंध रामच्या पुढच्या वाटचालीत भक्कमपणे त्याच्या उपयोगास आला. त्याला योग्य दिशा दाखवून गेला.

याच काळात महाराष्ट्रातली अत्यंत लोकप्रिय आणि प्रबोधनाची कला, कीर्तनकला याचा रामजोशींचा अभ्यास बाबांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थित सुरू झाला. कीर्तनकलेची परंपरा, प्रबोधन करण्याची या कलेची ताकद, कीर्तनकाराने पाळावयाची पथ्ये या साऱ्या गोष्टी रामजोशींनी बाबांनी यथास्थित शिकवून याही कलेत त्यांना पारंगत करून सोडले. रामजोशींचा अध्ययनकाळ अशारितीने हळूहळू संपत आला. समृद्ध झालेल्या व्यक्तीमत्वाने आता बाबांचा निरोप घेण्याची तयारी चालविली.

### ❑ पाध्ये कुटुंबाचा निरोप

पंढरपुरातील आपले अध्ययन संपवून रामने पाध्ये कुटुंबाची अनुमती मागितली. रामला निरोप देताना बाबांच्या आणि रामच्याही डोळ्यात अश्रू तरळून गेले. सर्व कुटुंबियाविषयी कृतज्ञता व्यक्त करून राम स्वगृही येण्यास निघाला.

बाबांनी दिलेले विद्याधन आणि त्यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या प्रेमाची शिदोरीबरोबर घेऊन रामचा प्रवास सुरू झाला. मजल दरमजल करीत तो तुळजापूरास आला. तुळजापूरविषयी रामच्या मनात बालपणापासूनच एक अनामिक आकर्षण दडलेले होते. तुळजा भवानीचे दर्शन घेण्यासाठी राम मंदिरात आला. असंख्य भक्तगणांनी मंदिर नुसते फुलून गेले होते. जो तो आपापल्या परीने जगन्मातेजवळ प्रार्थत होता. भवानी मातेचे रूप डोळ्यात मावत नव्हते. ते मूर्तीमंत तेज डोळा भरून पाहताना रामच्या ओठातून शब्द बाहेर पडले.

> "भूतळात जशि या स्थळात यमुनाचळात हिमनग बाळा..
> अशी भुवनत्रयि कोणती दुजी वेल्हाळा...

अनुक्रम

मन सुमन करुनि विषवमन गणुनि रतिरमण शिवाची राणी.
भजता देते नित्य सुखाची खाणी....
............
ही सदा सकळ संपदासहित श्रीपदासही जपमाळा.......
भक्ताची माय कनवाळू दिसे चिल्लाळा...
............
कविराय म्हणूनि हिचे पाय धरुन गुण गाय छंद सुरताला....
या कृपानदीचा न कळे हे दुर्लभ खळ. घोटितातचि लाळा
....................."
तुळजा भवानीचे दर्शन घेऊन राम सोलापूरच्या रस्त्याला लागला.

### ❑ स्वगृही परत

चातुर्मासाचे दिवस असल्याने, साऱ्या सोलापूरात धार्मिक कार्यक्रमांची नुसती धांदल उडाली होती. कथा कीर्तने, व्रत वैकल्ये यांचा जिकडे तिकडे थाट उडालेला होता. मुद्गलशास्त्रींची महाभारतावर विठ्ठलमंदिरात नियमित प्रवचने सुरू होती.

महाभारत कथा आरंभ करून काही दिवस लोटले नाही तोच मुद्गलशास्त्रींची प्रकृती अचानक बिघडली. ज्वराचे निदान झाले. वैद्यबुवांनी त्यांना काही दिवस विश्रांती घेण्यास सुचविले. मुद्गलशास्त्री अस्वस्थ झाले. अत्यंत नियमित दिनचर्या असलेल्या मुद्गलशास्त्रींना आता भारत कथेत खंड पडणार या विचाराने काही सुचेनासे झाले. श्रोतृवर्ग हळहळला. पण कोणाचाच इलाज नव्हता. मुद्गलशास्त्री वैद्यबुवांनी दिलेले पथ्य सांभाळीत अंथरुणावर पडून होते.

गंगाबाई त्यांच्या प्रकृतीला उतार पडावा म्हणून दिवसरात्र शुश्रुषा करीत होत्या. मुळात तापट असलेले मुद्गलशास्त्री या दुखण्याने अधिकच चिडचिडे बनले. लोक भेटायला येत तेव्हा ते प्रकर्षाने जाणवे. त्यातच रामचा विषय निघाला की, त्यांचा तोल जाई. गंगाबाईंना मग त्यांची समजूत घालताना नाकी दम येत असे.

याच वेळी राम सोलापूरात येऊन दाखल झाला. वेशीतून आत येताना त्याला मागचे एक एक प्रसंग आठवू लागले. रामचा पूर्वीचा पेहराव आता बदलला होता. उंच धिप्पाड शरीरयष्टी आणि गौरवर्ण लाभलेल्या रामने मस्तकावर सुरेख चित्रकुटी गंध रेखले होते. पांढरेशुभ्र धोतर आणि बाराबंदी अशा वेशातल्या रामला म्हणूनच बऱ्याच जणांनी ओळखलेच नाही. आणि एकाएकी त्याला धोंडी भेटला. त्याने रामला ओळखले. धोंडीची व्यसनापायी पार दुर्दशा झाली होती. रामने त्याची आस्थेने चौकशी केली. पण धोंडीला नशेत असल्याने धड बोलताही येत नव्हते.

धोंडीच्या बोलण्यातून त्याचा फड मोडला आणि दादाची प्रकृती बरी नाही या गोष्टी रामला कळल्या. धोंडीचा निरोप घेऊन तो झपझप वाड्याच्या दिशेने निघाला.

राम वाड्यात पोहचला तेव्हा गंगाबाई मुद्‌गलशास्त्रींना वैद्यबुवांनी दिलेले चाटण चाटवित होत्या. राम आला हे त्यांना कळले, त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्या म्हणाल्या,

“अहो, अहो आपला राम परत आलायं. बघा तर खरे!”
रामने दादाला हाक मारली.
“दादा, मी -मी राम....”

मुद्‌गलशास्त्री अर्धवट गुंगीत डोळे मिटून पडलेले होते. त्यांचा चेहरा म्लान झाला होता. दुखण्यातून उतार पडत नव्हता. रामचे शब्द त्यांनी ऐकले मात्र ते एकदम भडकले.

“कुळबुडव्या कशाला आला आहेस आता? जा चालता हो, आताच्या आता, मला तुझे तोंड देखील...” मुद्‌गलशास्त्रींना जोरदार खोकल्याची उबळ आली. गंगाबाईंनी पुन्हा चाटण देण्याची तयारी चालवली. रामने दादाची छाती चोळावी म्हणून पुढे केलेला हात मुद्‌गलशास्त्रींनी झिडकारून टाकला.

“अरे नादाना, बालपणापासून गीर्वाण भाषेकडे जरा लक्ष दे, म्हणून तुझ्या कानीकपाळी ओरडलो, पण व्यर्थ! तुला थोडी जरी अक्कल असती... तर माझ्यावर हा प्रसंग येता ना...”

“दादा, मी जाईन आज भारतकथा सांगायला पण तुम्ही शांत राहा.” राम कळवळून म्हणाला. आता मात्र मुद्‌गलशास्त्रींचा तोल सुटला. ते मोठमोठ्याने ओरडू लागले. गंगाबाई त्यांना शांत करण्याची खटपट करू लागल्या.

“काय म्हणालास? अरे चांडाळा, डफ आणि ढोलगं वाजविण्या इतके सोपे वाटले की काय तुला? म्हणे मी सांगतो भारतकथा! पुराणे सांगणे म्हणजे डफावर थाप देणे नव्हे! काय समजलास? गाढव जर गुळ हागते तर कुंभार भीक का मागते? साऱ्या कुळाला तू बट्टा लावलास आणि आता चाललास भारतकथा सांगायला. चालता हो इथून!”

मुद्‌गलशास्त्रींनी तोंड फिरवून घेतले. बोलून बोलून त्यांना धाप लागली होती. गंगाबाई झाल्याप्रकाराने सुन्न बसून राहिल्या. राम काहीच बोलला नाही. त्याने घरातून पोथी शोधून काढली. गंगावहिनीला नमस्कार करून त्याने विठ्ठल मंदिराची वाट धरली.

### ❑ पुराणिक बुवा - रामजोशी

म्हादु तराळाने दवंडी दिली... “ऐका हो ऐका... आज रात्री विठ्ठल मंदिरात रामजोशीबुवा पुराण सांगणार होऽऽऽ” या दवंडीने जिकडे तिकडे खळबळ उडाली. जो तो आश्चर्य व्यक्त करू लागला. मुद्‌गलशास्त्रींचा भाऊ राम पुराण सांगणार? लोक नाना प्रकारचे तर्क, वितर्क करू

लागले. कुणी म्हणाले, त्याला पुराणाचा तमाशा करायचाय, कुणी म्हणाले, त्यांना काय कपाळ कळते पुराणातले? आणि महाभारत कथा सांगणे हणजे काय ढोलगं बडवण्या इतके सोपे आहे काय? लोकांच्या चर्चांना उत आला. ज्याच्या त्याच्या मुखी रामचाच विषय.

राम विठ्ठल मंदिरात पोहचला तेव्हा लोकांची ही तोबा गर्दी या नव्या पुराणिक बुवाला पाहण्यासाठी उसळली. लहान-मोठे, तरणेताठे, हवशे, गवशे, नवशे साऱ्यांनीच विठ्ठल मंदिर फुलून गेले होते. ज्याला त्याला उत्कंठा होती. मुद्‌गलशास्त्रींचा भाऊ आज काय सांगणार याचीच.

रामने विठ्ठलाचे दर्शन घेतले. तो व्यासपीठावर जाऊन बसला. साऱ्या श्रोत्यांवर नजर फिरवून त्याने मंदास्मित केले. लोकांची उत्कंठा शिगेला पोहचली. कुतूहल, आश्चर्य, भीती, उपहास, उपेक्षा हे भाव असलेल्या असंख्य नजरा रामवर खिळून राहिल्या. रामने शांतपणे वीणा स्वरात जुळवला. शांतपणे वीणा छेडत त्याने आरंभ केला. “नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम्...”

देवी सरस्वती व्यास ततो जय मुदीरयेत्...
ॐ नमो भगवते वासुदेवाय
ॐ नमो पितामहाय....ॐ नमो प्रजापतिभ्यः
ॐ नमो कृष्णद्वैपायनाय....ॐ नमो सर्वविघ्नविनायकेभ्यः

रामने क्षणभर डोळे मिटून घेतले. जो तो एकमेकांकडे पाहात आश्चर्य व्यक्त करू लागला. मंदिरात कमालीची शांतता पसरली आणि रामने पहाडी आवाजात म्हणायला सुरुवात केली....

“व्यास भारती कथन भांडती पांडवकौरववीर
पार्थरथी सारथी यदुवीर
कुरुक्षेत्राचे ठायी लढाया युद्धसमयी म्हणऊन
महा महा वीर उभे येऊन
सात क्षोणी पांडव कौरव आकरा क्षोणी जमऊन
दोन्ही दळे सिद्ध होऊन
अठरा क्षोणी म्हणती परी एकाचे एक ऐकून
कुणी न पाहता शोधून
काय बोल ग्रंथाला वाचिक अर्थ काढिना नीर
पदार्थी काय फिरून परवीवर
.............
कविराय गुणी करीत कवन हे नाथ कृपेचा धीर
शास्त्रसंमत अर्थाचे तीर.....”

अत्यंत रसाळ भाषेत आणि प्रभावीपणे भारतकथा सांगताना वक्ता आणि श्रोते दोघांचीही समाधी लागली. श्रोते देहभान हरपून कथेचा आस्वाद घेत होते. आपण समजलो त्यापेक्षा हा अनुभव किती वेगळा आहेयाची

प्रत्येकाला जाणीव झाली. सारे श्रोते श्रवण सुखाच्या अमृत सरितेत न्हाऊन निघाले. जो तो या नव्या पुराणिकबुवांना दाद देत आता त्यांची स्तुती करू लागला. हा हा म्हणता साऱ्या सोलापूरात ही वार्ता घराघरात जाऊन धडकली. रामची कीर्ती सर्वदूर पसरू लागली.

## ❑ दादाचा राग निवळतो

रामच्या वक्तृत्वाचा श्रोत्यांवर चांगलाच परिणाम झाला. रामचे पूर्वायुष्य विसरून जो तो रामची स्तुती करू लागला. रामची फजिती पाहण्यासाठी विठ्ठल मंदिरात जमलेल्या हवश्या, गवश्यांची रामने आपल्या व्युत्पन्न प्रतिभाशक्तीने चांगलीच फजिती केली होती. संस्कृताभिमानी अशी जी मंडळी सोलापूरात होती. त्यांचा अभिमान रामने पार धुळीस मिळवला होता. फजित पावलेली ती सारी मंडळी मुद्‌गलशास्त्रींना भेटावयास आली. त्यांनी सांगितलेल्या हकिगतीवर प्रथम मुद्‌गलशास्त्रींचा विश्वासच बसेना. तथापि ही बुजूर्ग मंडळी असत्य निवेदन करणार नाहीत, हे माहीत असलेल्या शास्त्रीबुवांनी प्रकृतीला आराम पडताच प्रत्यक्षच येऊन खातरजमा करण्याचे ठरवले आणि घडलेही तसेच.

मुद्‌गलशास्त्री एके दिवशी गुपचूप विठ्ठल मंदिराच्या ओटीवर येऊन बसले. विठ्ठल मंदिर श्रोत्यांनी नुसते फुलून गेले होते. भारत कथा सांगणाऱ्या रामने आज विशेषच बहार उडवून दिली होती. श्रोते श्रवणसुखाच्या सिंहासनावर बसून अमृतपान करीत असल्याचे विलक्षण दृश्य मुद्‌गलशास्त्रींनी याचि देही याचि डोळा पाहिले.

“राम...आपला राम...आपण समजलो....वाया गेला.... परंतु नाही...रामने आपल्या कुळाचे नाव तर राखलेच... पण उज्ज्वलही केले..” मुद्‌गलशास्त्रींच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. राम.. वाया गेलेले पोर... असे आपण समजलो... रामला आतापर्यंत आपण अवमानकारकच वागवले याचा पश्चाताप होऊन मुद्‌गलशास्त्री अधिकच व्यथित झाले.

पश्चातापदग्ध दोन अश्रूच माणसाला योग्य मार्ग दाखवतात. याचा साक्षात अनुभव मुद्‌गलशास्त्री घेत होते. त्यांनी ठरवले रामला इथून पुढे अवमान नाही तर सन्मान द्यायचा. आपण रामला समजून घेण्यात चूक केली का? त्यांना काहीच कळेना. तथापि आजपासून रामला जे बालपणी आपण प्रेम दिले, तेच द्यायचे त्यांनी मनोमन ठरवले.

रात्र दुसऱ्या प्रहराकडे झुकत असतानाच, रामने त्या दिवसाचे निरुपण संपवले. लोकांची पांगापांग होत असतानाच रामने एक अद्‌भूत नवलाव पाहिले. उंबरठ्यावर दादा अस्वस्थ मुद्रेत उभा असलेला त्याने पाहिला मात्र, तो धावतच तिकडे निघाला.

“दादा, दादा....” म्हणत त्याने दादाच्या कुशीत शिरून, अश्रूंना वाट करून दिली आणि मुद्‌गलशास्त्रींची सावली हिलालाच्या प्रकाशात थरथरत राहिली.

❑ **नाचू कीर्तनाचे रंगी**

सोलापूरातील प्रवचनाने रामजोशींनी लोकांची मने जिंकली. आता गावोगाव त्यांना कीर्तनाची बोलवणी येऊ लागली. वेदमूर्ती बाबा पाध्यांकडून संस्कृतचे अध्ययन आणि कीर्तनकला आत्मसात करून आलेल्या रामजोशींनी आता कीर्तन माध्यमातून प्रबोधनाला सुरुवात केली. कविरायांची वाणी कीर्तन रंगी रंगू लागली.

रामजोशींच्या आयुष्याचा एक नवा अध्याय आता सुरू झाला होता. ढोलकी आणि डफाच्या साथसंगतीने रंगात येणारी लावणी आता मृदंग, वीणा आणि मंजिऱ्याच्या संगतीत अधिक प्रौढ, समंजस आणि विरागी बनून सामान्यांना उपदेश करू लागली होती. रामजोशींच्या कीर्तनाला सामान्य लोकच नव्हे, तर बुजूर्ग मंडळीही हजेरी लावू लागले.

सामान्यांसाठी रामजोशींची वाणी प्रगट होताना, म्हणू लागे-

> "अरे सख्या समज धर काही... हरिवाचून संसारी
> कुणाची भर करशिल सारी
> अरे सख्या मानसिल माझे धनसुत हे मतिमंदा
> मनामध्ये न धरशी गोविंदा
> अशा नरदेही स्वहिताचा कर धंदा नको मन विषयावर तिंदा
> ....................
> स्वहित कविराया विसरुनिया अवतारी
> कुणाची भर करशिल सारी...."

जनसामान्यांना डोलायला लावणारी कविरायांची वाणी बुजूर्गांसाठी मात्र कधी गीर्वाणभाषेत गर्जू लागे-

> "अयि भज मानव! रघुवीरम्
> निशिचररणधीरम्
> श्रममहि मा कुरु दारधने किं तव सुजातम्
> किं भ्रमणैरिह कालवने कुरुषे निजघातम्
> न हि करुणा सहसा मदने पश्यसि किमुपातम्
> .....................
> शरणं यदि वद वदनदिती दुर्भवे दशरथसुत मां पाहि
> कविरायालंकृतिहीरं दर्शित भवतीरम्..."

कविरायांच्या प्रभावी, पहाडी आणि तरीही मधूर वाणीने श्रोते तृप्त होऊन जात. पुनः पुन्हा कीर्तनरंगी अगदी तल्लीन होऊन जात.

अनुक्रम

वेदमूर्ती बाबापाध्यांसारखा आचार्य लाभलेले कविराय, बाबांनी शिकविलेली सारी विद्या आता कीर्तनातून प्रकट करू लागले. बाबांच्या चरणाशी गिरवलेले ज्ञान आता कवितेतून सांगू लागले. चंचल मन कितीही प्रयत्न केला तरी स्थिर होत नाही अशा वेळी माधवाचे चरण धरून, चातुर्याने हित साधले पाहिजे. हे सांगताना भावूक बनलेले कविराय पहाडी आवाजात सुरू करत–

"का रे मनी माधवाचे चरण धरा ना
किती कथितो हित काही करा ना
चंचल मन नोव्हे स्थित निकराने
हे वदती श्रुतिशास्त्र पुराणे
झडकरी सांभाळावे हित चतुराने
व्यर्थ कसे भ्रमता तिमिराने
................
हरिगुण गायकांच्या हृदयी शिराना
सुखकर हा कविराय वराना"

अशा रितीने पुन्हा एकदा रामजोशींचा महाराष्ट्रभर संचार सुरू झाला. तथापि मुळ स्वभावातील काही दोष कविरायांना घट्ट चिकटून बसले होते. उधळेपणा हा जणू पाचवीलाच पुरलेला होता. मोकळेपणाने खर्च करण्याच्या सवयीने आताही पैसा हाती टिकेना.

दरवर्षी नवरात्रात तुळजापूर येथे रामजोशींची कीर्तने होत. यासाठी त्यांना सरकारकडून पंचवीस रुपये बिदागी ठरवून दिलेली होती. एकदा एका नवरात्रोत्सवात तुळजापूर येथे आले असता त्यांनी स्थानिक व्यापाऱ्याकडून पासष्ट रुपयांची उचल घेतली. व्यापारी नंतर त्यांना परतफेड केल्याशिवाय सोडेना. शेवटी कविरायांनी लेखणी उचलून मुद्‌गलशास्त्रींना सदर हकिगत एक श्लोक लिहून कळविली.

"येथे येऊनि आज दीड महिना पासष्ट मुद्रा पहा
झाली शुद्ध उचापत प्रभुवरे केली बिदागी दहा
येथे वार्षिक पंचवीस मजला देऊनि बा तोडितो
दादा तीस दिल्याशिवाय मजला वाणी कसा सोडितो"

समयसूचकता हा मोठा गुण रामजोशीकडे होता. त्यांच्या निरीक्षणातून अगदी बारीकसारीक गोष्टीही सुटत नसत. आपल्या कीर्तन दौऱ्यात कविरायांचा मुक्काम एकदा इचलकरंजीला झाला. इचलकरंजीकर घोरपडे यांच्या घरी कीर्तन चालू असताना, घोरपडे यांचे एक आश्रित कोठवळे व इतर मंडळींमध्ये बुवांना बिदागी किती द्यायची, यावर आपसात बुवांच्या न कळत खलबते सुरू होती. रामजोशींच्या चाणाक्ष नजरेने सारे काही जाणले आणि उत्तररंगात कविरायांनी त्यांना सुनावले.

"भोजासम कविताप्रिय, कर्णापरि दानशूर घोरपडे

ऐसें असता माझ्या, देणगीचा का? तुम्हांसि घोर पडे”

हे ऐकताच घोरपडे यांनी कविरायांचा उचित सन्मान करून बिदागी दिली. असो, अशा रितीने-

“नाचू कीर्तनाचे रंगी
ज्ञानदीप लावू जगी”

या उक्तीनुसार रामजोशींची कीर्तनयात्रा अखंड चालू होती. याच काळात पुन्हा फडावरची मंडळी त्यांना येऊन मिळाली. त्यांच्यासमवेत दौरे करताना आता आणखी एका व्यक्तीची त्यात भर पडली. ही व्यक्ती म्हणजे कविरायांची धर्मपत्नी उमा ही होय. पतीचा मनस्वी स्वभाव चांगला माहित असलेली तीएक सालस, सोशिक, घरंदाज स्त्री होती. तिच्या समावेत कविराय आता तीर्थक्षेत्री भेटी देऊ लागले. तीर्थक्षेत्रांची अप्रतिम वर्णने कीर्तनात ऐकवू लागले.

**❑ हटातटाने पटा रंगवुनि जटा धरिशि का शिरी**

आपल्या कीर्तन यात्रेत गावोगाव फिरता फिरता कविरायांचे कीर्तन स्वगृही सोलापूरी झालेच पाहिजे असा काही मित्रमंडळींचा आग्रह पडल्याने रामजोशी एक दिवस सोलापूरात डेरे दाखल झाले. सोलापूरात कविरायांचे चाहते जसे होते. तसेच त्यांचे विरोधकही होतेच.

कविरायांचे पूर्वायुष्य माहित असल्याने सनातनी मंडळी नाके मुरडत. जोशीबुवांचे कीर्तन नाथमठात व्हावे यासाठी सोलापूरकर मंडळी शुभराय नावाच्या मठाधिपतींना जाऊन भेटले. शुभराय हे चांगले कवी असून, मातृभाषा कानडी असूनही त्यांनी मराठीभाषेत उत्तम अशी पारमार्थिक रचना केलेली होती. तथापि शुभराय हे कर्मठ असल्याने, रामजोशीसारख्या ‘दारुडी’चे मला तोंड देखील पाहायचे नाही मग कीर्तनाचे नाव देखील नको. असे म्हणून त्यांनी मंडळींना परत पाठवले. मंडळी हिरमुसून कविरायांना जाऊन भेटली.

रामजोशींनी मंडळींना समजावले. मठात कथा करण्याऐवजी, मठाबाहेर मंडप टाकून कथा करणा्चे ठरले. रामजोशींवर प्रेम करणाऱ्यांनी कीर्तनाला अलोट गर्दी केली. कविरायांनी आज विशेष बहार उडवून दिली. धर्म, अध्यात्म, भक्ती म्हणजे काय याचे विवेचन करतानाच, धार्मिक क्षेत्रातील दांभिकतेवर कोरडे ओढताना कविरायांची वाणी धारदार बनली.

शुभरायांच्या निमित्ताने आज रामजोशींची वाणी मुक्त होत होती. कर्मठता म्हणजे धर्म नव्हे, कर्मकांड म्हणजे धर्म नव्हे. भक्ती हा प्रदर्शनाचा विषय नाही ती वृत्ती असावी लागते. टिळेटोपीगंधमाळा यातच धन्यता मानून खऱ्या धर्माकडे पाठ फिरविणाऱ्यांचा खरपूस समाचार घेताना कविरायांची वाणी गर्जू लागली.

“भला जन्म हा तुला लाधला खुलास हृदयी बुधा

धरिसी तरि हरिचा सेवक सुधा
चराचरी गुरु तरावयाला नरा शिरांवरि हरि
जरा तरि समज धरी अंतरी
हटातटाने पटा रंगवुनि जटा धरिशि का शिरी
मठाची उठाठेव कां तरी
काय गळ्यात घालुनि तुळशीची लांकडे
ही काय भवाला दूर करितिल माकडें
...............
भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा
वर्म कळेना धर्म घडेना कर्म चित्त न द्विधा
सदा हरि कविरायावर फिदा...."

कविरायांच्या वाणीचा एक वेगळाच पैलू आज श्रोत्यांना कळला. अन्याय, दांभिकता यांच्यावर तुटून पडताना रामजोशींनी आज कीर्तनकार म्हणूनही आपला वेगळा परिचय साऱ्यांना करून दिला. कविरायांच्या या समयसूचक कृतीने अनेक गोष्टी लोकांना कळल्या. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कविराय हे लोकांना आपले वाटत. हा माणूस सोवळे-ओवळे, कर्मठता, जातीपातीचा विचार न करता आपल्यात मिसळतो याचेच लोकांना कौतूक वाटे. निःसंशय कविराय सामान्याचे प्रतिनिधी होते.

गरीब आणि श्रीमंत, विद्वान व अशिक्षित, सुसंस्कारी आणि कुसंस्कारी, राजा आणि प्रजा या साऱ्यांना जोडणारा रामजोशी हा एक अफलातून दुवा होता. म्हणूनच त्यांची ठसकेबाज लावणी ऐकताना जेवढी गर्दी उसळे तेवढीच गर्दी त्यांच्या उपदेशपर लावणीसाठी, ती ऐकण्यासाठी होई.

### ❑ शंकराचार्यांचा राग निवळतो

नाथमठातील रामजोशींच्या कीर्तनाने आणि त्यांनी केलेल्या टीकेमुळे सोलापूरातील सनातनी मंडळी कविरायांवर चांगलीच संतापली होती. रामजोशींना धडा शिकविण्याचा चंग या मंडळींनी बांधला. सनातनी मंडळी कुठले तरी निमित्त शोधीतच होती. शेवटी चिडून त्यांनी रामजोशींवर बहिष्कार घालायचे ठरविले. सर्वानुमते रामजोशींना जातिबहिष्कृत करायचे ठरून, झालेही तसेच रामजोशींना कोणी पंक्तीसही बोलवेना. रामजोशींना ही गोष्ट समजली ते गप्प राहिले.

याच दरम्यान शृंगेरी मठाच्या शंकराचार्यांचे सोलापूरी आगमन झाले. रामजोशींच्या घराजवळील विठ्ठल मंदिरात शंकराचार्यांचा मुक्काम होता. या मुक्कामात शंकराचार्यांची गाठ घेऊन, या सनातनी मंडळींनी रामजोशींबद्दल, त्यांच्या वर्तनाबद्दल नाही नाही ते सांगून शंकराचार्यांचे मन कलुषित केले. इतके कमी की काय म्हणून, रामजोशींना जबर दंड ठोठवावा आणि तो वसूल झाल्याशिवाय त्यांना पुन्हा जातीत घेऊ नये, असा सारा बेत करून मंडळी शंकराचार्यांच्या

निर्णयाची वाट पाहात थांबली. शंकराचार्यांना या साऱ्या गोष्टी खऱ्या वाटून त्याची शहानिशा करायचे त्यांनी ठरविले.

रामजोशींच्या नित्यक्रमात विठ्ठल दर्शन घेऊन थोडा वेळ मंदिराच्या ओट्यावर ऊन खात बसायचे हा एक भाग असे. सकाळच्या कोवळ्या उन्हात काही चिंतन, मनन करीत कविराय काही काळ का होईना, विठ्ठल मंदिरात थांबत.

सनातनी लोकांचे बेत कळल्यावर ते एक दिवस दिवसभर ओट्यावर बसून राहिले. शंकराचार्यांनी त्यांना पाहिल्यावर न राहवून विचारले-

"आज आपल्याला स्नानसंध्यादि कर्मे करावयाची नाहीत काय? आपण सकाळपासून ओट्यावरच बसून आहात?"

रामजोशींनी तात्काळ त्यांना म्हटले-

"जगद्गुरुंनी ज्याचा त्याग केला आहे, त्याला स्नानसंध्याच काय परंतु जगूनही काय उपयोग आहे?"

शंकराचार्यांनी चमकून रामजोशींकडे पाहिले आणि कविरायांनी ही संधी हेरून शंकराचार्यांची ज्यात स्तुती आहे अशी सुंदर रचना त्यांना ऐकवली. कविरायांच्या शीघ्रकवित्वाने शंकराचार्य आश्चर्यचकित झाले. इतकेच नव्हे तर त्यांनी शिष्याला बोलावून ताबडतोब कविरायांच्या स्नानाची व्यवस्था केली आणि त्यांच्या समावेत पंक्ती भोजनही केले. सनातन्यांना ही वार्ता कळताच ते फजित पावले. शंकराचार्यांचा राग निवळून त्यांनी कविरायांना आशीर्वाद दिले.

**❑ दुग्धशर्करायोग- मोरोपंतांची भेट**

पंढरपूर मुक्कामी वेदमूर्ती बाबापाध्ये यांच्या तोंडून रामजोशींनी पंडित मोरोपंताची कीर्ती ऐकली होती. तेव्हापासून या पंडितकवीला भेटायची आस त्यांना लागून राहिली होती. पंढरपूरच्या मुक्कामात ही भेट व्हायचा योग होता. तथापि काही कारणाने मोरोपंतांची पंढरपूर भेट रद्द झाली आणि पाध्ये कुटुंबियांबरोबरच रामजोशींनाही याची चुटपूट लागून राहिली. पुढे कविरायांचे दैनंदिन व्याप, कीर्तनाचे कार्यक्रम यामुळे हा विषय तसाच राहून गेला.

रामजोशींची दरदिवशी वाढत जाणारी कीर्ती हळुहळू साऱ्या महाराष्ट्रात पसरू लागली. कविरायांची कथा आपल्या गावी, आपल्या वाड्यात व्हावी यासाठी गावोगावची निमंत्रणे त्यांना येऊ लागली. यात सर्वसामान्यांपासून प्रतिष्ठितांचाही समावेश होता. तर असेच एक निमंत्रण बाबूजी नाईक बारामतीकरांच्या वाड्यातून रामजोशींना मिळाले. महाराष्ट्रशारदेचे परमभक्त,

रामायण-महाभारतादी ग्रंथांचे निःसीम भक्त, यमकअनुप्रासदि अलंकारांचा प्रचंड खजिना असलेले तसेच मायमराठीत अष्टोत्तरशते रामायणे रचणारे पंडित कवी, विद्वदार्य मोरोपंत योगायोगाने याच नाईकांच्या वाड्यात अनेक वर्षांपासून पुराण सांगत असत.

मोरोपंत अत्यंत धर्मपरायण गृहस्थ म्हणून परिचित होते. छंदी-फंदी आणि तमासगीर यांच्याविषयी त्यांच्या मनात राग होता. अशा लोकांचे तोंडदेखील पाहायचे नाही अशी त्यांची प्रतिज्ञा होती.

रामजोशी बारामतीला पोहचले. वाड्यात त्यांची कथा सुरू झाली. रामजोशींच्या प्रसिद्धीमुळे सारा वाडा लोकांनी भरून गेला. मोरोपंतांना काहींनी कथेस येण्याची विनंती केली. लोकांची ती विनंती अर्थातच मोरोपंतांनी अमान्य केली आणि ते वाड्यातील माडीवरच्या एका खोलीत बसून राहिले.

कविरायांनी वीणा जुळवून कथेला आरंभ केला. मंगलाचरण संपताच नेहमीप्रमाणे दांभिकतेचा समाचार घेताना कविराय पहाडी आवाजात गाऊ लागले-

> "भला जन्म हा तुला लाधला खुलास हृदयी बुधा
> धरिसी तरि हरिचा सेवक सुधा..."

मोरोपंतांच्या कानावर कविरायांची वाणी पडली मात्र ते अस्वस्थ झाले. कविरायांच्या रचनेतील शब्द, आशय यांनी ते भारावून गेले. त्यांना आपल्या प्रतिज्ञेचा विसर पडला. आणि त्यांनी रामजोशींची भेट घेतली. रामजोशींच्या काव्यावर मोरोपंत खुश झाले. दांभिक, ढोंगी लोकांच्या सोंगा-ढोंगांची काव्यातून उडविलेली खिल्ली मोरोपंतांच्या पसंतीस पडून ते प्रसन्न वाणीने म्हणाले,

"व्वा! आम्हास जे मनोमन वाटत आले, आणि आम्हीही ज्या फोलकट कर्मकांडावर आमच्या पद्धतीने नेहमीच टीका करीत आलो, तीच पद्धती आपणही स्वीकारली याचा आनंद आहे. आपण 'कविप्रवर' आहात. आजपासून आम्ही आपल्याला 'कविप्रवर' असेच संबोधित जाऊ." रामजोशी पंतांच्या या अभिप्रायाने भारावून गेले. मोरोपंतांसारखा व्युत्पन्न पंडित उगाच कुणाची स्तुती करणार नाही हे रामजोशींना माहीत होते. मोरोपंतांनी दिलेल्या शुभेच्छा आणि मैत्रीसाठी पुढे केलेला हात यामुळे रामजोशींच्या मनात पंतांविषयी कमालीचा आदरभाव निर्माण झाला. मोरोपंतांना कविरायांनी गुरुस्थानी मानले. मोरोपंतही रामजोशींना कागदोपत्री 'सोलापूरकर राजश्री कविप्रवर' असे संबोधित असत. ही उभयतांची भेट अनेक दृष्टीने महत्त्वाची ठरली. याच भेटीदरम्यान रामजोशींनी आपला डफ पंतांच्या पायावर वाहून त्यांचे शिष्यत्व स्वीकारले. कविरायांच्या आयुष्यात आता आणखी एक नवे पर्व सुरू झाल्याची ही नांदी होती.

### ❑ पुण्यनगरीत प्रस्थान

कविवर्य मोरोपंतांच्या भेटीने रामजोशींच्या आयुष्याने आणखी एक वळण घेतले. मोरोपंतांच्या व्यक्तीमत्वाचा आणि काव्याचा मोठाच प्रभाव रामजोशींच्या व्यक्तीमत्वावर पडून त्याचे प्रतिबिंब त्यांच्या काव्यातही उमटले. रामजोशींची कविता आता प्रौढ, प्रगल्भ अशी झाली. संस्कृत काव्यातील संकेत, आलंकारिकता, शब्दचमत्कृती रामजोशींच्या काव्यात दिसू लागले.

कीर्तनकार म्हणून मिळालेली लोकप्रियता, प्रतिष्ठा याने कविरायांचे नाव आता पुण्यापर्यंत पोहचले. पुण्याशी कविरायांचा संबंध तसा १७९३ पासूनच आला होता. याच वर्षी गोविंद बाजी जोशी यांच्या घरी त्यांचे प्रथम कीर्तन झाले होते. या कीर्तनाची वार्ता पेशव्यांच्याही कानापर्यंत पोहचली होती.

मुठा नदीच्या उजव्या तीरावर बसलेले हे शहर तसे फार प्राचीन नाही. सुमारे हजार वर्षांपूर्वी खेडे असलेल्या पुण्याचा विस्तार अल्लउद्दिन खिलजीच्या काळात होऊ लागला. इ. स. १२९० मध्ये तो पुण्यास आल्याची नोंद आहे. इ. स. १५९५ च्या नोंदीवरून छत्रती शिवाजीमहाराजांचे आजे मालोजी भोसले यांच्या जहागिरीत पुण्याचा समावेश होता.

पेशव्यांची राजवट सुरू झाली तेव्हा पुणे हे पेशव्यांच्या राजधानीचे गाव झाले. रामजोशींची पहिली पुणे भेट झाली तेव्हा सवाई माधवराव राज्यकारभार पाहात होते. सवाई माधरावांच्या दुर्दैवी मृत्यूनंतर दुसऱ्या बाजीरावाच्या हातात सत्ता आली. ७ डिसेंबर १७९६ रोजी बाजीरावाने पेशवाईची वस्त्रे समारंभपूर्वक स्वीकारल्यानंतर पुणे शहरातून भव्य मिरवणूकीने त्याने शनिवार वाड्यात पाऊल ठेवले. बाजीरावाने राज्यकारभार पाहायला सुरुवात केली तेव्हा मराठी राज्य संक्रमण अवस्थेतून चाललेले होते. बाजीराव कलासक्त, विलासी प्रवृत्तीचा असल्याने, अनेक कलाकारांना त्याच्या कारकिर्दीत पैसा, प्रतिष्ठा मिळाली.

या काळात पुण्यात जवळपास ऐंशी शाहिरांनी आपली कला पेश केल्याची ऐतिहासिक नोंद आहे. यामध्ये शाहीर अनंतफंदी, होनाजीबाळा, प्रभाकर सगनभाऊ, परशुराम ही मातब्बर मंडळी होती. पेशव्यांकडून यांना राजाश्रय मिळाला होता. रामजोशींच्या कीर्तनाची प्रसिद्धी पुण्यात झाल्यावर आणि पेशव्यांच्या कानावर ही गोष्ट गेल्यानंतर त्यांनी रामजोशींना बोलावून कथा केली. ही कथा बाजीराव पेशव्यांच्या शुक्रवारवाड्यात झाली. श्रावणमहिन्यात गोकुळ अष्टमीस झालेल्या या कथेने श्रोते तर तल्लीन झालेच परंतु बाजीराव पेशवेही कविरायांच्या कीर्तनकलेने प्रसन्न झाले. पेशव्यांनी दुसऱ्या दिवशी म्हणजे पारण्याच्या दिवशी कविरायांना भोजनास बोलावून त्यांना शंभर रुपये दक्षिणा दिली. पेशवे स्वतःच्या हस्ताक्षरात रोजचा जमाखर्च लिहित. त्यांनी लिहिले.

अनुक्रम

"शके १७३० श्रावण उर्फ जमादिलावर छ २३ जमादिलाखर रामजोसी सोलापूरकर यांणी गोकुला अस्टमीस शुक्रवारचे वाड्यात कथा केली. सबब पारण्याचे दुसरे दिवशी त्यास भोजनास बोलावून १०० रु. दक्षिणा दिली."

श्रीमंत बाजीराव पेशव्यांची कविरायांवर चांगलीच मर्जी बसली. इतकी की, ३१ जानेवारी १८०८ या दिवशी रामजोशींच्या विनंतीवरून स्वतः पेशवे त्यांच्या पुण्यातील निवासी भोजनास गेले. याची नोंद पेशव्यांनी केली ती अशी-

"समान मयातेन जिल्हेज उर्फ माघमास १०० रु. रामजोसी सोलापूर यांचे बिऱ्हाडी जेवावयास गेलो तेथे देवापुढे दक्षिणा ठेवली छ. २ जिल्हेज."

इ. स. १८०८ या वर्षीच्या जून महिन्यात रामजोशींना २०० रु. धर्मदाय म्हणून पेशव्यांनी दिले. तर ऑगस्ट महिन्यात एकादशीला केलेल्या कीर्तनाबद्दल द्वादशीस त्यांना १०० रु. दक्षिणा देण्यात आली.

रामजोशींच्या कीर्तनकलेचा पेशव्यांवर कसा प्रभाव पडला होता हे यावरून कळून येते. याशिवाय महालनिहाय थोडी बहुत पट्टी आणि दरमहा २५ रुपयांची नेमणूकही त्यांना करून दिली होती.

**❑ अखेर काशीयात्रा घडलीच नाही**

मराठी काव्यविश्वात सुरस मराठी काव्यनिर्माण करून आपला वेगळा असा ठसा निर्माण करणारे शाहिर रामजोशी अखेरपर्यंत काव्यनिर्मिती करत होते. पेशव्यांची मर्जी झाल्यापासून पुण्यात त्यांचे वास्तव्य होते. कविरायांनी अमाप पैसा मिळविला परंतु तो त्यांच्याजवळ कधीच फार काळ टिकला नाही.

आयुष्याच्या संध्याकाळी आपल्याला काशीयात्रा घडावी अशी त्यांची फार इच्छा होती. या इच्छेने उचल खाल्यानंतर कविरायांची हालचाल सुरू झाली. आपल्या जवळ पैसा नाही याचे दुःख उराशी बाळगत कविराय मित्रमंडळींना भेटत राहिले.

महाराष्ट्र भाषा सुंदरीचा उपासक काशीयात्रेचा हेतू मनात ठेवतो आहे, तथापि त्याच्याजवळ पुरेसे द्रव्य नाही हे कळताच मित्रमंडळींना वाईट वाटले. त्यांनी शक्य ती मदत करण्याचे ठरवून कविरायांना असा सल्ला दिला की, तुम्ही पुण्यातील प्रतिष्ठित थोर लोकांची एक सभा बोलावून आपला बेत सांगावा. त्याचा निश्चित उपयोग होईल. रामजोशींनी या प्रमाणे पुण्यातील जुनेजाणते, प्रतिष्ठित असे जे लोक होते त्यांची एक बैठक बोलावून, त्यांच्यापुढे एक याद टाकली. त्यावर त्यांनी लिहिले.

“वर्षे तीन पुण्यात जो मिरविला तो रामजोशी पहा
यात्रोद्देश धरुनिया तनुमुळे घेतो निरोपाशि हा
या मागे न कधी पुढे ही न कधी मागावयाचा गुणी
ऐसें जाणुनि घ्या यशासह तुम्ही ही याद ही लेखणी”

हा मजकूर पाहताच बैठकीस आलेल्या अनेक प्रतिष्ठितांनी भराभर आकडे टाकले. बघता बघता चौदा हजारांची रक्कम जमली. रक्कम जमली खरी. तथापि काशीयात्रेचा कविरायांचा हेतू सफल होणार का? असे प्रश्नचिन्ह उभे राहिले. थोर लोकांनी कविरायांवरील प्रेमापोटी रक्कम उभी केली. परंतु कविरायांची प्रकृती त्यांना साथ देत नव्हती. उत्तरोत्तर गुण येण्याऐवजी तब्येत क्षीण होत चालली. तरीही कविरायांचा उत्साह कायम होता. मात्र नियतिच्या मनात काही वेगळेच चाललेले असावे.

काशीक्षेत्राची महायात्रा घडावी या हेतूने प्रवासाला आरंभ केलेल्या, कविरायांना वाटेत खूप श्रम होऊ लागले. शरीर साथ देईना. शेवटी आजारपण वाढत जाऊन त्यातच कविरायांचा दुःखद अंत झाला.

मराठी काव्यसुंदरीच्या पायातील घुंगरू निखळले, डफ अबोल झाला, वीणेचा झंकार थांबला, ढोलकीवर बंद बोल पडला. मराठी भाषेत नितांतसुंदर लावणी रचना करून, मराठी शारदेची उपासना करणारा सच्चा उपासक काळाच्या पडद्याआड गेला. पंडिती कविता आणि शाहिरी कविता यांना जोडणारा साकव कोसळून पडला. सामान्य माणसांच्या प्रेमापोटी घरातून बाहेर पडलेली पाऊलं अगतिक झाली तर डफावर नर्तन करणारी बोटे कायमची विसावली.

❑

## ❑ भाग - २ : कर्तृत्व ❑

परस्पर विरोधी प्रवृत्तींचा मनोज्ञ संगम

विविध कामगिरी

❑ ❑

अनुक्रम

## ❑ परस्पर विरोधी प्रवृत्तींचा मनोज्ञ संगम

आपल्या मनाप्रमाणे सारे आयुष्य जगता येणे ही गोष्ट वाटते तेवढी सोपी निश्चित नाही. रामजोशींचा सारा जीवनपट पाहिला तर रामजोशी आपल्या मनाप्रमाणे मनस्वी आयुष्य जगले असेच म्हणावे लागेल. रामजोशींच्या आयुष्यात अनेक घडामोडी घडल्या. संघर्ष झाला, पडझड झाली, कधी लक्ष्मीच्या सहवासाने सारी सुखे पायाशी आली तर कधी सारी दुर्दैवे हात धुवून मागे लागली. या साऱ्या प्रसंगात न खचता रामजोशी आयुष्याला सामोरे गेले. सारे जगणे समरसून जगणारा हा अस्सल मराठी माणूस होता. भूतकाळात क्वचित रमणारा आणि भविष्याची अजिबात फिकीर न करणारा हा लोकशाहीर खरे तर वर्तमानातच अधिक जगत होता.

या जगण्यात कधी वीणेच्या तारा तुटण्याच्या वेळा आल्या, तर कधी डफ अबोल बनतो की काय असेही वाटले पण न डगमगता डफातून निघणाऱ्या बोलाच्या साहाय्याने नादवती कविता निर्माण करत तर कधी, वीणेच्या झंकारातून लोकांच्या हृदयाच्या तारा छेडत हा शाहीर आयुष्याची वाट चालत राहिला.

रामजोशी म्हणजे परस्पर विरोधी प्रवृत्तींचा मनोज्ञ संगम. असा संगम फारच थोड्या लोकांच्या ठायी झालेला दिसतो. त्यांची डफावर दणकट थाप देणारी बोटे तितक्याच नजाकतीने वीणेच्या ताराही छेडीत असत. शाहीर आणि कीर्तनकार, व्युत्पन्नता आणि पाचकळपणा, गंभीरता आणि पोरकटपणा, भोगलोलुपता आणि त्याग, शृंगार आणि वैराग्य या साऱ्या गोष्टी रामजोशींच्या व्यक्तीमत्वात एकवटलेल्या दिसतात. पंडिती काव्य आणि शाहिरी काव्य यांना जोडणारा रामजोशी हा महत्त्वाचा दुवा आहे.

वाट्याला आलेले जीवन रडत, कुढत काढण्यापेक्षा जगण्यातला प्रत्येक क्षण आनंदाने जगावा या वृत्तीने रामजोशींनी आयुष्याकडे पाहिले. जी गोष्ट करायची ती मनापासून म्हणूनच, तमाखु, गांजा यांच्या सेवनाबरोबरच मद्याची चवही कविरायांनी चाखून पाहिली. तर आयुष्याच्या सायंकाळी पंढरपूरचा पेढा, सुवासिक तांदूळ आणि कडक तपकीर ही त्यांची आवड होती. पंढरपूरच्या एका दुकानदाराला त्यांनी या संदर्भात लिहीलेले पत्र उपलब्ध आहे.

शृंगारकविता जितक्या तन्मयतेने त्यांनी लिहिली तशाच उत्कटतेने उपदेशपर कविताही निर्माण केली. मराठी भाषेत रचना करतानाच त्यांच्या लेखणीने संस्कृतभाषेचा प्रदेशही पाहिला. एवढेच नाही तर संस्कृत, मराठी, कानडी, हिंदी भाषेचा वापर करून लावणी रचण्याचे चातुर्य त्यांनी दाखविले. शीघ्रकवित्व आणि समयसूचकता हे दोन गुण त्यांच्याजवळ होते. चिमासारखी गणिका अंगवस्त्र म्हणून त्यांनी बाळगली हे जितके खरे, तितकेच उमा या धर्मपत्नीला त्यांनी सगळीकडे बरोबर फिरवले हेही विसरता कामा नये. मोरोपंतावर त्यांचे जितके प्रेम होते तितकेच धोंडीवर देखील होते.

अनुक्रम

गिरीचा व्यंकटेश त्यांना जितका प्रिय होता. तितकाच बार्शीचा भगवंतदेखील प्रिय होता. पंढरीचा पांडुरंग त्यांचा प्रेमविषय होता. तशीच महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानीवरही त्यांचे प्रेम होते. शिवशक्तीची उपासनाही कमीअधिक प्रमाणात त्यांनी केलीच होती. आणि तरीही इतक्या परस्परविरोधी प्रवृत्तींचा संगम ज्यांच्या व्यक्तीमत्वात होता, त्या कविरायांची कविता ही अस्सल मराठमोळी कविता आहे. हे लक्षणीय आहे.

**❑ रामजोशींची त्रिविध कामगिरी**

रामजोशींच्या आयुष्याचा विचार करता, त्यांच्या आयुष्याचे दोन प्रमुख टप्पे आपणास दिसतात. पूर्वायुष्यात 'शाहीर' म्हणून ते प्रसिद्ध पावले. तर उत्तरायुष्यात 'कीर्तनकार' म्हणून त्यांची प्रसिद्धी होती.

शाहीर आणि कीर्तनकार या नात्याने त्यांनी केलेले कार्य त्रिविध स्वरुपाचे आहे. कविवर्य चंद्रशेखर म्हणतात. त्याप्रमाणे श्रृतिमनोहरी लावणी रचना कविरायांनी केली. शाहीर म्हणजे गावंढळ किंवा असंस्कृत व्यक्ती हा तत्कालीन सनातनी विद्ववानांचा समज खोटा ठरविण्याचे काम त्यांनी आपल्या व्यासंगाने केले. या बरोबरच मोरोपंतांच्या भेटीनंतर त्यांच्याकडे आकृष्ट होऊन, त्यांनी मोरोपंतांच्या आर्यांचा प्रसार आपल्या कीर्तनातून सातत्याने केला. रामजोशींमुळे मोरोपंत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात माहित झाले हे नाकारून चालणार नाही. स्वतः रामजोशींचे या संदर्भातले उद्‌गार प्रसिद्धच आहेत.

> "जैशी जनके दिधली सच्चिद्‌घन राम जो सिता त्याला
> तैशी दिधली मयुरे स्वार्या ती रामजोशि तात्याला"

अशा प्रकारे त्रिविध स्वरुपाची कामगिरी करून रामजोशी यांनी स्वतःचा ठसा मराठी कवितेवर उमटवला. त्यांच्या कवितेत तत्कालीन श्रद्धा, दैनंदिन जीवन, रुढी परंपरा, राजकारण, समाजस्थिती, स्त्री-पुरुष संबंध, वास्तुशिल्पे अशा विविध गोष्टींचे प्रतिबिंब पडलेले आहे त्यामुळेच त्यांची कविता अधिक वास्तववादी झाली आहे. या त्रिविध कामगिरीचा आता थोडक्यात परिचय करून घेऊ.

**❑ १) श्रुतिमनोहरी लावणी रचना**

रामजोशींच्या लावण्यांचा आस्वाद घेतल्यानंतर विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी उद्‌गार काढले की, "रस, प्रौढ, झोकदार आणि आवेशयुक्त असे आपल्या भाषेचे स्वरूप ज्यास पाहणे असेल त्यास या कवीच्या लावण्यात सापडेल." तर रड्डीशास्त्री म्हणतात- "शृंगार व वैराग्य या दोन विषयांचे वर्णन करणारा रामजोशांच्या तोडीचा दुसरा कवि झाला नाही."

**❑ पौराणिक शृंगारपर**

रामजोशींनी पुराणकथा आणि सभोवतालचे जीवन या आधारे निर्माण केलेल्या लावणीतून शृंगार वर्णन केला आहे. रामजोशींच्या रंगेल जीवनाचे प्रतिबिंब यात पडलेले दिसते.

पौराणिक शृंगारिक लावण्यात प्रामुख्याने कृष्णलीलांचे वर्णन रामजोशी करतात. हे वर्णन करताना त्यांच्यापुढे भागवतातील दशमस्कंध आणि त्यातील कृष्णगोपी यांच्या लीला आहेत हे उघड आहे. श्रीकृष्णाच्या लोकोत्तर वक्ता, राजकारण धुरंधर, संगीतज्ञ, उत्तमयोध्दा, तत्त्वज्ञ इत्यादी प्रतिमांपेक्षा 'प्रेमिक' ही प्रतिमाच सर्व संतांना, पंडितकवींना भावलेली दिसते. याला शाहीर तरी कसे अपवाद असणार? रामजोशींनीही हीच प्रतिमा स्वीकारून, कृष्णाच्या खोड्या, खट्याळपणा, गोपींचे त्याच्यावरील प्रेम आणि त्याच्याविषयीचा व्यक्त केलेला लटका राग लावण्यातून मांडला.

एक गोपी म्हणते-

"अशि कशि रे तुझि होरी हरि आवळून धरिशिल उरी
पडेना अमुचि रे येथे पुरी"

तर दुसरी तक्रार करते-

"अग सखे यशोदे बाई मूला आपला आटोपी
अशाने उडवील टोपी...."

आणखी एक गोपी तर धीटपणे त्याला विचारते-

"काय म्हणून झटशिल मला मला... अशी कोण व्याली तुला
मी चंद्रवळी तशि नव्हे रे सोड नंदाच्या मुला मुला"

राधाकृष्ण यांना देवत्व बहाल न करता लौकिक पातळीवर आणून त्यांच्या शृंगाराची चित्रे रामजोशींनी रेखाटली. त्यातही संभोगशृंगार वर्णन करताना त्यांची लेखणी जरा सैलसर बनते. एक गोपी म्हणते-

"दूर होय कान्हा आम्ही तुशी खेळुनी होरी
तुटली मर्जी तू गर्जी नको बळजोरी
केली गर्दी रंगाची सर्दी ओली
भरले डोळे बाई अजून जाईना लाली
फेडी लुगडी कुच रगडी या काय चाली
अंगे भिजली रंगामध्ये दंग जाहले मी वेडी
तशामाजी बाई हा हळुच कंचुकी सोडी
या खेळाची याला अशी काय गे गोडी"

रामजोशींना वर्णन केलेला 'राधासखीसंवाद' या दृष्टीनेपाहण्यासारखा आहे. हे छेकापन्हुति अलंकाराचे सुंदर उदाहरण आहे. छेक म्हणजे चतूर. इतरांच्या मनात शंका उत्पन्न झाली असता वर्ण्यविषय लपवून तिचा चातुर्याने निषेध केलेला असतो तेव्हा हा अलंकार होतो ही अपन्हुति श्लेषयुक्त असते. रामजोशी लिहीतात-

"राधासखिसंवादे छेकापन्हुति आयका
रसिक हो किती चतुर बायका
अंबरगत परि पयोधराते रगडुनि पळतो दुरी
काय हा धीट म्हणावा तरी

तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हय्या हरी
नव्हे गे मारुत मेघोदरी
सुंदर रतिजोगता मिळाला पति ही सुभगा खरी
दुजीला असा मिळल काय तरी
तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हय्या हरी
नव्हे ग रतिला मन्मथ वरी”

## ❑ लौकिक शृंगारपर

रामजोशीच्या लौकिकशृंगार लावण्यांमधून विरहभावनाच प्रामुख्याने आढळते. पतीमीलनासाठी उत्सुक असलेल्या नायिकांना विरह जाळतो. हेच दुःख उराशी बाळगीत त्यांचे जगणे चाललेले आहे. हे असह्य दुःख व्यक्त करताना मग एखादी आपल्या सखीला विनवते-

“जा गडे त्याला तू घाल माझी आण’ जाऊनी सांग बाई सख्या
तुझी दासी
तुझ्यामुळे चैन नाही उगा रुसलाशी, आज न जाशी तर
देईल ती प्राण”

दुसरी विरहिणी म्हणते-

“घडिभर तरि सदनासी येऊन जा माझी असोसी
कशी तशि खटनट परि तुझी म्हणविते
तत्पदीचे रज म्हणविले सख्या त्वां घरच वर्जिले
विरहाने दुःख पिकविले
तुझे मन कसे मजविषयी निष्ठुर झाले रुसून बसलासी”

रामजोशींच्या लौकिक शृंगार वर्णनपर लावण्यात दोन लावण्या मात्र खास आपले लक्ष वेधून घेतात. नायिकेच्या रुपसौंदर्यांचे वर्णन बारीकसारीक तपशीलासह रामजोशी वर्णन करतात. उदाहरणार्थ-

“कोण्या ग सुभगाची मदन मंजरी सांग सखे सुंदरी
इच्या सौंदर्याची सीमा झाली गडे रतिहुनी अति उत्तमा
पाहुनिया मुखचंद्रमा सखे गडे अमा गमति पोर्णिमा
काय अधराची रक्तिमा लाजवी नव कुंकम विद्रुमा
अंगि वसन जिच्या भर्जरी कोण्या ग सुभगाची...”

हे स्त्री सौंदर्याचे आलंकरिकतेने केलेले वर्णन पाहता, ती सौंदर्यमूर्ती आपल्या डोळ्यासमोर उभी राहते. रामजोशींचा प्रतिभाविलास इथे बहरताना दिसतो. आणि मग साहजिकच ही सुंदरा मनामध्ये घर करून बसते.

“सुंदरा मनामध्ये भरली जरा नाही ठरली हवेलित शिरली मोत्यांचा भांग
अरे गड्या हौस नाही पुरली म्हणोनि विरली पुन्हा नाही फिरलि
कुणाची सांग
जशी कळी सोनचाफ्याची न पडु पाप्याची दृष्टी सोप्याची नसल तरी नार
अति नाजुक तनु देखणी, गुणाची खणी उभी नवखणी चढून सुकुमार
जशि मन्मथ रति धाकटी सिंहासम कटी उभी एकटी गळ्यामध्येहार

अनुक्रम

अंगि तारुण्याचा बहर ज्वानिचा कहर मारिते लहर मदन तलवार
पायी पैंजण झुमकेदार कोणाची दार?
कोण सरदार हिचा भरतार?"

रामजोशींच्या या ठसकेबाज रचनेतील अनुप्रास केवळ लाजबाब आहे. मराठी सुंदरीचे हे शब्दचित्र केवळ अप्रतिम आहे. हवेलीत शिरणारी ही मराठी सुंदरी आपल्या ओझरत्या दर्शनाने कवीमनात चुटपूट निर्माण करते, हवेलीत शिरताना क्षणभर तिचे थबकणे यामुळे तर, कवी अधिकच व्याकूळ होतो. तिच्या दर्शनाने भारावून जाऊन त्यांनी ही लावणी लिहीली.

अ. ब. कोल्हटकर म्हणतात त्याप्रमाणे "या लावणीत रामजोशींच्या कल्पनेच्या भराऱ्या तर इतक्या गोड आहेत की, समरसतेचे कितीही पंख लावले तरी ते अपुरेच पडतात! त्यांच्या शब्दलालित्या पुढे वामन-मोरोपंतांचेही शब्दलालित्य कमी वाटायला लागत! त्यांचे काव्य माधुर्य म्हणजे गुलाबदाणीतले सुवासिक फवारे भासतात! व त्यांच्या सुंदर जडावाकडे पाहिले म्हणजे तिथून चित्त हालतच नाही!"

### ❑ उपदेशपर रचना

रामजोशींच्या उपदेशपर लावण्या या त्यांनी तमाशा सोडून ते कीर्तने करू लागले त्या काळातील निर्मिती आहे. उपदेशपर लावण्यांचा तोंडावळा पाहिला तर अप्रतिम शृंगारिक लावणी लिहिणारा हाच तो कवी आहे यावर चटकन विश्वास बसत नाही.

या उपदेशपर लावण्या संख्येनेही पुष्कळच आहेत. जगाचे सारे बरे-वाईट अनुभव घेऊन, पोळलेल्या आणि अंतर्मुख झालेल्या मनाचा हा उद्‌गार आहे. हा उद्‌गार अर्थातच प्रामाणिक आहे. रामजोशींनी शृंगार वर्णन करताना जी प्रामाणिकता दाखवली तीच उपदेशपर लावण्यातही दिसून येते.

जीवनाचा सर्व अंगांनी उपभोग घेतलेले रामजोशी जेव्हा कळवळून म्हणतात-

"कुठवर हा भव पुरे पुरेरे नाही यात किमपि सौख्यरे
सांगून चुकलो परंतु न तुझी खटपट सरे सरेरे
ही तनु तुजला काय जिरे जिरेरे हे विषय दिसती साजिरे
हे मदमस्त गजरथवाजि रे आले असती अजी रे
सावध हो मनी विचार न करिसी यातील काही तरी उरे उरे"

तेव्हा ह्यांच्या प्रामाणिकपणाची साक्ष पटते. शृंगारिक लावण्यात त्यांच्या रंगेल जीवनाचे जसे प्रतिबिंब उमटले आहे, त्याप्रमाणेच उपदेशपर रचनेत त्यांच्या ठायी उतारवयात निर्माण झालेल्या विरागीभावाचे प्रतिबिंब साकारलेले आहे. उदाहरणार्थ

"तनु दारोदार भरणाच्या भरी गेली
किती रांडाच्या प्रेमाला भाळलासी
जन कामाच्या बाणाने पडे फासी
धनधामाच्या लोभाने लया जाशी

अनुक्रम

त्वां नरजन्मी आपुली सोय न केली
तनु दारोदार भरणाच्या भरी गेली"

या रचनेतून त्यांचे आत्मपरीक्षणपर बोलच उमटलेले आहेत. क्षणभंगूर जीवन आणि क्षणभंगूर शरीर यात किती गुंतून पडायचे? जोवर ज्वानिचा जोर आणि धनदौलत आहे तोवर सारे विचारणार म्हणून लोकहो सावध व्हा म्हणताना, ते लिहितात-

"दो दिवसाची तनु ही साची, सुरतरसाची करुनि मजा
गमजा करिता मनि उमजाना हे सुख न पुढे पडेल वजा भाई सावध व्हा
..........................
पाट बसाया ताट रुप्याचे दाट त्यामध्ये दूधरवा
धनावयाला बसेल घसरा मग विसरा हो गोड खवा
रांडा पोरे वंचक चोरे जंवर मिळविता तवर थवा
शिते तंवर ती भुते भोवती कोण कुणाचा सखा जिवा
जोवरि पैसा तोवरि बैसा मंचकि म्हणतील घ्याल हवा
बेटा बेटी हाती नरोटी देतिल हा खूप समज ठिवा"

रामजोशींच्या उपदेशपर लावण्यांचा तत्कालीन लोकांवर चांगलाच प्रभाव पडलेला होता. खुद्द बाजीराव पेशव्यांची त्यांच्यावर बहाल मर्जी बसली होती. याचे एक कारण या उपदेशपर लावण्यांच्या मागे त्यांच्या पूर्वायुष्यातील जागता अनुभव उभा होता. या लावण्यातील शब्द हा या अनुभवात भिजलेला शब्द असल्यानेच रामजोशींच्या कीर्तनांनी महाराष्ट्रभर खळबळ उडवून दिली.

वेदमूर्ती बाबापाध्यांकडे केलेले संस्कृतचे अध्ययन, पारमार्थिक ज्ञान चर्चा आणि जगण्यातले बरे-वाईट अनुभव घेत परिपक्व झालेल्या रामजोशींनी आपल्या अनुभवाचा आधार घेऊन आणि त्यात अध्यात्माचे रंग मिसळून, ही उपदेशपर लावणी लिहिलेली आहे. ही लावणी असल्याने, लावण्यवती तर ती आहेच तथापि तिचे हे लावण्य केवळ बाह्य लावण्य नसून, तिच्यातील अध्यात्मामुळे ती आंतरिक लावण्याने अधिकच सुंदर आणि प्रभावी ठरली आहे.

**❑ दैवत वर्णनपर रचना**

रामजोशींच्या दैवत वर्णनपर लावण्यामध्ये गणेशस्तवनपर लावण्यांचा वेगळा विचार केला पाहिजे. सर्वकार्यारंभी गणेशस्तवन करण्याची प्राचीन परंपरा आहे. साहित्याचा विचार करता संस्कृत ग्रंथकारांनी आणि मराठी ग्रंथकारांनीही गणेश स्तवनाने ग्रंथारंभ केलेला आहे. शाहीरांच्या पोवाडा गायनाच्या आरंभी गणेश स्तुती म्हणण्याचा प्रघात होता. रामजोशींनी याच परंपरेला धरून गणेशस्तवन केलेले आहे. 'विघ्नहर्ता', 'सुखकर्ता', 'बुद्धीचास्वामी', 'ओंकारस्वरूप' अशा विविध स्वरूपात गणेश स्तवन, उपासना होत असली तरी रामजोशींच्या स्तवनात रुपवर्णनात, मराठी वातावरण प्रतिबिंबित झालेले दिसते. रामजोशींचे निरीक्षण सूक्ष्म होते. म्हणून त्यांच्या गणेशस्तवनात जेव्हा

"शुंडदंडसुमंडित गंडस्थली दूर्वांकुर नवे मधुपांचे फिरती थवे"

अनुक्रम

अशी शब्दरचना ते करतात तेव्हा पेशवाईतील पीलखान्यात उभे असलेल्या हत्तींची सोंडेत गवत धरून ते डोक्यावर उडविण्याची लकब त्यांनी निरीक्षिली होती हे लक्षात येते.

या गणरायाचा नैवेद्यही खास मराठमोळा पद्धतीचा आहे. त्यात खोबरे, मोदक, लाडू, खडीसाखरेचे रवे असे मराठी पदार्थ दिसतात. एवढेच नव्हे तर-

“सात्विक त्याला सत्व तमासी तम राजस राजसा हा जसा भाविला तसा” या वर्णनातून ‘जशास तसे’ हा मराठी बाणा रामजोशी अधोरेखित करतात.

गणेशस्तवनपर अशा पाच रचना रामजोशींनी केलेल्या असून, त्यातील एक रचना संस्कृत आहे. यातील गणेश हा ‘विधुसुललिताभालम् सुंदरभाल प्रदेश असलेला, ‘चन्दनमण्डितशुण्डादण्ड’ सोंडेला चंदनलेप लावलेला, ‘मदमर्दितगण्डम्’ मदाने गंडस्थळ माखलेला असा ‘कृतविघ्नविरामम्’ विघ्नांना विराम देणारा असा आहे. त्यांची ‘महाराज गवरीनंदना’ ही गणपती पंचायतनावरील लावणीही अप्रतिम उतरलेली आहे.

दैवत वर्णनपर लावणीत ‘दाट साधुचा हाट भागवत’ ही बारशीच्या भगवंतावर केलेली लावणीही फारच बहाराची आहे. रामजोशी सोलापूरहून पंढरपूर, बार्शी, तुळजापूर इथे नेहमी जात येत असत. बार्शीचे भगवंताचे मंदिर प्राचीन असून प्रसिद्ध आहे. मंदिर बांधणीचा काळ अंदाजे १३ वे शतक हा आहे. हे मंदिर हेमाडपंथी शिल्पकलेचा नमूना असून, मंदिराचे क्षेत्रफळ १० हजार चौरसफूट इतके आहे. भगवंत या मुख्य देवतेखेरीज लक्ष्मी, दत्त, गणपती, मारुती, अशा देवताही मंदिरात प्रतिष्ठित आहेत. मंदिर परिसरातून पुष्पावती नदी वाहते. अशा या बार्शीच्या भगवंताचे वर्णन करताना रामजोशी लिहितात-

“दाट साधुचा हाट भागवत पाठ रुचिर फारशी
अशी हे अद्भूत जगी बारशी
संत शांत गुणवंत पहा भगवंत नांदतो हरी
मिराशी जागा याची खरी”

या क्षेत्री साधुसंतांचा ‘हाट’ (बाजार) भरला असून, संत, साधु-सज्जन, भगवंत यांच्या वास्तव्याची मिराशी या क्षेत्राला मिळाली आहे. या वर्णनातून रामजोशींचे अवलोकन, श्रद्धा प्रकट झाली आहे.

“खुंटविली वैकुंठपेठ ही कंठितसे भूवरी
बारशी वेतन याची खरी
चार दिवस बाजार तेथीचा वार करूनि लौकरी
आला हो बाइल पाठीवरी
मला वाटते थेट हा आला पळुनिया घरी
वोढितील तेथे देणेकरी
हा जरा बाजरा घेऊनि आला घरी
नाही सुपटोपली वैकुंठी तागडी
श्री लपउनि मागे पांघरतो घोंगडी

अनुक्रम

वसन मिळेना कुसुमाची आंगडी”

हे वर्णन वाचताना तर भगवंत हा वैकुंठ निवासी नसून, भूवरी निवास करणारा अस्सल मराठी माणूस वाटतो. मग लक्ष्मीही ‘बाइल’ बनून याच्या पाठीशी (पाठीमागे) उभी राहते. वैकुंठी देणेकरी त्रास देतील म्हणून हा इथे पळून आला आहे. मग हा ‘बाजरा’ घेऊन घरी येतो. वैकुंठात ‘सुपटोपली’ कुठे मिळणार? देणेकऱ्यांसाठी हा ‘श्रीला’ (लक्ष्मी) मागे लपवून, घोंगडी पांघरूण घेतो आणि ‘वसन’ (वस्त्र) जणू मिळत नाही म्हणून ‘कुसुमाची (फुलांची) आंगडी’ परिधान करतो. रामजोशींचे वैशिष्ट्य हे की, त्यांची देवांना स्वर्गात न ठेवता लौकिकात आणले. पुराणातल्या संदर्भ जागवित मराठी साज लेपून... हा देव आपल्या भेटीस येतो म्हणूनच तो खूप आपलासा वाटतो.

‘शेषाचलकृतनिवास’ ही गिरीच्या व्यंकटेशाचे वर्णन करणारी अशीच सुंदर रचना आहे.

“शेषाचलकृतनिवास हा नत भवास गोष्पद करी
न संकट व्यंकटरमणावरी
तीन कोस हा पर्वत उंची, लांबी तीस योजने
तयावरि नांदे भगवज्जने
शारदीय नवरात्र रथोत्सव नानाविध अर्चना
लोभवी विविध जनांच्या मना”

रामजोशींच्या सूक्ष्म आणि मार्मिक निरीक्षणाचे दर्शन इथेही घडतेच. ज्या क्षेत्राला आपण भेट देत आहोत त्याचे क्षेत्रफळही सांगायला ते विसरत नाहीत.

“तीन कोस हा पर्वत उंची, लांबी तीस योजने”

हे सांगतानाच. तिथे साजऱ्या होणाऱ्या शारदीय नवरात्र, रथोत्सव आणि विविध अर्चनांची माहिती ते देतात. म्हणूनच-

“हा व्यंकटपति त्या गिरीवरी अति शोभला
या पादपंकजी अनंत जन लोभला
श्रीरामनुज या देवबळे लाधला”

अशा या दैवताहून दुसरे जागृत दैवत पृथ्वीवर नाही असे मोठ्या विश्वासाने ते म्हणतात. सुगंधी आणि केशरयुक्त निर्मल जलाने याला अभिषेक केल्यावर हा साऱ्या त्रिभुवनात लक्ष्मीपती म्हणून खरा शोभतो आणि याचा नैवेद्य तरी कसा तर-

“चिंच तिखट नैवेद्य तेलकट परि सुर झड घालती
सुधेचे रस त्यापुढे लाजती”

हा वेगळा नैवेद्य देवांनाही इतका प्रिय की, त्यापुढे अमृतरसही फिका पडावा.

या सर्व वर्णनातून श्रद्धादृष्टी तर प्रकट होतेच, परंतु रामजोशींच्या निरीक्षण शक्तीचा प्रत्ययही येतो. अंग-प्रत्यांगासह तपशीलवार वर्णन करीत ते आपली रचना (लावणी) जेव्हा सादर करतात तेव्हा त्यातील शब्द लालित्याने वाचकही भारावून जातो.

अनुक्रम

राम वर्णनपर अशा ‘त्या रामाला पायावर अबला न्हाणी’ ‘रघुवीर माझा जोडा हो’ ‘रामाचा पाळणा’ इत्यादी रचनाही त्यांनी केलेल्या आहेत. या शिवाय ‘श्री सांबाच्या समान दैवत’ सारखी रचना त्यांच्या नावावर जमा आहे.

**❑ क्षेत्रवर्णन**

रामजोशींनी आपल्या आयुष्यात पुष्कळ तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. त्यातही पंढरपूर आणि तुळजापूर या गावावर त्यांचे विशेष प्रेम होते असे दिसते. पंढरपूरात त्यांच्या आयुष्याचा नवा अध्याय सुरू झाला. आणि तुळजापूरी तर दर नवरात्रात त्यांची कीर्तने होत असत.

पंढरीचा पांडुरंग आणि तुळजापूरची भवानी ही दोन खास महाराष्ट्रीय दैवते. शेकडो वर्षांपासूनही दोन दैवते हजारो लाखो लोकांना स्फूर्ती देत आली आहेत. तुळजाभवानी ही तर महाराष्ट्राची कुलस्वामिनी. तिच्यामुळे तुळजापूर हे दक्षिण काशी म्हणून ओळखले जाऊ लागले.

शिवरायांनी हिच्यापासून स्फूर्ती घेऊन, हिंदवी स्वराज्य स्थापनेचा पाया घातला तर भागवत धर्माचा पाया रचणारे ज्ञानेश्वरांनी पंढरीच्या रावापासून स्फूर्ती घेतली.

पंढरीला ‘ईश्वरनिष्ठांची मांदियाळी’ जमली तर तुळजापूरला ‘स्वराज्यनिष्ठांची मांदियाळी. अशी ही तुळजाभवानी-

“भूतकाळात जशि या स्थळांत यमुनाचळांत हिमनगबाळा
अशी भुवनत्रयिं कोणती दुजी वेल्हाळा”

वेल्हाळ आहे, तशीच शिवाची राणी आहे. म्हणूनच “ही भजता देते नित्य सुखाची खाणी” असे तिचे वर्णन कविराय करतात ही सकल जनांना तारणारी ‘विश्वकुंभिनी’ भक्तीची प्यारी असून, “दुबळ्याची भाकर म्हणे मलाही न्याहारी” अशी अस्सल मराठमोळी आहे. हिची जरब जगामध्ये भारी असून, हिच्या द्वारी छपन्न देशीचे लोक लोळण घेतात.

“मिरवितो छबीना नंदी, कधी तुरंग
धावति पुढे जनबंदी बहु सुरंग
कधिं मतंगजी आनंदी फिरंग
कधिं पंकज गरुड स्कंधी, वहन रंग
कधिं हंस मयूर छंदी, धरि कुरंग
ही सदा सकळ संपदासहित श्रीपदासही जपमाळा
भागची माय कनवाळू दिसे चिह्लाळा”

या वर्णनातून सारा क्षेत्र परिसर आपल्या समोर उलगडत जातो.

अनुक्रम

पंढरपूरक्षेत्र वर्णनाच्या ‘क्षमातळीइजसमान नाही’ या रचनेत या क्षेत्राबद्दल रामजोशींच्या मनातील श्रद्धाभाव पूर्णपणे प्रकट झालेला आहे. या वैष्णवपीठाबद्दलचा अभिमान व्यक्त करताना ते लिहितात-

“क्षमातळी इजसमान नाही उमामहेश्वरपुरी
पुरी पडेना काशी मग इतरा दासी न कोण असी हो पंढरी”

यातील ‘उमामहेश्वरी’ या शब्दाने त्यांनी ‘शैवपीठाचा’ निर्देश करून कुठल्याही शैवपीठाची या वैष्णवपीठाशी तुलना होऊ शकत नाही हे सांगून पंढरपूरच्या भागवतधर्माचे श्रेष्ठत्व अधोरेखित केले आहे.

“सभामंडपी उभारूनी भुजा उभा मरुत्सुत ऋणी
अहा गरुड पाराची किती शोभा त्याची वर्णावी तरि कुणी
............
महाद्वार तुम्हि पहा तरिच जन्म हा सफळ मानवी
वरी चौघडा वाजे अति साजे काहिल मढविली नवी
.............
पुढे समाधित दडे पदांबुज पडे न चोखा भवी
असो महार यातिचा जातीचा हरिच्या भागवतोत्तम कवी
..............
लोहदंड त्या क्षेत्र पंढरी पुंडरीक चौधरी
हा मुख्य येथीचा राणा जाणा ज्यास्तव उभा अजुन विटेवरी
.................
गळा तुळशीच्या माळा सवे पाळा गोपाळाच्या किति नाचती
नवे भागवत थवे प्रदक्षिण सवे कितिक धावती
पंगु लागती रांगू किती सांगू अंधळे भुजा भुज कवटाळिती
रथा निरखिती कथा करिती कुणी पंथात मठ तरि किती”

या साऱ्या वर्णनातून, मंदिर परिसराचा तपशिल, त्याचे माहात्म्य, अठरापगड जातीच्या संतांनी इथे झाडलेली पायधूळ, भागवतांचे थवे, त्यांची विठ्ठलाप्रती असलेली असीम श्रद्धा, इथली विविध तीर्थे त्यांचा इतिहास याचे अत्यंत सहृदयतेने चित्रदर्शी वर्णन रामजोशींनी केलेले आहे. ते म्हणतात,

“किति संध्यावळिमध्ये तप करिती राहुनी
अशी किती तीर्थे तुज कंथू शपथ वाहूनी
पृथ्वीत पंढरी एकच घ्या पाहुनी”

साऱ्या पृथ्वीतलावर पंढरी हे एकमेव क्षेत्र आहे. अशा क्षेत्राचा अत्यंत रसाळ, नादवती भाषेत परिचय करून दिल्यावर स्वतःच्या काव्यरचनेचा अत्यंत अभिमान असलेले कविराय म्हणतात-

“पाय धरिल कविराय दुजा अशी काय लावणी करी
माय कुणाची व्याली या गगनाखाली कविता सोलापूरी”

कविरायांनी स्वतःबद्दल काढलेले उद्‌गार हा ‘फाजील आत्मविश्वास’ नाही तर ते डोळस पाहणे आहे. डोळे आणि कान सदैव उघडे ठेवून त्यांनी जगाकडे पाहिले. म्हणूनच त्यांची ‘सुंदरा’ जशी मनामध्ये भरते तसेच हे क्षेत्रवर्णन वाचताना, तो ‘पंढरीचा रावो’ आणि ‘महाराष्ट्राची कुलस्वामिनीही’ वाचकाच्या मनावर आपला ठसा उमटवून जातात. विशेष लक्षणीय गोष्ट ही की, हा ठसा ‘अस्सल मराठी ठसा’ आहे.

अनुक्रम

❑ **स्थळवर्णन/वास्तुवर्णन**

स्थळवर्णनपर रामजोशींची रचना म्हणजे 'ब्राह्मणीराज्य जोरदार' हा पुणे शहराच्या वर्णनाचा पोवाडा होय. या पोवाड्याला नानासाहेब पेशव्यांच्या कारकिर्दीची पार्श्वभूमी आहे.

"ब्राह्मणी राज्य जोरदार घोड्यावर स्वार होते शिपाई
जबर सद्दी कैकांनी पाहीली शत्रु ठेविले नाही
श्रीमंत पेशवे प्रधान बहु प्रीतीचे
अष्टप्रधानामध्ये उतरले मर्जीत महाराजांचे
वसविले त्यांनी पुणे शहर टुमदारीचे"

अशा या पेशव्यांनी वसविलेल्या टुमदार पुणे शहराशी इ. स. १७९३ पासूच रामजोशींचा संबंध आला होता. पुणे शहराची रचना, शहरातील वास्तु, त्यात राहणारे श्रीमंत सरदार, सावकार, लढावू सैनिक, हत्ती, घोडे, रथ पालख्यांचे थवे, हा सगळा थाट पाहता, 'लंकाच पुण्यामध्ये लेश न दारिद्र्याचे' अशी लंकेच्या वैभवाशी कविराय पुण्याची कल्पना करतात.

पुणे हे पेशव्यांच्या राजधानीचे शहर, नानासाहेब पेशव्यांच्या काळातील पुणे हे वैभवसंपन्न शहर म्हणून ओळखले जात होते. य. न. केळकर लिहितात- "ह्यांच्या (नानासाहेब पेशवे) कारकिर्दीच्या सुमारास पेशवाईच्या उत्कर्षाचा परमोच्च बिंदु झाला. महाराष्ट्रातील गरीब राहणी बदलून जाऊन सुखपभोग व ऐषआराम वृद्धी पावले. उत्कृष्ट घोडे, उत्कृष्ट शास्त्रास्त्रे, नाना प्रकारच्या पोथ्या, पुस्तके व ग्रंथ, नाटकशाळा वगैरे महाराष्ट्रात आणण्याबद्दल त्या वेळच्या पत्रातून उल्लेख आहेत. पुणे शहरावर नानासाहेबांचे अतोनात प्रेम होते. त्याची सुधारणा करण्याकडे त्यांचे सदैव लक्ष असे. हिंदुस्थानभर शेपन्नास वर्षे चाललेल्या त्यांच्या संचारात जे जे प्रकार त्यांच्या नजरेस येत ते पुण्यात शक्य तितके उठवून देण्याचा त्यांचा हव्यास होता. पर्वतीची स्थापना, पर्वतीचे तळे, सारसबाग, कात्रजचे नळ वगैरे अनेक गोष्टी नानासाहेबांच्या स्मारकरुपच आहेत. शेवटच्या दोन तीन वर्षात नानासाहेब रंगेल बनून त्यांना नाचरंग वगैरेंचा शौक उत्पन्न झाला होता. वाड्यात रंगाची चाल त्यांनीच चालू केली." पुण्यातील नानाविध स्थळे, पेशवाईतील साडेतीन शहाणे (सखोपंत देवराव-विठ्ठलनाना) तुळशीबाग, बेलबाग, सारसबाग या प्रसिद्ध बागा, शहरातून फिरणारे हजारो घोडेस्वार, घोड्यांचा पागा, सरदार, धनिक यांचे वाडे, हवेल्या, आळीआळीत एका रांगेत झळकणारी घरे. होळकर, शिंदे, भोसले यांच्या सारखे मानकरी, घोरपडे, रास्ते, पुरंदरे, इत्यादी सरदार. ब्राह्मण विद्वावांना श्रावणात दक्षिणा देण्यासाठी पर्वतीवर उभा केलेला रमणा, आंबिलओढा, तळ्यातला गणपती या साऱ्यांचे सुरेख चित्र कविरायांनी रेखाटले आहे. शाहीरांच्या समोर ज्या घडामोडी घडत होत्या त्या प्रामाणिकपणे त्यांनी काव्यात आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. रामजोशींच्या नजरेसमोरच पुणे आणि त्याचे गतकालीन वैभव, इतिहास यांची सांगड घाला ही रचना त्यांनी केलेली आहे. नानासाहेबांच्या मृत्युनंतर तीसेकवर्षांनी हा पोवाडा त्यांनी लिहिलेला असावा. श्री. म. वर्दे यांच्या मते 'वसईच्या तहानंतर' हा पोवाडा लिहिलेला असावा. काही असो यात कविरायांनी आपल्या प्रतिभेचे रंग मिसळून तत्कालीन वैभवसंपन्न पुणे शहराचे सुंदर शब्दचित्र रेखाटले आहे.

वास्तुवर्णनपर रामजोशींची रचना म्हणजे, पेशव्यांच्या शुक्रवार वाड्याचा पोवाडा होय. काही अभ्यासकांना हे शनिवार वाड्याचे वर्णन वाटते तथापि हे शनिवार वाड्याचे वर्णन नसून, त्या काळात बहुतेक सरदारांनी पुण्यात जे चौसोपी वाडे बांधले. त्यामध्ये प्रसिद्ध असे शुक्रवारवाडा, बुधवारवाडा, विश्रामबाग वाडा हे काही वाडे होते. शुक्रवारवाडा हा दुसऱ्या बाजीरावाने बांधला. भव्यप्रवेशद्वारे, सुंदर लाकडी कोरवी काम, अनेक चौक, काचेच्या हंड्या, झुंबरे यांनी हे वाडे सजलेले असत. शुक्रवारवाडाही याला अपवाद नव्हता. याच शुक्रवारवाड्यात रामजोशींची कथा १८०८ या वर्षी श्रावणमहिन्यात झाली. बाजीरावांच्या आमंत्रणावरून शुक्रवारवाड्यात गेलेल्या रामजोशींनी ते वाड्याचे वैभव पाहिले. गोकुळअष्टमीच्या निमित्ताने झालेल्या या कीर्तनप्रसंगी बराच काळ कविराय तेथे होते. त्यांना ही वास्तु आवडली. रामजोशींमधील कलावंताला या वाड्याची तत्कालीन कलात्मक रचना भुरळ घालून गेली असल्यास नवल नाही. कलावंत हा आधी रसिक असावा लागतो. आणि रामजोशींच्या ठायी ही रसिकता बालपणापासूनच होती. या रसिकतेची कदर करणारा बाजीरावासारखा रसिक आश्रयदाता मिळाल्यावर आणखी काय हवे होते? वाड्याचे आंतरबाह्य रुप पाहिल्यावर प्रसन्न झालेल्या कविरायांनी लिहिले-

"कृष्ण जन्म आनंद वाटतो गोकुळ अज हे पुणे
श्रीमंतांचे मंदिर काही वसुदेवाहुनि उणे
अद्भूत कविचा वार पहा हो कृतमंदिर चातुरी
काय कल्पना अचाट शोभा बाहेर तसि भीतरी
जिकडे तिकडे रंग कटाडी खिडक्या जाळ्यावरी
ज्याणे त्याने बसुनि पहावे तेथे सुख अंतरी"

वाड्याचे रंगकाम, ठाई ठाई बांधलेले हौद, नित्य चाललेल्या स्नानसंध्या, जपतप, अनुष्ठाने, ब्राह्मण भोजने, गींत नृत्यादि कार्यक्रमांची रेलचेल यांचे-

"ज्या ज्या रुतुचे जसे यथोचित विलास नाना परि
भागवतांचे थवे नवे किति कीर्तनरस या घरी"

असे कविरायांनी वर्णन केले.

संध्यासमयी तर या वाड्याची शोभा काही औरच भासे-

"या सदनामध्ये निरंतर श्री दिवाराती साजिरी
संध्येपासूनि निशांत शोभा दीप तिमिर संहारी"

हे 'तिमिराचा संहार' करणारे दीप तरी कितीप्रकारचे!

"फाणस कंदिल पोत दुशाखा हिलाल समया तरी
समया अगणित मेणबत्तिचा प्रकाश अंतःपुरी"

या विविध प्रकराच्या दिव्यांच्या वर्णनावरून वाड्यात जणू दीपोत्सव चाललेला आहे असा भास होतो.

वाड्यात नाना प्रकारची मंगलवाद्ये वाजत असत. टाळ, विणे, रबाब, भेरी अशा वाद्यांचा ध्वनी वाड्यात उमटलेला असे. स्वतः बाजीराव दानधर्म करण्यात फारच प्रसिद्ध होता.

"दानधर्म आनंद पहा हो किति निशिदिनी होतसे

जेथे नर नारायण बसले स्वये भक्ति च्या गुणे
ते मंदिर कविराय वर्णितो नको म्हणावे कुणे”

पुणे शहराला जर सरोवर मानले, तर हा वाडा म्हणजे जणू ह्या सरोवरातील कमळ आहे.

“कविने मंदिर कमळ म्हणावे जर ही सरसी पुरी”

असे कौतुकाने कविरायांनी उद्‌गार काढले. हे वास्तुवर्णन त्यातील सहजसुंदर शब्दरचनेमुळे रसिकांचे लक्ष वेधून घेते.

❑ **समाजस्थितीपर**

रामजोशी कालीन समाजस्थिती, तत्कालीन राजकारण, दुष्काळ व पेंढार यामुळे लोकांची बनलेली मानसिकता या साऱ्यांचे प्रतिबिंब त्यांच्या ‘उगा भ्रमसि वाउगा कशाला’ ही दुष्काळावरची पोवाडेवजा लावणी आणि ‘यंदा घरधन्याने धंदा केला’ ही होळकरदंग्यावरील लावणी यातून पाहावयास मिळते. श्री. म. वर्दे लिहितात- “रामजोशींची पोवाडेवजा लावणी आणि अनंतफंदीच्या कित्येक लावण्या व त्याचप्रमाणे अनंतफंदीकृत माधवग्रंथाचा सहावा अध्याय, यात ज्या दुष्काळाचे वर्णन आहे तो दुष्काळ निसर्गाच्या प्रकोपामुळे आलेला नसून राजकीय बंडाळीमुळे उद्‌भवला होता. त्या दुष्काळाच्या पाठीशी मराठी राज्याच्या कैक प्रसंगांची परंपरा उभी होती.”

यातील काही महत्त्वाचे प्रसंग म्हणजे १७७५ मध्ये झालेला सवाई माधवरावाचा मृत्यू, रामशास्त्री, अहिल्याबाई होळकर इत्यादींचे मृत्यू. नाना फडणीसाचे नारायणरावाच्या चितेला साक्ष ठेवून राघोबाच्या वंशाला मुजरा न करण्याची घेतलेली शपथ, शपथ मोडून बाजीरावाला सत्तेवर आणणे, सत्ता टिकविण्यासाठी महाडचे कारस्थान, नाना फडणीसाची १७९७ मधली कैद, नानाला कैद करण्यासाठी दौलतरावाला दोन कोटी देण्याचा घाट, याच्या भरपाईसाठी शिंद्याकडून पुण्यातील शेठ सावरकरांना लुटणे, तुकोजी होळकराचा मृत्यू, अंतर्गत कलह तुकोजीच्या मुलातील संघर्ष, याचा गैरफायदा घेत दौलतरावाने मल्हारराव होळकरास मारले, बाजीरावाने विठोजी होळकरास हत्तीच्या पायी दिले,

विठोजीच्या मृत्यूने अतिशय संतापलेला यशवंतराव होळकर पुण्यावर चाल करून आला. त्याने पुणे लुटले, त्याच्या हत्ती-घोड्यांनी पिके तुडवत प्रचंड नासाडी केली. बाजीरावाने पळून इंग्रजाचा आश्रय घेतला. १८०२ रोजी वसईचा तह बाजीरावाने केला.

या साऱ्यांचा परिणाम सन १८०३ मध्ये पुणे प्रांतात दुष्काळ पडला. बेबंदशाही माजून १८०२ मध्ये दुष्काळाने भयंकर रुप धारण केले.

या साऱ्या घटना उघड्या डोळ्यांनी पाहणारे, अनुभवारे रामजोशी गप्प राहणे केवळ अशक्य होते. रामजोशींमधला कलावंत या घडणाऱ्या घटनांनी अस्वस्थ झाला असल्यास नवल नाही. त्यांनी या दुष्काळावर चार चौकी पोवाडा लिहीला. पहिल्या चौकात झालेल्या बंडाची

हकिगत येते. दुसऱ्या चौकात नीतिभ्रष्ट लोकांचे वर्णन, तिसऱ्या चौकात दुष्काळाने झालेले लोकांचे हाल याचे वर्णन केले आहे. शेवटच्या चौथ्या चौकात या दुष्काळाने वस्तूचे भाव वाढून गगनाला भिडले, महागाई वाढली त्याचे वर्णन त्यांनी केले आहे.

व्यक्तीवर्णनपर रचनेत 'सुभद्रेचा पोवाडा' आणि 'दुसऱ्या बाजीरावांचा पोवाडा' या रचना उल्लेखनीय आहेत. 'सुभेद्रचा पोवाडा' या काव्यावर मोरोपंताच्या काव्यरचनेचा प्रभाव आहे. असो, अशा प्रकारे श्रृतिमनोहर लावणीरचना करून रामजोशींनी मराठी भाषकांची मने जिंकली.

**❑ शाहीर असंस्कृत वा गावंढळ नव्हते**

मराठी शाहीरांवर सनातनी विद्वानांनी असंस्कृतपणाचा, गावंढळपणाचा आरोप केलेला आहे. रामजोशींच्या कार्यकर्तृत्वाचा विचार करता, त्यांनी आपल्या व्यासंगाने हा आरोपतथ्यहीन असल्याचे दाखवून दिले आहे. मूळात शाहीर ज्या काळात वावर होते आणि ज्या लोकसमुहाचे मनोरंजन करीत होते त्यांची सुख-दुःखे, संघर्ष, इत्यादी अनेक गोष्टींचे प्रतिबिंब त्यांच्या काव्यात उमटलेले दिसते. श्री. रा. वि. काळी लिहितात– "जानपदाचे सुखदुःख, आशा निराशा, इच्छाध्येये, आवडीनिवडी, आचार-विचार-संस्कार या सर्वांचे पडसाद लावणी वाङ्मयात उमटले आहेत. त्यातील शब्दसंपदा, उपमा, उत्प्रेक्षा, अलंकार अस्सल ग्रामीण मराठी आहेत.

मराठ्यांचा सडेतोड रांगडा स्वभाव ह्यांचे संस्कार व त्याचे संपूर्ण जीवन त्यात प्रतिबिंबीत झालेले दिसते आणि म्हणूनच महाराष्ट्राचे राष्ट्रीय व जानपद वाङ्मय म्हणून लावणी वाङ्मयाकडे बोट दाखविता येते."

रामजोशींच्या समग्र काव्य संपदेचा धांडोळा घेत असतांना लक्षात येते की, शाहीरांवर सनातनी लोकांनी मारलेला गावंढळपणाचा आक्षेप रामजोशींनी आपल्या व्यसंगाने खोटा ठरवला.

केवळ संस्कृतच नव्हे तर, संस्कृत, मराठी, कानडी, हिंदी भाषेचा वापर करून कविरायांनी निर्माण केलेली रचना याचेच एक उदाहरण आहे.

"पाहि पाहि निजभवनं प्रति" "कां बोलसी मुडदारा"
"नितं मातना केळुदिला" "चल छोड पलो मेरा"

संस्कृताभिमानी तत्कालीन सनातनी रामजोशींना नाके मुरडत. त्यांचा विरोधही वेळप्रसंगी त्यांना सहन करावा लागला. रामजोशींनी केलेल्या काही संस्कृत रचना बघितल्या नंतर या सनातन्यांचा विरोध गळून पडलेलला दिसतो. प्रतिभा, पांडित्य आणि पौरूष यांचा संगम रामजोशींच्या व्यक्तीमत्वात दिसतो. म्हणूनच मुद्गलशास्त्री, मोरोपंत, नीळकंठशास्त्री थत्ते, बाजीराव पेशवे अशा भिन्न भिन्न व्यक्तीमत्वाच्या माणसांचे प्रेम रामजोशींनी मिळवले.

अनुक्रम

कवितेत प्रौढ संस्कृत शब्दांबरोबरच लगेच खेडवळ शब्द योजण्याची त्यांची हातोटी. अनुप्रास, श्लेषयुक्त शब्द वापराची हौस आणि संस्कृतसाहित्याचा त्यांच्यावर झालेला परिणाम यातून ही कविता सिद्ध झाली, म्हणूनच य. न. केळकरांनी "दोष असले तरी रामजोशी हा त्या काळच्या लोककवीत उच्च स्थानी शोभण्यासारखा कवी होता हे मान्य केलेच पाहिजे." असे उद्‌गार काढले.

रामदासांनी कवित्व लक्षण सांगतांना धीट, पाठ, प्रासादिक अशी वर्गवारी केली आहे. संतांची कविता 'प्रासादिक', पंडितांची काव्यरचना 'पाठ' पद्धतीची तर शाहारांची लावणी (रचना) ही 'धीट' पद्धतीची रचना आहे. शाहीर धीटपणे जीवनातल्या सुखदुःखाला सामोरे गेले. धीटपणे त्यांनी शृंगार वर्णन केला तसेच धीटपणे उपदेशही केला. या धीटपणाबरोबरच कमालीचे प्रामाणिकपण त्यांच्या जवळ होते. तेव्हा असे शाहीर गावंढळ कसे ठरतात? असंस्कृत कसे ठरतात?

सूक्ष्म निरीक्षणातून सारा समाज व्यवहार काव्यातून उलगडून दाखविणारे शाहीर म्हणूनच, वृत्तीने सुसंस्कृतच होते. हे रामजोशींनी तत्कालीन समाजाला दाखवून दिले.

**❑ मोरोपंतांच्या आर्येचा प्रसार**

पंडिती काव्य हे अभिजन वर्गासाठी निर्माण झालेले दिसते तर शाहिरी वाङ्मय हा अस्सल 'मऱ्हाटमोळा' उद्‌गार आहे. पंडीत कवींमध्ये मोरोपंतांचे स्थान अद्वितीय आहे. मोरोपंत रामजोशींच्या रचनेमुळे प्रभावित होऊन त्यांच्याकडे आकृष्ट झाले. रामजोशी तर मोरोपंतांना अतिशय मानत असत.

रामजोशींच्या त्रिविध कामगिरीतील एक महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी मोरोपंतांच्या आर्येचा प्रसार आपल्या कीर्तनातून महाराष्ट्रभर केला. वेळप्रसंगी मोरोपंतांनीही त्यांच्या कथेला हजेरी लावलेली दिसते. या संदर्भात एका आख्यायिकेचा उल्लेख महाराष्ट्र सारस्वतकारांनी केलेला आहे.

"एके वेळी मोरोपंत कथेस बसले असतां त्यांनी पंतांच्या एका आर्येचे दोनतीन अर्थ लावून दाखविले व अर्थ सांगता-सांगता पुढे गेले होते ते मागे वळतांना पंतांकडे पाहून म्हणाले, 'माझ्या अल्पबुद्धीला सुचले ते दोन-तीन अर्थ मी सांगितले; पण या विशाल उदरांत अजून किती अर्थ भरले असतील हे त्यांचे त्यांसच माहीत." (महाराष्ट्र सारस्वत - वि. ल. भावे, पृष्ठ - ५६२-६३)

रामजोशींमुळे मोरोपंत घराघरात जाऊन पोहचले. रामजोशींसारखा निरुपक मिळाल्यामुळे हे पंडितीकाव्य बहुजन समाजापर्यंत जाऊन पोहचले.

मोरोपंतांच्या पंडितीकाव्यरचनेचा पुष्कळसा प्रभाव रामजोशींच्या रचनेवर पडलेला दिसतो. उदा. रामजोशींनी लिहिलेल्या 'मदालसा चंपु' सारख्या संस्कृत ग्रंथरचनेची प्रेरणा मोरोपंत हीच आहे. तर 'सुभद्रेचा पोवाडा' या सारख्या रचनेवर मोरोपंतांच्या रचनेची पुष्कळ छाप दिसून येते.

**❑ समारोप**

मनस्वी आयुष्य जगलेले शाहीर रामजोशी हे निःसंशय थोर कलावंत होते. आयुष्य समरसून जगणारा हा कलावंत होता. रामजोशींनी आयुष्यात कोणतीच गोष्ट वर्ज्य मानली नाही. त्यांनी माणसांवर प्रेम केले, भाषेवर प्रेम केले. भाषेचा संस्कार आणि ज्ञान यांचे प्रतिबिंब त्यांच्या रचनेत पाहावयास मिळते. आपल्या परिश्रमाने लावणी छंद संपन्न करण्याचे काम त्यांनी केलेले आहे. लावणीछंद प्रतिष्ठित करण्याचे श्रेयही त्यांना द्यायला हवे.

मराठी वातावरण, मराठी छंद, मराठी वाद्ये यांच्या साहाय्याने रामजोशींनी निर्माण केलेली काव्यसंपदा म्हणूनच, दोनशे वर्षांनंतरही मराठी मनाला खुणावते आहे. उच्चकुळात जन्म झालेला असूनही, जातिपातीचा संकुचित विचार त्यांच्या मनाला कधीच शिवू शकला नाही. किंबहुना अशा काही प्रसंगात त्यांनी बंडखोरी केलेली दिसते आणि म्हणूनच की काय, आपल्या जवळचेही सारे (काव्य) हातचे राखून न ठेवता, त्यांनी मराठी मुलुखाला आणि मराठी रसिकतेला वाटून दिले.

एका विशिष्ट संस्कारांच्या चौकटीत बालपण व्यतीत झाल्याने, नि कोणतीही चौकट कधीच न मानवणाऱ्या या मनस्वी कलावंताची म्हणूनच प्रसंगी घुसमटही झालेली दिसते. मूळात स्वच्छंदी आणि सरळ मनाच्या या कलावंताला समजून घ्यायला घर, तत्कालीन समाज कमी पडला. ऐन तारुण्यात शाहीर रामजोशींचे वर्तन हे शिष्ट समाजाच्या शिष्टाचाराला मोडीत काढणारे ठरले. काहीसे स्वैराचारी, अनाकलनीय असे या शाहीराचे वागणे म्हणजे, केवळ 'यथाराजा तथा प्रजा' असे म्हणून भागणार नाही. त्यासाठी या कलावंताच्या मनाचा ठाव घेण्याची क्षमता हवी. रामजोशींच्या अशा वर्तनावर टीका करणे तुलनेने सोपे आहे. परंतु त्यामागच्या कारणांचा गंभीर विचार करणे आवश्यक आहे. असो.

आरंभीच्या काळात त्यांनी तुरापक्षाची शाहिरीही केला होती. स्वतः 'शाहिरांचा तुरा' म्हणविणाऱ्या रामजोशींचा 'शिवशक्ती-सामरस्यावर पूर्ण विश्वास होता. म्हणूनच 'तुळजाभवानीची' आळवणी करतांनाच 'श्रीसांबाच्या समान' सारखी रचना करायला ते विसरत नाहीत.

अनुक्रम

आपल्या शाहिरी परंपरेचे भान जागवतांना ‘श्रीनाथा - सद्गुरूपदा’ सारखी रचनाही ते करतांना दिसतात. तर ‘कविराय चमकला हीर लोकशाहीर इतर शाहीर काजवे वांग’ या सारख्या ओळीतून ते आपल्या काव्याविषयीचा अभिमानही जागवतात.

शाहीर रामजोशींनी जाणिवपूर्वक काही गोष्टी केलेल्या दिसतात. त्यांनी छंद-फंद जसे जाणीवपूर्वक केले तसेच ज्ञानार्जनही तितक्याच निष्ठेने आणि जाणिवपूर्वक केलं. संस्कृत भाषेचा वृथा अभिमान बाळगणाऱ्या पंडितांनीही हेवा करावा असे प्रभुत्व त्यांनी गीर्वाण भाषेवरही मिळवले. इतकेच नव्हे, तर या भाषेत जशी त्यांनी रचना केली त्याप्रमाणे मराठी, हिंदी, कानडी, संस्कृत या भाषांचा वापर करून, त्यांनी एक बहुभाषिक रचनाही करून दाखविली. ‘मदालसाचंपू’ ‘रामाष्टक’ अशा रचनाही त्यांनी केल्या.

आपल्या विषयी ज्यांचे ज्यांचे जे काही गैरसमज झाले असतील, त्यांना त्यांना त्यांनी; कृतीतून उत्तर दिले. जात, नाती, भाषा, या सर्व ठिकाणी त्यांनी विलक्षण बंडखोरी केली. रामजोशींचे वर्तन हे केवळ क्रिया-प्रतिक्रिया या स्वरूपाचे नव्हते तर त्यामागे, एक निश्चित विचार होता. सामान्यांविषयीची कणव होती. प्रस्थापितांविरुद्धची त्यांनी खेळलेली प्रत्येक चाल ही विचारपूर्वक केलेली कृती होती. अन्यथा - नटाचे तोंड आयुष्यात पाहणार नाही, असे म्हणणारे; ज्येष्ठ पंडित कवी मयुरपंत रामजोशींना स्वतःहून भेटण्याचा प्रश्नच आला नसता.

स्वतःबद्दलची इतरांची चुकीची मते दुरूस्त करून त्यांना चोख उत्तर देणारा हा शाहीर, ही पेशवाईतील केवळ नवलाईच नव्हे तर चमत्कारच म्हणावा लागेल. असे आम्हास वाटते.

बालपणापासून अस्तित्वासाठी केलेला विलक्षण संघर्ष, मोडून पडण्याच्या आलेल्या असंख्य वेळा, कलावंत म्हणून रुजतांना, अंकुरतांना, झालेली विलक्षण घुसमट, माणसाच्या ठायी प्रगटणारी ‘माणूसकी’ हेच श्रेष्ठ जीवनमूल्य मानणारा हा शाहीर वादग्रस्तच ठरावा यात नवल नाही.

सारांश, शाहीर रामजोशींना खऱ्या अर्थाने समजून घ्यायचे असेल तर त्यांच्या अंतरंगाचा ठाव हा नेमकेपणाने घेता आला पाहिजे. अन्यथा शाहीर रामजोशी हे शब्दप्रभू की भाषाप्रभू या वादात आपण अडकून पडण्याचीच जास्त भीती आहे.

कदाचित, ज्येष्ठ अभ्यासकांचा रामजोशी हे केवळ ‘शब्दप्रभूच’ हा निष्कर्ष बरोबरही असेल, परंतु ते शाहीरांचे एकतर्फी केलेले मूल्यमापन ठरण्याचीच शक्यता अधिक आहे.

थोडक्यात, शाहिरी आणि पंडिती कवितेला जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणून, रामजोशी यांनी मराठी-कवितेत दिलेले योगदान मराठी भाषिक आणि रसिकांच्या सदैव स्मरणात राहील याबद्दल कुठलीच आशंका नको.

अनुक्रम

❑

## ❑ भाग - ३ ❑

### ❑ रामजोशी यांच्या लोकप्रिय अशा काही रचना ❑

अनुक्रम

## १. दैवतवर्णनपर (गणेशस्तवन)

निजवदनी या गजवदनाचे स्तवन घडाव गड्या ।
का विफळ गमाविसी घड्या ॥ ध्रु ॥
शंकरसुत अभयंकर त्याचा किंकर हो झडकरी ।
तरि मानव तनु ही खरी ॥
एकदन्त गुणवन्त कलानिधी महन्त भुवनोदरी ।
हा त्रिभुवनमंगलकारी ॥
लंबोदर सुखदायक विद्यांभोजनिधिअंबुज निज अंतरी ।
हा विघ्नगजावरी हरी ॥
आहे हा यास्तव निशिदिनीं भजा ।
धरी निजशिरी चरणिंच्या रजा ।
असा सुर सुखकर नाही दुजा ।
भजनें गात रोकड्या बा भवार्णवांतिल किड्या ॥ १ ॥
शुंडादंड-सुमंडित-गंडस्थळि दूर्वांकूर नवे ।
मधुपांचे फिरती थवे ॥
मरकत मणिचे कनक किरीटी जसे बसविले जवे ।
ही शोभा नच बोलवे ॥
पायस मोदक लाडु खोबरे खडिसाखरेचे रवे ।
ही भक्षायाची सवे ॥
असे हा धणिवर ठाऊक । जगा ।
मोडिल्या किती असुरांच्या रगा ।
अशाच्या पदकमळीं कर लगा ।
वागामृताच्या वड्या या म्हणूं नये वावड्या ॥ २ ॥
इन्दु शिरावरी सिंधु बुद्धिचा बंधु करुन घे कसा ।
धर याच्या पदरसारसा ।
सात्विक त्याला सत्व तमासी तम राजस राजसा ।
हा जसा भाविला तसा ॥
कार्यसिद्धिकर इतर दैवता बारा वर्षे बसा ।
हा आज आठ, चौदिसा ॥
अरे हा सतत ठेवा मनीं ॥
विनायक भाद्रचतुर्थी दिनीं ।
पहावा अधिक सुखप्रद जनीं ।
या चरणासी जड्या हो कविरायाहुन पड्या ॥ ३ ॥

❑

अनुक्रम

## १. दैवतवर्णनपर- दाट साधुचा हाट (बार्शीच्या भगवंतावर)

दाट साधुचा हाट भागवत पाठ रुचिर फारशी ।
अशी ही अद्भूत जगीं बारशी ।
संत शांत गुणवंत पहा भगवंत नांदतो हरी ।
मिराशी जागा याची खरी ।
खुंटविली वैकुंठपेठ ही कंठितसे भूवरी ।
बारशी वेतन याची खरी ।
चार दिवस बाजार तेथीचा वार करुनि लौकरी ।
आला हो बाइल पाठीवरी ।
मला वाटते थेट हा आला पळुनिया घरी ।
वोढितील तेथें देणेकरी ।
हा जरा बाजरा घेऊनि आला घरी ।
नाहीं सुपटोपली वैकुंठी तागडी ।
श्री लपउनि मागे पांघरतो घोंगडी ।
जनु वसन मिळेना कुसुमाची आंगडी ॥
दगाबाज हा बगा देतसे दगा मिसळ सारशी ।
आम्हाला पाहुनि बिनवारशी ॥ १ ॥
तिथें बुडविले इथें आला तरी जिथें तिथें हा तसा ।
पहा हो खटला केला कसा ।
शर्वादिक दुर्वास गर्विला गर्वी देउनि पिसा ।
अंबऋषीस दिला भरंवसा ।
तीर्थपारणार्थ मिसे हो व्यर्थ गांजी राजसा ।
मुनेचे पोटी सुदर्शन ठसा ।
शाप देऊनी ताप सोसिले आपण गर्भि वसा ।
दहादा काय चांगले वसा ।
हे क्षेत्र बारशी त्या दिवसापासुनी ।
काय केले हो याणे पंकनाम नासुनी ।
जें मना येईल तें प्रभु करितो हासुनी ।
इथें काय चालतें उदंड मुख वासुनी ।
राय सुराचा काय न करी हा पाय मात्र सारसी ।
आम्हा भ्रमरासी गम्य फारसी ॥ २ ॥
तिथें बुडविले इथे आला तरी ।
बसवलिंग हा जंगम याणें संगमसुखिं लाविला ।
तयाचा सेवक हा म्हणविला ।
भक्तियोग सुविरक्त जगाला मुक्तीमार्ग दाविला ।

अनुक्रम

उत्तरेश्वरी मठ बांधुनि दिधला ।
गुरुवर्या ज्या मर्यादेने निर्याणी स्थापिला ।
मठावरी पुत्र योग्य जाहला ।
नाम जया जयराम सुखाचें धाम रसिक साधुला ।
करुनि हा भगवंती ठेविला ।
या पुरुषवरानें अमरसभा जिंकिली ।
जें धर्मतत्व तें यांस गवसली किली ।
किती कूप वापिका देवालयें झांकिली ।
पर उपकाराची सीमा करुनि टाकिली ।
अविरत पदनत कविरायाच्या न विसरावा रसीं ।
म्हणुनि दे सुत भैरव आरसी ॥ ३ ॥

❑

## २. क्षेत्रवर्णन (पंढरपूर)

क्षमातळीं इजसमाज नाहीं उमामहेश्वर पुरी ।
पुरी पडेना काशी मग इतरा दासी न कोण असी हो पंढरी ॥
पांडुरंग जगदंतरंग जीमाजि रंगला धणी ।
पार्श्वि रमा रखुमाइ पृष्ठतो राहि जशी सुखाची खणी ।
शेषशायन पटुवेष निकट व्यंकटेश गणपति गुणी ।
उभा दक्षिणद्वारी अतिभारी विठ्ठल विभुचे गुण गण गणी ।
बाळकृष्ण गोपाळ रांगता व्यालमुकुटमणि फणी ।
अहा तशीच ती भामा अतिवामा विभुच्या नायिकात हिरकणी ।
दार धरुनि सरदार उभा केदार लिंग अंगणी ।
रंगशिळेवरि गाति किती नाचती गरुडस्तंभा कवटाळूनी ।
सभामंडपीं उभारुनी भुज उभा मरुत्सुत ऋणी ।
अहा गरुडपाराची किती शोभा त्याची वर्णावी तरि कुणी ॥
.... हा मंडप नोहे विमान वर थाटला ।
भूवैकुठींचा गगनाने चाटला ।
ज्यामध्यें सदोदित भगवज्ञन दाटला ।
की भवार्णवीचे गलबत मज वाटला ।
कामादिक जलचर जमाव चट फाटला ।
क्षण यामधिं शिरतां वाटे भव आटला ।
मग सहजचि उतरुनि पांडुरंग भेटला ।
.....बऱ्या दिसति ओवऱ्या ऋषींच्या दऱ्या दुबाजूवरी ।
सदा घोष नामाचा गुण ग्रामाचा घेती कितिक अंतरीं ॥ १ ॥

अनुक्रम

महाद्वार तुम्हि पहा तरिच जन्म हा सफळ मानवी ।
वरी चौघडा वाजे अति साजे काहिल मढविली नवी ।
बळी तसा पदतळी घातला मुळीं हरिस लोभवी ।
नको कथा वाम्याची त्या नाम्याची यापरी विश्वशोभवी ।
पुढें समाधिंत दडे पदांबुजि पडे न चोखा भवीं ।
असो महार यातिचा जातीचा हरिच्या भागवतोत्तम कवी ।
रुका वेचिता दुकान जवळिच बुका माळ लाघवी ।
देति माळिणी माळी चित्ती सुक्या न रिझ आघवी ।
अशा दुरस्ता विशाळ माड्या तशात यदुकुल रवी ।
उभा नदीच्या काठी जन येती भेटी बकीलसा पालवी ।
जे महार्णवाची जगद्‌भुत कामिनी ।
ती भीमरथी या स्थळिं दक्षिणगामिनी ।
श्री शंकरजीची शिरोवंद्य स्वामिनी ।
पृथ्वीच्या जाणे मध्यदेशी हा मणी ।
जै कार्तिक मासीं शुक्लपक्ष यामिनी ।
पुलिनांत पताका जैशा सौदामिनी ।
आनंद सावता माळि कबिर मोमिणी ।
लोहदंड त्या क्षेत्र पंढरी पुंडरीक चौधरी ।
हा मुख्य येथींचा राणा जाणा ज्यास्तव उभा अजुन विटेवरी ॥ २ ॥
शिळामूर्ति रघुकुलाधीश पदतळाजवळ ती सती ।
उभी अहिल्याबी करि घाई जणो पुनरपि रज याचिती ।
पुढें दक्षिणेकडे प्रदक्षिण घडे क्षेत्र सव्य ती ।
दिव्य चमकती फरशी सज्जन चरणरजें उजळती ।
लोट घेती किति पोट खरडिती ओठ भजनि हलविती ।
गळा तुळशीच्या माळा सवे पाळा गोपाळाच्या किति नाचती ।
नवे भागवत थबे प्रदक्षिण सवें कितिक धावती ।
पंगु लागती रांगू किती सांगू अंधळे भुजा भुज कवटाळिती ।
रथा निरखिती कथा करिति कुणी पथांत मठ तरि किती ।
सव्य रोकडा घेती मग पुढती उद्धव चिद्‌घन आलिंगती ।
पुढे घाट नदीचा भीमरथी वाहती ।
किति तीर्थ-वंदने करिति किति नाहती ।
किति पुंडरिकाचा समारंभ पाहती ।
किति साधु पदांबुजिं नतमस्तक वाहती ।
किति शान्त दान्त वेदान्त पढुन राहती ।
किति तापस ऋतुसंताप समुळ साहती ।
मग मुक्ति तयांला गळा पडुनी पाहती ।

अनुक्रम

संत कथू किती महंत नगरी अनंत सुखदा करी ।
काय कथेचा धारा तो सारा श्रीमत्खासगीच्या मंदिरी ॥ ३ ॥
घरोघरी रस परोपरी किति बरोबरीचे गडी ।
साधु साधिती विद्या किति अध्यापक किति शिष्यांच्या सांगडी ।
दाट साधुचा हाट फुटेना वाट वाटता गडी ।
ताल सुराची करिती किती भरती विठ्ठल देती बुक्याची पुडी ।
फळात अथवा जळांत तुलसीदळांत बसता खडी ।
अशी माउली कैची भक्ताची नवैची ताजिम देते खडी ।
तुकया वाणराट तक्या मारि परि मुक्यापरी दे दडी ।
मिराबाइचा प्याला नाम्याला भ्याला प्याला त्याची कढी ।
भाव निरखितो राव सुरांचा हाव घालतो उडी ।
पुढे ठेवा कण वाळुचा कनवाळू विठ्ठल म्हणतो साखर खडी ।
हा भक्तासाठी अवतरला या कली
ती वैकुंठीची पेठ वोस हाकिली
ही अपार द्वारावती उभी ठाकली
मंडळी व्रजांतिल कोठें नच फाकली
वसुदेव देवकी नंदादिक झाकली
आहेत कोणत्या रुपे कोण आकळी
पंढरी सुखाच्या नरदेहे वाकली
मला वाटते बलानुज द्विज कुलाधिश हा हरी ।
येती राउळी अवघे ते बडवे यांचे गोप गोपिका घरी ॥ ४ ॥
संत खेळती वसंत ऋतूंत भगवंत घेतसे हवा ।
शेज करिती कुसुमाची तळीं माचा वरता चंदनी मंडप नवा ।
वृष्टि सुखाची सृष्टि देखती दृष्टि भरुनि जेधवा ।
तदा आषाढी यात्रा या जनमात्रा सुख ते पार नसे उत्सवा ।
तटा धरुनि घनघटा उदकमय पटा पसरती शिवा ।
पुंडरिका वर नावा न वर्णवे महिमा मति तरी किति मानवा ।
तशी पुढति कुणि दिशी कार्तिकी निशि मग जन बोलवा ।
फार वदावें कायी ही बाई वैकुंठींचा मालवी दिवा ।
नदी खडक त्यामधीं करितसे गदेश मुरलीरवा ।
वेणुनाद तो समजा मनीं उमजा गोपद विष्णुपदाला स्तवा ।
किति नारदमुनिला कवटाळिती बाहुनी
गोपाळपुरू मग दधिकाला लाहुनी
किती हर्षति पद्मालयतीर्थी नाहुनी
तो व्यासाश्रम दर्शनानंद त्याहुनी
किति संध्यावळिमध्ये तप करितो राहुनी

अशी किती तीर्थे तुज कथू शपथ वाहुनी
पृथ्वीत पंढरी एकच घ्या पाहुनी
पाय धरिल कविराय दुजा अशी काय लावणी करी ।
माय कुणाची व्याली या गगनाखाली कविता सोलापुरी ।
क्षमातळी .........॥ ५ ॥

❑

## ३. पौराणिक शृंगारपर - राधासखीसंवादे (छेकापन्हुति)

राधासखीसंवादे छेकापन्हुति आयका ।
रसिक हो किती चतुर बायका ।
अंबरगत परि पयोधरातें रगडुनि पळतो दुरी ।
काय हा धीट म्हणावा तरी ।
तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हय्या हरी ।
नव्हे गे मारुत मेघोदरी ।
सासु सासरा पति यांदेखत अधरामृत माधुरी ।
घेतसे काय वादवे तरी ।
तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हय्या हरी ।
नव्हे गे मधुकर पंकजहरी ।
पटविघटितकुचतटहि वसंती हळूच येउनि उरी ।
शीतल स्पर्श सुगंधित करी ।
तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हय्या हरी ।
नव्हे गे मलयज करि चातुरी ।
सुवर्ण पाहुनिं तनुवरी वंचक रात्रीं शिरतो घरी ।
हात टाकतसे अंगावरी ।
तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हय्या हरी ।
नव्हे हा दस्यु समज अंतरी ।
सुंदर रतिजोगता मिळाला पति हि सुभगा खरी ।
दुजीला असा मिळल काय तरी ।
तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हेय्या हरी ।
नव्हे गे रतिला मन्मथ वरी ।

॥ चाल ॥ गुणवंत कुचावरि लोळे अति शोभला ।
तो कृष्ण काय? नव्हे गे हार कळेना तुला ।
बाइ अंगमर्दनीं अति सुखकर वाटला ।
तो कृष्ण काय? नव्हे कर दूतीचा भला ।

अनुक्रम

मज शीतल करितो श्रमि होऊनिया भला।
तो कृष्ण काय? नव्हे व्यजन सुवंशातला।
या परि निजसंतोषे वर्णी, पुसतां यदुनायका।
लोपवी मुरलीच्या गायका।
राधासखीसंवादे छेकापन्हुति आयका।
रसिक हो किती चतुर बायका! ॥१॥
कंठिं लपेटुनि सदा असावी सुभगा गुणशालिनी।
वाटते पुष्पवती शोभिनी।
वृषभानूची सुता काय ती राधा लिकुच स्तनी।
नव्हे रे माळ आठवली मनी।
अधरचुंबिनी वंशसंभवा लालसमधुरध्वनी।
असावी मुखासि मुख लावुनी।
वृषभानूची सुता काय ती राधा लिकुच स्तनी।
नव्हे रे मुरली जगमोहिनी।
सरला ती सद्वंशा गौरा अतिशय संयोगिनी।
येतसे करीं धरुनि जे वनीं।
वृषभानूची सुता काय ती राधा लिकुच स्तनी।
नव्हे रे यष्टी सहचारिणी ॥
नखक्षताने मृदुक्कणान्ती ती नवनवगुणरागिणी।
धरावी हृदयी कवटाळुनी।
वृषभानूची सुता काय ती राधा लिकुच स्तनी।
नव्हे रे वीणा मृदुभाषिणी।
विपरीताही तनुवरि घेतां सुदशा सुखदायिनी।
लहानशि श्यामतनु हारिणी।
वृषभानूची सुता काय ती राधा लिकुच स्तनी।
नव्हे रे मत्कंबल भोगिनी।

॥ चाल ॥ वाकडी दिसे परि बहिरंतरनिर्मळा।
ती काय राधिका? नव्हे इंदुची कळा।
जी चांगट बसली धरुन रसाच्या तळा।
ती काय राधिका? नव्हे भुजंगाबळा।
किति मंजु वसंती रसाळ जिचा गळा
ती काय राधिका? नव्हे गड्या कोकिळा
या परि हरि राधेला वर्णुन, पुसतां क्षणि लोपवी।
चतुर हा यदुकुलपंकजकजरवी।
श्रीकृष्णाची सखी संवादे छेकापन्हुति नवी।

अनुक्रम

ऐकता जन्म सफल मानवी ।
करी हा कविरायाहुन कवि ।
राधासखी संवादे ।.... ॥ २ ॥

❑

## ४- लौकिक शृंगारपर - कोण्या ग सुभगाची मदनमंजरी

कोण्या ग सुभगाची मदनमंजरी । सांग सखे सुंदरी ॥ धृ ॥
इच्या सौंदर्याची सीमा । झाली गडे रतिहुनि अति उत्तमा ।
पाहुनिया मुखचंद्रमा । सखे गडे अमा गमति पौर्णिमा ।
काय अधराची रक्तिमा । लाजवी नव कुंकुम विद्रुमा ।
अंगिं वसन जिच्या भर्जरी । कोण्याग सुभगाची ।
मज वाटली विद्युत्रटी । भलिग रुपाची उतरली भटी । ॥ १ ॥
उरिं कंचुकि घट तटतटी । टिळक लल्लाटी सुधारस घटी ।
पाहुनी कृशा तव कटी । हरीचा कृश कटिमद् लटपटी ।
अशि- अनंत गुणगर्जरी । कोण्याग सुभगाची ॥ २ ॥
शिरी सुंदर नव मल्लिका । झटति वर मधुकर रस कौतुका ।
नयनाननखंजन रंजिका । मधुकर कंठात लाजवी पिका ।
अशि वर्णिले कोण सदलिका । इतर कवि कविरायाहुनि फिका ।
मज वाटतसे निर्जरी । कोण्याग सुभागाची मदनमंजरी ।
सांग सखे सुंदरी ॥ ३ ॥

❑

## ४- लौकिक शृंगारपर - सुंदरा मनामध्ये भरली

सुंदरा मनामध्ये भरली जरा नाही ठरली हवेलित शिरली
मोत्याचा भाग ।
अरे गड्या हौस नाही पुरली म्हणोनि विरली पुन्हा नाही फिरलि
कुणाची सांग ॥ धृ ॥
जशी कळी सोनचाफ्याची न पडु पाप्याची दृष्टी सोप्याची
नसल ती नार ।
अति नाजुक तनु देखणी गुणाची खणी उभी नवखणी चढुन सकुमार ।
जशि मन्मथ रति धाकटी सिंहसमकटी उभी एकटी गळ्यामध्ये हार ।
अंगि तारुण्याचा बहर ज्वानिचा कहर मारिते लहर मदन तलवार ।
पायी पैंजण झुमकेदार कोणाची दार?
कोण सरदार हिचा भरतार?

अनुक्रम

कुलविद्याजडाव टिकली मनामध्ये टिकली नाही हटकिली तेज अनिवार ।
नाकामध्ये बुलाख सुरती चांदणी वरती चमकति परति हिच्यापुढे फार ।
चालते गड्या गजाची चाल लड सुटली कुरळे बाल किनकाप अंगीचा लाल
हिजपुढे नको धन माल शोभवी दिठोणा गालं हिला जरि गाल-
विषय भोगाल फिटल तरि पांग ।
ही शुद्ध इंदुची कळा मतिस नाकळा तर वाकळा न हिजहुन चांग ।
सुंदरा मनामध्ये भरली जरा नाही ठरली ॥ १ ॥
सुंदरी मूर्ति मदनाची अमृत वदनाची मदन कदनाची विखारी धार ।
बाहुली कामसुत्रात मदन नेत्रांत कोक-शास्त्रांत निपुण ही फार ।
शुक पिक यांणि धरिली लाज जहालें वाज कंठी आवाज विण्याची तार ।
ही मन्मथ नवरस हवा काय पहावा बूट वाहवा सफल संसार ।
कचघनांत सौदामिनी दिवस यामिनी जपावी मनी की नकळे पार ।
वेणींत मुदराखडी कोर चोखडी माडीवर खडी विडा रंगदार ।
मणि कुसुम कर्ण शोभवी मतिस लोभवी मला तर थवी वाटली सार ।
नव्हे सुगंधा प्रौढ बाल दाविते तरुघोताल जित कुंबक तिचें-
नाल अप्सरा उणी गुणवान ।
वाटली मदन करवाल काय करवाल? कसे ठरवाल? हिचे कनक आंग ।
धाकुटी म्हणून कैकांची तुम्ही ऐकाची हिणे कैकांची उतरली भांग ।
सुंदरा मनामध्ये भरली जरा नाही ठरली ॥ २ ॥
भुजबंद छंद नग नवा बसविला जवा तंत ताजवा न बहु नगभार ।
त्रिवळी तळीं कांची दम मौक्तिकोद्दम हिचा दरदाम जाणतो मार ।
नखिं नखिं मेंदि रंग लाल अंगठी वर लाल बहुत गुलजार चमक हिल्लाल ।
सोन्याचे पायजिबतळी की मदन पुतळी टाकि भूतली मंजु झुंमकार ।
सुंदर म्हणसि बाहेर हिचें माहेर कुठे घरदार ।
ती उभी जवळ तिची बटीक चढून जा हटली बोल चाल ठीक-
माडीवर वार ।
दैवाने घ्यावी लाधली नार बाधली बहुत साधली विरळ कुणिवार ।
या परिं होऊनि बेताल तो तरुणही कुनका बाल ।
पुरविला मनाचा ख्याल हा दर्द कठिण बेताल ।
म्हणुनि टाकाल नाहक बहकाल सुरस रोखाल कुठून मग सांग ।
कविराय चमकला हीर लोकशाहीर इतर शाहीर काजवे वांग ।
सुंदरा मनामध्ये भरली जरा नाही ठरली
हवेलिंत शिरली मोत्यांचा भांग ॥ ३ ॥

❑

### ५- उपदेशपर - भला जन्म हा तुला लाधला

भला जन्म हा तुला लाधला खुलास हृदयी बुधा ।
धरिसी तरि हरिचा सेवक सुधा ॥ ध्रु ॥
चराचरीं गुरू तरावयाला नरा शिरांवरी हरि ।
जरा तरि समज धरी अंतरी ॥
हटातटाने पटा रंगवुनि जटा धरिशि कां शिरी ।
मठाची उठाठेव कां तरी ॥
वनांत अथवा जनांत हो कां मनांत व्हावे परी ।
हरीचें नाव भवांबुधी तरी ॥
काय गळ्यात घालुनि तुळशीची लांकडे ।
ही काय भवाला दूर करितिल माकडें ।
बाहेर मिरविशी आंत हरिशी वांकडे ।
अशा भक्तिच्या रसा- रहित तूं कसा म्हणविशी बुधा ।
हरिरस सांडुनि घेसी दुधा ॥ भला १ ॥
जाळ गळ्यामधिं माळ कशाला व्याळ काय कोपला ।
आंतुनि बाहेर म्हणविशी भला ॥
वित्त पहातां पित्त येतसे चित्त पाहिजे मला ।
असे हरि म्हणतो नुमजे तुला ॥
दांभिक वर संभावित अभ्यंतरी नाहिस बिंबला ।
बहिर्मुख नर नरका लाधला ॥
तू पोटासाठी करि खटपट भलतिशी ।
परि भक्ति रसाविण हरि भेटेल काय तुशी ।
काय मौन धरुनियां गोमुखिला जाळिशी ।
स्वार्थ सुखें परमार्थ बुडविला अनर्थ केला मुधा ।
न जाणसि कांजी म्हणसी सुधा ॥ भला २ ॥
टिळा टोपिवर शिळा पडो या बिळांत करिसी जपा ।
तथापि न होय हरीची कृपा ।
दर्भ मुष्टिच्या गर्भि धरुनियां निर्भर पशुची वपा ।
जाळिशी तिळा तांदुळा तुपा ।
दंडकमंडलु बंड माजविशी मुंड मुंडिशी तपा ।
न सार्थक लटक्या साऱ्या गपा ॥
ही बारबार तलवार येईल काय पुन्हां ।
ह्या दुर्लभ नरदेहांत ठेविशी कुण्हा ।
भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा ।
वर्म कळेना धर्म घडेना कर्म चित्त न द्विधा ।

सदा हरि कविरायावर फिदा । भला जन्म हा तुला ॥ ३ ॥

❑

## ६. समाजस्थितीपर - उगा भ्रमसि वाउगा (दुष्काळवर्णन)

उगा भ्रमसि वाउगा कशाला युगांत खळ हा कली ।
कलि मातला सारा घनदारा इच्छि राज्यास
इच्छि राज्यासही हाकली ॥ ध्रु ॥
कोणा न कुणि मना येईल तसें जनासि जन वंचिती ।
धननिमित्तें मरती किती गरती धरुनि यवन अन्न चारिती ।
आठ दिवसामधी पठाण निंदा लुटावया धांवती ।
उठाव याला तकवां नाहीं बकवा सारा धनिचाकर झुंजती ।
दार वित्त घरदारं दिलें तरि मार चुकेना अती ।
फार वंदू मी काई वधिल्या हो गाई बाटविल्या द्विज सती ।
फंद मातलें धुंद अलि बेबंद बुडाली क्षिती ।
मद करिति मसलतीला मग फसली तिला नावरिता बळे भोगिती ।
पुंड घरोघरीं बंड कुणावर दंड कोण बांधिती ।
खंड कुणांचा घ्यावा कुणि घ्यावा कुणी कुणाला किती ।
असा न कोणी पुसावयाला कसा काळ कशि मती ।
बसावया नच जागा मग पागा गजरथ बागा कुठें राहती ।
चिका आंत ज्या निक्या पढविल्या पिकाशिंगळ लाविती ।
विकावया त्या नेल्या किती मेल्या अबला उरल्या जन चुंबिती ।
फास गळ्यामधिं बांस पाठिवर लोह हाडा लाविती ।
मांस विप्र लोकांचे तोंकांचे वेचिति सांडस घेऊनि हातीं ।
न धीर वीर का हंबीर होऊनी फकीर भिक मागती ।
चीर नसे हो अंगा किति सांगावा तो ताप जिवा लागती ।
हातें धरुनि देवता फोडिल्या लताराम भंगिती ।
गतायु किति झाले किति प्याले विष किति उरलेसुख सेविती ।
किती सागर उदकें कुटुंबमह वाव्हले ।
किती दैवगतीने काशीसही पावले ।
किती कर्नाटकक देशात धनिक धावले ।
किती अब्रूचे जन तेथचि भांबावले ।
कैकांनी हरेबचनाग कैफ चावले ।
किति उठाउठी भयभीत मरण पावले ।
किती ब्राह्मण गालही यवनाने चावले ।
कावले जन करितील कांगावले ।

अति सात्विक ते दुष्कर्मी सरसावले ।
किती फंद करिती ते बंदातचि घातले ।
काय समय हा लया रुद्र करि दया- दृष्टि झाकली भया ।
नका क्षिति झाली घरघाली रुद्र विशंती जगीं फांकली ॥ १ ॥
रुसान कलिवर पुसा मनाला कसा काळ हा तरी ।
असा जनक्षय काहो कोणी पाहो संशय कथितों याचें बरी ।
घराधीश कोणी, परास म्हणती करा पातकें बरी ।
खराब जन निजकर्मे करिती अधर्म राजाची अफतरी ।
बाप तयाला ताप वृद्धपणी पाप पुत्र हा करी ।
शाप देतसे तोही म्हणे नोहे माझा वीर्यज हा तरी अरी ।
माय टाकिली पाय बांधुनि बायकोसि घे शिरीं ।
होय कशाशा बेटा तो पेटाऱ्यातुनि साप काढिला वरी ।
सून बहिण सासु हे ह्मणति तिशी सुरत-वासना धरी ।
भवन बुडि पापानें मधुपानें मातुनि माय सुताला वरी ।
मनी धरुनि कामिनी मठामधि मुनि विनय चातुरी ।
जगो दाविती बावा परि आतुनि कावा भोदुनी खाती पुरी ।
लेश नसे उपदेश आपुला देश टाकुनि दूरी ।
केशवार्चन करती वरती परी आतूनी कर्मे नानापरी ।
असे धूर्त जे तूर्त जगांमधिं मूर्त पाप चवधरी ।
पुर्ती मुखादिक याची व त्याची कर्मे म्हणू नको ही खरीं ।
वित्त ठरिती निमित्त ठेवुनि चित्त अर्थ यावरी ।
मत्त धन्याशीं चोरी करिती अधिकारी दया कोठुन भुसूरी ।
सती म्हणती निजपती त्यजुनि नांदती पराचे घरी ।
जिवें मारिता सरते त्यावर्ते दुसरे करिति कितिक सुंदरी ।
॥ चाल ॥
किती कन्याहयविक्रयें परम पातकीं ।
एकाची कृती एकास करी घातकी ।
किती दुर्मतीनें गुरुपत्नीला हाटकी ।
किती जारण मारण उच्चाटन नाटकी ।
कितिकांची वाणी मृषा वहुनि हलकी ।
धनी यास पालखी चाकरास नालकी ।
कुणि विधवा ठेविती घरांमधिं पाणकी ।
मित्रास वंचिती मग कोठुन भावकी ।
अशी किति पापें जगी कुणा ठाउकीं ।
जरा कशास्तव करावयास्तव जरा मतीस झांकली ।
करा श्रवण हो याचें व्हायाचें ऐशी विधि वाणी भाकली ॥ २ ॥

अनुक्रम

चिन्ह वाटतें भिन्न पुढति जें खिन्न जाहले मनीं ।
भिन्न देह किति करती किती भरती पोटें स्नाना कंटाळुनी ।
पहा कितिक जन महागाईने दहा दिशा धुंडुनी ।
अहा शेवटी मेले गेले यमलोकांशी गणावें कुणी ।
भणाण सारा दणाण झाला कणा न पावती सणीं ।
कुणास न मिळे भाजी कुणि राजी करडी मिळो आमडीं जुनी ।
मुरक चढती कुणी भूक म्हणती द्विज आधुक तशा ब्राह्मणी ।
क्रुकरी शाल शाला कुणी त्याला उभे राहूं न देता आंगणी ।
कढी म्हणुनी कोणी वडी घातली उडी घातली अन्न पाहुनी ।
रडवितातेि किति पोरे किति ढोरें तैशि ओढिति दारांतुनी ।
पाक हो न हो हांक मारिती भाकर द्या म्हणवुनी ।
टाक मुखामधि काहीं मज नाहीं म्हणती अन्न पंधरा दिनीं ।
जळें पिऊनी किती जलात फुगले पळात वपु त्यागूनी ।
गळा पडूनी किती रडती मरती बालक मुडदे कवटाळूनी ।
क्षुद्र इतर जे शुद्र तयांवरि रुद्र कोण या झणिं ।
मुद्रस कैचा त्याला भलत्याला भाकर मागति मुख पसरुनी ।
चणा भगर नाचणा एकादा धणा मिळे त्यांतुनी ।
उणा दिवाळी दसरा किती दुष्काळाचा घसरा घ्या पाहुनी ।
पीठ डाळ कुठ मीठ ढिगावरी नीट पडति जाउनी ।
धीट सोशिती कांही परि पाहि सोडित नच मेल्यावाचुनि ।
॥ चाल ॥
करतील काय हो अन्नविण गांजली ।
ही दुनिया सारी जठराग्नींत भासली ।
नच माधुकरीला कोणी तदा लाजली ।
वेंचिती शितें चिखलांत रांड माजली ।
धनिकाची दौलत आपणांतच सामावली ।
शेवटी विळे पळी दिवे लावणीं वाजलीं ।
यांवरी येऊनिया देवा कां गांजली ।
कैकांनी कुटुंबे विष पाजुनि निजविली ।
ही दुष्काळाची बरी नौबत वाजली ।
वर्णावी म्हणुनिया कवि मतीला लाजली ।
काठ कठिण दुष्काळ उडाला काळ रीति ठाकली ।
बाळ वृद्ध लोकांहीं कुठें काहीं तरीहो मर्यादा राहिली ॥ ३ ॥
सुधी म्हणति निरवधि काळ त्या मधिं दिड पायली ।
कधी ऐकिली चिपटी कधिं निपट कोळवीं चोळवीं कधिं पाहिली ।
जुना जिन्नस वरी उणा वाट कुटे कुणांत पत राहिली ।

मणास रुपये तेरा तेलाला बारा तुपा शपत वाहिली ।
गूळ असो तोळाभर आहे की मूळ मिठा चीडली ।
खूळ लवंगा पैशाचा सवंगा मीरची पांच दिधली ।
हुजूरवाणी रुजू तराजू खजूरी एकली ।
खिजून घेती पैशा देतिल हो कैसा माखली नच जिभली ।
गहूं म्हणति जे बहू सवंग ते नऊ चिपटी झाली ।
मउ नवे जे दाणे बेदाणे झाले अशि दशा साहिली ।
मका रांडही आका हिला परिशिका कोठडी केली ।
नका द्वाड एरंडी हे रंडी आठ चिपटी कधि ऐकिली ।
दुष्काळ त्यामधीं बकाळ मंडळी ठकापरिस ठक भली ।
दुकान घालुनि बसती वरि दिसती निर्फळ घातुकता बाइली ।
नितळ सोनियां पितळ म्हणति निज पितळ पुतळि आटली ।
कुतळ बुडविले सारे ही वारे वेळची सराफावर लादिली ।
सार हिऱ्याला गार म्हणति सोनार देत पावली ।
चार शेर तांब्याला का भ्याला म्हणे कांसार देत आधिली ।
पुढे काळ हा नुरे योग्यता विरे निघून चालली ।
आहे शालूच्या फर्दा चवलीचा खुर्दा काय गोष्ट । चांगली ।
हे राहों भाजींत बागवान जोडका ।
पैशाचा एकचि मुळा एक दोडका ।
पैशास मक्याचा कंट एक मोडका ।
हा कांदा दो पैशांस एक बोडका ।
जळणास रुपया एक लहान खोडका ।
घोड्यांस शिपाई काय करिल बोडका ।
काळानें देश यापरि केला रोडका ।
मग हत्यार राज उपाय काय थोडका ।
खाउनी नाबद म्हणों नये गोड कां ।
अजातरिपू हे प्रज्ञा इतःपत मजा वृष्टि शिरकली ।
दुजा असुनि कविरायाच्या कृति येथुनि उरकली ॥ ४ ॥

❑

### ७. वास्तुवर्णन - शुक्रवारवाड्याचा पोवाडा

कृष्ण जन्म आनंद वाटतो गोकुळ अज हे पुणे ॥
श्रीमंताचे मंदिर काही वसुदेवाहुनि उणे ॥ ध्रु ॥
अद्‌भुत कविचा वार हा हो कृतमंदिर चातुरी ॥
काय कल्पना अचाट शोभा बाहेर तसि भीतरी ॥ १ ॥

अनुक्रम

जिकडे तिकडे रंग कटाडी खिडक्या जाळ्यावरी ।
ज्याणे जेथे बसुनि पहावे तेथे सुख अंतरी ॥ २ ॥
ठाई ठाई हवुद जलाचे अमृतरसाचे परी ॥
स्नाने करिती संध्या जपतप किति विप्रांच्या हरी ॥ ३ ॥
जेथे नरनारायण पूज्या सांबासह आदरी ।
प्रभुच्या हस्ते विप्रभोजने भोजन ऐका तरी ॥ ४ ॥
साग्र गर्दळी-दळे तयावरि षङरस साखर पुरी ॥
भात केसरी भक्षुनि वाद्यें सेवे वरपिती खिरी ॥ ५ ॥
पकू दळाचे विडे सुवसने ज्या त्याररि भर्जरी ॥
हार गळ्यामध्ये तुरे लटकती ज्याच्या त्याच्या शिरी ॥ ६ ॥
गीत कला नर्तने दिवानिशी सदैव रस माधुरी ॥
राजसु जाहाला येक वेळ हा नित्योसव मंदिरी ॥ ७ ॥
ज्या ज्या रुतुचे जसे यथोचित विलास नाना परि ॥
भागवतांचे थवे नवे किति कीर्तनरस या घरी ॥ ८ ॥
तळी धरुनिया शिरो मंदिरा पर्यंकहि येकसरी ॥
पडदे फुल रेशमी बिछाने जरबाबी झालरी ॥ ९ ॥
कविने मंदिर कमळ म्हणावे जर ही सरसी पुरी ॥
पंकज मंदिर खरे न कमला गती कमलोदरी ॥ १० ॥
या सदनामध्ये निरंतर श्री दिवारती साजिरी ॥
संध्ये पासुनि निशांत शोभा दीप तिमिर संहरी ॥ ११ ॥
फाणस कंदिल पोत दुशाखा हिलाल समया तरी ॥
समया अगणित मेणबत्तिचा प्रकाश अंतःपुरी ॥ १२ ॥
सायंकाळी सुनास लक्ष्मी समा फिरती सुंदरी ॥
दांत मंचकी किती कितिक त्या डोले वरि नागरी ॥ १३ ॥
ज्याच्या दामल मुक्ता सत्कुच कंदुक शोभति उरी ॥
आनंदे क्रीडती नारि किति न कळत या किन्नरी ॥ १४ ॥
सुभोवत्या अप्सरा पहा हो चिन्ह भासते कसे ॥
सूक्ष्म दृष्टीने पाहिल त्याला सत्यचि सर्वहि दिसे ॥ १५ ॥
यास्तव या घरि कृष्णजन्म हे सत्यचि लटिके नसे ॥
टाळविणे किती रबाब भेरी वाद्ये वाजति रसे ॥ १६ ॥
दानधर्म आनंद पहा हो किति निशिदिनी होतसे ॥
जेथे नर नारायण बसले स्वये भक्तिच्या गुणे ॥
ते मंदिर कविराय वर्णितो नको म्हणावे कुणे ॥ १७ ॥

❑

अनुक्रम

## ८- स्थळवर्णन (पुणे शहराचे वर्णन)

ब्राह्मणी राज्य जोरदार घोड्यावर स्वार होते शिपाई ॥
जबर सिद्दी कैकांनी पाहिली शत्रु ठेविले नाही ॥ ध्रु ॥
श्रीमंत पेशवे प्रधान बहु प्रीतीचे ॥
अष्टप्रधानामध्ये उतरले मर्जीत महाराजांचे ॥
बसविले त्यांणी पुणे शहर टुमदारींचे ।
जागो जाग बांधिले दाट नळ पाण्याचे ॥
ठायिं ठायिं शोभत हौद एक फर्म्याचे ॥
धनी कृपावंत प्रभु कल्याण करी रयतेचे ।
लंकाच पुण्यामध्ये लेश न दारिद्र्याचे ॥
शहरांत घरोघर सावकार गबर घरचे ॥
सरदार एकाहुन एक श्रीमंताचे ॥
लढणार शिपाई किती सांगू मी वाचे ॥
हत्ती घोडे रथ अंबारी थवे पालख्यांचे ॥
सरकार वाड्या भोवताली झुलती बहारीचे ॥
जागो जाग वस्ती भरदार गर्दि बाजार कमती नसे काही ॥
पुणे शहर अमोलिक रचली अशी दुसरी नाही ॥ ब्राह्म ॥ १ ॥
उत्तम पुण्याभोवती शोभती बागा ॥
शहरांत हजारों स्वार घोड्यांच्या पागा ॥
भले भले धनत्तर वाडे हवेल्या जागा ॥
आळोआळी झळकती एक सारख्या रांगा ॥
वर्णितां गोड वाटतें किती तरि सांगा ॥
शहरात सुखी अवघे क्वचितची भीकमागा ॥
तेही गेले कोठें धर्मास करिनारे जागा ॥
शिंद्याचा ज्यान बत्तीस फ्रेंच नालुंगा ॥
गाईकवाड सरदार येती प्रसंगा ॥
धांवती रणांगणी मानकऱ्यांचा चुंगा ॥
शिरकेल कोणता काळ कोरण्या भुंगा ॥
(सहजात जिरविती सर्व तयांचा भुंगा ॥)
गोखले बापू तरवार बहादर फार लढाईत जाई ॥
शत्रूची फौज जर्जर करितसे लवलाही ॥ ब्राह्म ॥ २ ॥
साक्षात विष्णु अवतार पेशवे कूळ ॥
संपूर्ण महीचे भूप कापती धाक दरारा प्रबळ ॥
सखोपंत देवराव विठ्ठलनाना काळ ॥
शहाण्यात साडेतीन शहाणे (बुद्धीचे) सबळ ॥

अनुक्रम

सेवेत सर्वदा श्रीमंतांच्या जवळ ॥
होळकर भोसले शिंदे मानकरी सफळ ॥
तलवार बहादूर करिती शत्रूची राळ ॥
स्वारीच्या भोवती पटवर्धन मंडळ ॥
युद्धांत रणांगणी जसा आगीचा लोळ ॥
बहुनामी पल्लेदार तोफांचा कल्लोळ ॥
जे जाल जुंबुरे बाण करी वळवळ ॥
सरदार सभोंवती दाट पसरती तळ ॥
घोरपडे रास्ते सरदार पुरंदरे स्वार पानशे पाहीं ॥
फडणीस नानांची जरब भूमंडळी राही ॥ ब्राह्म ॥ ३ ॥
पर्वतावरती पर्वती स्थान त्यावरती चौघडा ॥
तळापर्यंत पायऱ्या जावे धडधडा ॥
अनुष्ठान पंचपक्वान्न पडेना खाडा ॥
पुजारी पूजिती उमामहेश्वर जोडा ॥
पीत वर्ण सोन्याच्या मूर्ति नव्हे या बाडा ॥
पहाऱ्यास शिपाई उभे पेटवूनि तोडा ॥
रमणाहि ब्राह्मणांसाठी बांधिला केवढा ॥
श्रावणमासि खर्च तो कोट्यावधि तोडा ॥
पुढे तळे त्यामध्यें लहान बेटाचा तुकडा ॥
गणपती त्यांत पलिकडेस आंबिल ओढा ॥
ग्रामांत तुळशी बागेत बेत ही जाडा ॥
बुधवार पेठ बेलबाग नजीकची वाडा ॥
जागोजाग मौज अनिवार नसे अंतपार वर्णू तरि काई ॥
कविराय म्हणे धन्य धन्य पेशवाई ॥
ब्राह्मणी राज्य जोरदार ॥ ४ ॥

❑

**❑ चार भाषेतील रचना -**

**(संस्कृत, मराठी, कानडी आणि हिंदी)**

पाहि पाहि निजभवनं प्रति
नित मातना केळुदिला
देहि देहि पथमिंद मुरारे
मी परगतिणी याक
पाहि पाहि निज-जनक-यशस्त्वं
नवपति निजमणि मुणगदशा

का बोलसी मुडदारा
चल छोड पलो मेरा
उचित नव्हे तुजला
पकडता यौं क्यों करभूला
सोडि वाट मजला
क्यौं कोने तुज बोला ॥

(चाल)

त्वं क्या विनोदं कुरुषे वेडे मूल
निवतं दिगेहळे क्यौं तुज पडली भूल ।
त्वदर्शनतः खलु उठतो मस्तकशूळ ।
रगनडि माधव ना शिरपर डालुंगी धूळ ॥

(चाल)

मुंच मुंच चैलांचल मधुना नंदाच्या पोरा ॥
हिड नियते फिग मन्याग पिह्जन बुरा बहुत मेरा ॥ १ ॥

❑ ❑

अनुक्रम

## ❑ भाग - ४ ❑

परिशिष्टे
लेखसूची
ग्रंथसूची
लावणी, पोवाडेसूची
अभ्यासग्रंथ

❑ ❑

# परिशिष्ट - १

**नाटक :**

| | | |
|---|---|---|
| कविराय रामजोशी | | |
| लेखक | | रा. ना. पवार |
| प्रकाशक | | जयहिंद प्रकाशन, झावबाची वाडी, मुंबई - २ |
| | | प्रथम आवृत्ती १९६२ |
| दिग्दर्शक | - | गोविंद कुलकर्णी |
| संगीत दिग्दर्शिका | - | सौ. जयमाला शिलेदार |
| ऑर्गन | - | एकनाथ चव्हाण |
| तबला | - | वसंत शिरोडकर |
| ढोलकी | - | १) जगन्नाथ गायकवाड २) वसंत गायकवाड |
| रंगभूषा व वेषभूषा | - | शंकर लोहकरे |
| विद्युत व्यवस्था | - | श्री. थिटे |
| व्यवस्थापक | - | वेदपाठक आणि एस. पुरूषोत्तम |

या नाटकाचा पहिला प्रयोग सोलापूर येथे पार्क मैदानावरील औद्योगिक - प्रदर्शनातील नाट्यगृहात शुक्रवार दि. २०-१-१९६२ रोजी रात्रौ ९·३० वाजता सादर करण्यात आला.

**नाटकातील कलावंत :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | रामजोशी | - | जयराम शिलेदार |
| २) | मुद्‌गलशास्त्री | - | अप्पासाहेब इनामदार |
| ३) | चिदंबरशास्त्री | - | किसनराव अग्निहोत्री |
| ४) | शुभराय महाराज | - | हंसराज कोरडे |
| ५) | मोरोपंत | - | गोविंद कुलकर्णी |
| ६) | श्रीमंत पेशवे | - | राजन (बाबा जावळे) |
| ७) | धोंडी शाहीर | - | विनोदमूर्ती वसंत शिंदे |
| ८) | शामभट | - | बुवा देशपांडे |
| ९) | बाळंभट | - | जीवनकुमार वाटवे |
| १०) | मोहोळचे पाटील | - | भाऊ मांजरेकर |
| ११) | नागू शाहीर | - | गजानन अनगळ |
| १२) | पुरशा | - | वासुदेव भागवत |
| १३) | बयाबाई | - | सिनेतारका हंसा वाडकर |
| १४) | गंगाबाई | - | सौ. अंजनीबाई तारकर |
| १५) | चिमा | - | सौ. सुशीला चव्हाण |
| १६) | अंबु | - | कु. कुसुम चव्हाण |
| १७) | नर्तकी | - | कु. उषा चव्हाण |

❑

अनुक्रम

## परिशिष्ट - २

**चित्रपट :**

**लोकशाहीर रामजोशी**
निर्माता - राजकमल कला मंदिर
सेन्सॉर नं. बी-३७०९७ दि. ३०-९-४७
दिग्दर्शक - बाबुराव पेंटर आणि व्ही. शांताराम
कथा-संवाद-गीते - ग. दि. माडगूळकर
छायाचित्रण - जी बाळकृष्ण
संगीत - वसंत देसाई

या चित्रपटाचे पहिले प्रदर्शन पुणे येथे १९४७ च्या डिसेंबर महिन्यात ‘वसंत’ चित्रगृहात झाले.

**चित्रपटातील कलावंत**

१) जयराम शिलेदार
२) हंसा वाडकर
३) शकुंतला एरन
४) मा. परशुराम
५) ग. दि. माडगुळकर
६) सुधा आपटे
७) सामंत
८) कानसे
९) वालावलकर
१०) जयरामपंत देसाई
११) मुजुमदार
१२) अभ्यंकर
१३) कारेकर
१४) सावळाराम
१५) वैद्य
१६) कागलकर
१७) ननंदीकर

❑

## परिशिष्ट) - ३

**रामजोशी गौरव**

- “किती श्रुति मनोहरा रसिक रामजोशी कृती।
  कृती न कविते तुझी करिती नूपुरे झंकृती ॥”

  - चंद्रशेखर

- “कविराया रे, तुझ्या स्मृतीला आज लाख वंदने।
  तुझ्या प्रसादे प्रमाद जाऊन होईल धन्य जिणे ॥”

  - रा. ना. पवार

- “वर्णमाधुर्याची ज्याच्या कानास काही लेश म्हणून ओळख असेल, शब्दांचा सुंदरपणा व खुमारी ही ज्यास यात्किंचीत् कळत असतील, तसाच त्यांचा झोंक व प्रौढपणा ज्यास थोडासा तरी समजत असेल त्यास कविरायांच्या लावण्या केवळ तल्लीन करून सोडतील, यांच्या कवितेत दुसरी अशी खुबी आहे की, संस्कृत कवींनी योजलेल्या प्रौढ शब्दांची व अर्थांची शुद्ध लौकिक मराठी भाषणांतील केवळ व्यावहारिक अशा शब्दांशी व अर्थांशी भेसळ केलेली आढळते; व ती भेसळसुद्धां इतकी बेमालूम केलेली असते की, त्यांच्या त्या मिश्रणचातुर्याने ते सर्व एकरंगी दिसून त्यापासून एक जातीचा विशेष आनंद उत्पन्न होतो. सारांश, सरस, प्रौढ, झोंकदार आणि आवेशयुक्त असे मराठी भाषेचे स्वरूप ज्यास पाहणे असेल त्यास तें या कविरायांच्या लावण्यांत सापडेल.”

  -निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर.

❑

अनुक्रम

## परिशिष्ट - ४

“दिनांक १५-४-१९३८ मध्ये मुंबई येथे स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या २२व्या अधिवेशनात शाहीर म. ना. नानिवडेकर यांनी शाहीर रामजोशी यांच्या ‘सुंदरा मनामधिं भरलि’ आणि ‘मदनमंजिरी’ या दोन लावण्यांना पारंपारिक चाली लावून श्रोत्यांसमोर सादर केल्या.”

❑

## परिशिष्ट - ५

काही लावणीकारांच्या लावण्यांवरून छंदोरचनेत निश्चित केलेली जातिनामे आहेत. रामजोशींच्या लावण्यातील जातिनामे पुढीलप्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मदनतल्वारजाती | - | 'सुंदरामनामधिं' |
| २) | मणिहारजाती | - | 'वर उठावल्या घनघटा' |
| ३) | श्रीरंगजाती | - | 'श्रीरंग गोपिकोत्संग' |
| ४) | केशवकरणीजाती | - | 'केशवकरणी अघटित' |
| ५) | यशोदाजाती | - | 'कारटा तुझा द्वाड' |
| ६) | मदनशऱजाती | - | 'हा वसंतऋतु' |
| ७) | आदिसुंदरी | - | 'ही सांग सखे सुंदरी' |

❑

## परिशिष्ट -६

**रामजोशी निपुत्रिकच होते काय?**

शाहीरी वाङ्मयाचे गाढे अभ्यासक कै. य. न. केळकर यांनी १९६७ मध्ये मिळवून प्रसिद्ध केलेल्या सांगली संस्थापक चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांच्या अधिकृत दरबारी रोजनिशीतील नोंदी आधारे, आपल्या ऐतिहासिक पोवाडे अथवा मराठ्यांच्या काव्यमय इतिहास भाग ३ या ग्रंथात, रामजोशी निपुत्रिकच वारले ही आतापर्यंतची समजूत चुकीची असल्याचे म्हटले आहे. यावर केळकरांनी पुढील पुरावे दिले आहेत.

**नोंद-१** "छ ५ सवाल भाद्रपद शुद्ध ७ गुरुवार मुक्काम सांगली (सन १८४७) - रात्री कै. रामजोशी सोलापूरकर यांचे पुत्र रा. पांडुबा जोशी सोलापूरकर हे उत्साहात आले आहेत. त्यांनी रामजोशी यांच्या लावण्याची वही आणली आहे ती खाशाजवळ त्यांनी रात्री वाचून दाखविली."

**नोंद- २** "छ ९ सवाल भाद्रपद शु ॥ ११ सोमवार मु. सांगली, तिसरे प्रहरी पांडोबा गोसावी सोलापूरकर हे रामजोशी कवी ज्याणी ईश्वरपर लावण्या केल्या त्याचे नातू, त्याचे कीर्तन श्री देवळात जाहले."

**नोंद-३** "छ ६ जिल्काद अश्विन शु ॥ ७ मंदवार मु. सांगली रा. पांडोबा जोशी सोलापूरकर हे श्रीचे उत्सवास आले होते. त्यास २५ रुपये रवानगी देऊन निरोप दिला. त्यांनी इंग्रजी सरकारातून करांचली आली ती बघितली. इंग्रजी चित्रे पेटी वगैरे चित्रे बघितली. उदईक निघून सोलापूरास जाणार."


केळकर म्हणतात - "वरील नोंदीत एके ठिकाणी पांडोबाला रामजोशाचे पुत्र म्हटले आहे तर दुसऱ्या नोंदीत नातू म्हटले आहे. ती दिनचर्या लेखकाची काही चूक आहे असे उघडच दिसते. पण त्यामुळे गोंधळ होणार रामजोशाच्या घरातून अधिकृत वंशावळ मिळाली पाहिजे. तथापि हा पांडोबा रामजोशीचा मुलगा किंवा नातू जरी ठरला तरी रामजोशी निपुत्रिक नव्हता एवढे मात्र निश्चित होत आहे. रामजोशाचे वंशज अलीकडे सोलापूरास दरसाल त्याचा उत्सवही करू लागले आहेत. त्यांनीच अस्सल आधारानिशी रामजोशाच्या चरित्रावर प्रकाश पाडावा. ते त्यांचे कर्तव्य होय."

कै. केळकरांनी श्रमपूर्वक, पुराव्यानिशी रामजोशी निपुत्रिक नव्हते असा आपला अभिप्राय नोंदवला असला तरी, वाईचे प्रा. शिवाजी रामचंद्र चव्हाण यांनी आपल्या 'मराठी आध्यात्मिक शाहिरी - परंपरा व वाङ्मय' या आपल्या प्रबंधात रामजोशींची माहिती देतांना, 'त्यांची (रामजोशींची) निश्चित अशी शाहीरी गुरूपरंपरा मिळत नाही. परंतु मुद्गल कुलाची वंशावळ उफलब्ध आहे' असे म्हटले आहे. प्रा. चव्हाण यांनी दिलेली वंशावळ प्रस्तुत ग्रंथात परिशिष्ट ७ मध्ये दिली आहे. त्यावरून असे दिसते की, मुद्गल जोशी-बजंभट-पांडोबा अशी ही वंशपरंपरा आहे. याचा अर्थ केळकरांनी दिलेल्या दुसऱ्या नोंदीत पांडोबांना रामजोशांचे नातू म्हटले आहे ते बरोबर आहे, परंतु रामजोशी यांचे ते प्रत्यक्ष नातू नसून भावाचे (मुद्गल) नातू ठरतात. रामजोशींची प्रसिद्धी लक्षांत घेता, 'रामजोशींचे नातू' अशी नोंद केली गेली. वंशावळीची आधारे रामजोशी हे निपुत्रिक असल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यामुळेच कै. केळकरांचे - 'रामजोशी निपुत्रिक नव्हता एवढे मात्र निश्चित होत आहे.' हे म्हणणे टिकत नाही.

❑

# परिशिष्ट - ७

## शाहीर रामजोशी यांची वंशवेल




(आधार - मराठी आध्यात्मिक शाहीरी - परंपरा व वाङ्मय - (प्रबंध) प्रा. शिवाजी रामचंद्र चव्हाण, वाई (सातारा)

# रामजोशी निर्देशपर लेख


- ❑ आठवले रा. ब./संस्कृत व मराठीतील श्रृंगार, यशवंत, मे १९४५
- ❑ कस्तुरे ज. रा./लोकशाहीर रामजोशी, तरुणभारत, नागपूर, दिवाळी अंक १९७२
- ❑ काणेकर पु. गो./तमाशा उगम, उत्कर्ष आणि अधःपात, विविधवृत्त, दिवाळी १९४८
- ❑ काळी रा. वि./महाराष्ट्राचे कलात्मक काव्य, मौज, दिवाळी १९४८
- ❑ केळकर य. न./रामजोशी ते प्रभाकर, लोकसत्ता, दिवाळी १९५७
- ❑ कोल्हटकर अ. ब./मराठी काव्याची प्रभात, प्रभात मासिक, जुलै १९१५
- ❑ कोल्हटकर अ. ब./मराठीतील लावण्या, सचित्र करमणूक १९२६
- ❑ गोंडसे द. ग./अमरभूपाळी, सत्यकथा १९५२
- ❑ थिटे वि. ना./रामजोशींची कविता - वाङ्मय शोभा - १९६१
- ❑ देशपांडे धों. वि./लावणी वाङ्मय काही विचार, सत्यकथा, डिसेंबर १९५२
- ❑ पंडित भ. श्री./कुलकर्णी श्री. मा./परांजपे भा. श्री./शाहीरी वाङ्मय एक चर्चा, युगवाणी, जुलै १९६३
- ❑ बाबर सरोजिनी/शाहीरी वाङ्मयातील समाजदर्शन, नवभारत, मे १९५५
- ❑ भारत इतिहास संशोधन मंडळ, वार्षिक इतिवृत्त, शके १८३७, पुस्तक १३४, पृष्ठ - २६७
- ❑ माडगूळकर ग. दि./रामजोशी ‘उत्तीर्ण’ रूपवाणी दीपावली-९३ (पुनर्मुद्रीत)
- ❑ शामसुंदर शंकर/दौलत जादा, रसरंग, दिवाळी १९६३
- ❑ सहस्रबुद्धे म. ना./लावणीसंप्रदाय, मौज, दिवाळी १९४८
- ❑ सहस्रबुद्धे म. ना./शाहीरीतील संगीत, सत्यकथा १९५३


❑

अनुक्रम

## ❑ रामजोशी निर्देशपर ग्रंथसूचि ❑

❑ ❑

- आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग-१ अ. ना. देशपांडे
- इतिहासातील सहली, य. न. केळकर, चित्रशाळा प्रकाशन पुणे १९६४
- गदिमा (साहित्य नवनीत) प्रेस्टीज प्रकाशन, पुणे - प्र. आ. १-१०-१९६९
- छंदोरचना मा. त्रि. पटवर्धन, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई १९३७
- तंत कवि तथा शाहीर - य. न. केळकर
- तुलनात्मक छंदोरचना, ना. ग. जोशी, मौज प्रकाशन, मुंबई १९६८.
- नवनीत शतसांवत्सरिक आवृत्ती १८वी - १९५७.
- नाचू कीर्तनाचे रंगी, यशवंत पाठक, कॉन्टिनेण्टल, पुणे १९८० आ. १
- निबंधमाला, विष्णुशास्त्री चिपळूणकर, चित्रशाळा प्रकाशन, पुणे आ. ३री १९२६.
- पारंपारिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाट्य-विश्वनाथ शिंदे - प्रतिमा प्रकाशन, पुणे प्र. आ. एप्रिल १९९४
- पेशवेकालीन महाराष्ट्र, वा, कृ. भावे - कवी व कीर्तनकार.
- प्रवराकाठची संस्कृती - नारायण गंधे, ज्ञानेश प्रकाशन, संगमनेर प्र. आ. १९८७.
- बोधपर लावण्या - पुरंदरे प्रकाशन.
- भक्तिमार्ग दर्शिका संपा. पु. सि. चितळे, महाजन वाडी सिताबर्डी नागपूर - आ. १. ४-४-१९५४.
- भारतीय संस्कृती कोश - संपा. महादेव शास्त्री जोशी खंड-८.
- मराठी कविता - प्राचीन कालखंड (इ.स. ११५० ते १८४०) संपा. वा. रा. ढवळे/व. दि. कुलकर्णी - मुंबई मराठी साहित्य संघ, प्र. आ. १९६९.
- मराठी काव्यसमीक्षा - वि. अ. कुलकर्णी - १९४५
- मराठी छंदोरचना लयदृष्ट्या पुनर्विचार - ना. ग. जोशी प्र. आ. १९५५
- मराठी तमाशा - उगम आणि वाटचाल - पंढरीनाथ धनाजी काळे
- मराठी पोवाडा - सूर्यकांत खांडेकर, कोल्हापूर (पी.एच.डी. प्रबंध) १९७०
- मऱ्हाटी लावणी - म. वा. धोंड - मौज प्रकाशन - प्र. आ. १९५६०
- मराठीची लोककला - तमाशा - नामदेव व्हटकर, चंद्रकांत शेट्ये प्रका. कोल्हापूर - प्र. आ. १९५९
- मराठी वाङ्मयकोश (प्राचीन खंड) अ. ना. देशपांडे नागपूर विद्यापीठ प्रकाशन, प्र. आ. १-५-१९७४
- मराठी वाङ्मयाचा अभ्यास - ह. ना. आपटे, आ. ४. १९६४ (ठाणे येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या १०व्या वार्षिक समारंभानिमित्त १८-६-१९०३ रोजी दिलेले व्याख्यान)
- मराठी वाङ्मयाचा इति. खंड ३ - म. सा. प. पुणे - सं. रा. श्री. जोग (इ. १६८०-१८००)
- मराठी वाङ्मयाचा परामर्श - गं. भा. निरंतर (आरंभ ते १८७०) व्हीनस प्रकाशन, पुणे.
- मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास - प्र. न. जोशी, नितीन प्रकाशन, प्र. आ. १५-८-७२
- मराठी वाङ्मयाचे स्वरूप - ह. श्री. शेणोलीकर प्र. आ. १९५६
- मराठी वाङ्मयाभिरूचीचे विहंगमावलोकन - रा. श्री. जोग, केळकर स्मारक व्याख्यानमाला पुणे विद्यापीठ प्रकाशन, व्याख्यान - ५वे.
- मराठी साहित्यातील मधुराभक्ती - प्र, न. जोशी व्हीनस प्रकाशन प्र. आ. १९५७.
- मराठी साहित्याची रूपरेषा - वि. पां. दांडेकर
- मराठी सत्तेचा विकास आणि ऱ्हास - सदाशिव आठवले / प्र. ल. सासवडकर
- मराठी साहित्याचे सिंहावलोकन - द. के. केळकर, मनोहर ग्रंथमाला प्रकरण शाहीरांचा सांगाती - १९६३
- मराठ्यांचा इतिहास - बा. सा. बारगळा प्र. कृ. ढवळे, विद्या प्रकाशन नागपूर प्र. आ. जुलै १९७७

अनुक्रम

- महाराष्ट्र जीवन - खंड-२ संपा. गं. बा. सरदार, जोशी लोखंडे प्रकाशन, आ. १. १९६०
- महाराष्ट्र दर्शन - गो. नी. दांडेकर, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई- द्वि. आ. एप्रिल १९६९
- महाराष्ट्र परिचय संपा. चिं. ग. कर्वे - स. आ. जोगळेकर, य. गो. जोशी, प्रसाद प्रकाशन - पुणे.
- महाराष्ट्र शारदेचे मानकरी, ह. भ. वाघोलीकर चित्रशाळा, आ. १. १९५०
- महाराष्ट्र संस्कृती - ह. श्री. शेणोलीकर / प्र. न. देशपांडे मोघे प्रकाशन, कोल्हापूर - प्र. मुद्रण १९७२
- महाराष्ट्र संस्कृतीचे तात्त्विक अधिष्ठान - द. ह. अग्निहोत्री - सुविचार प्रका. नागपूर/पुणे प्र. आ. १९७०
- माझे आवडते कवी - ग. त्र्यं. मांडखोलकर, नागपूर प्रकाशन, प्र. आ. जून- १९६५
- यशोदा पांडुरंगी - दादोबा पांडुरंग
- रामजोशी, अनंतफंदी, परशराम, होनाजी बाळ, सगनभाऊ व दुसरे अनेक - प्रकाशक - रा. श्री. गो. १८७०
- रामजोशीकृत लावण्या - प्रका. वि. वि. रा. १८८१
- रामजोशीकृत लावण्या - संपा. शं. ना. मुजुमदार, बा. म. जिंतीकर प्रकाशन, पुणे-१९५५
- लागे शाहिरी गर्जाया - रामचंद्र देखणे पद्मगंधा प्रकाशन, पुणे प्र. आ. मार्च ९२
- लावण्या लेखक रामजोशी - १८५९
- लावण्या भा. २रा. ले. रामजोशी - १८८९
- लावण्या भाग ३रा ले. रामजोशी १८७७, प्रका. शं. तु. शाळीग्राम
- लोकनाट्याची परंपरा - वि. कृ. जोशी ठोकळ प्रका. पुणे १९६१
- वाल्मिकी रामायणाचे छंदोबद्ध मराठी अवतार शैलजा करंदीकर (इ. १८१८ पर्यंत) पी. एच. डी. प्रबंध - मुंबई विद्या. १९५९
- वाङ्मय व लेखन परिचय - ग. ह. पाटील, गं. भा. निरंतर, प्र. आ. १९५८ - प्र. ६
- वऱ्हाडी लोकगीते - संग्राहक - पां. श्री. गोरे, शारदाश्रम ग्रंथमाला-पुष्प-१७, यवतमाळ - १९४२
- व्यक्ती और वाङ्मय - प्रभाकर माचवे साहनी प्रकाशन, दिल्लीण १९६२ (हिन्दी)
- विश्वकोश - संपा. लक्ष्मणशास्त्री खंड -१४
- शक्तिसौष्ठाव - द. ग. गोडसे - पॉप्युलर प्रकाशन, मुंबई - प्र. आ. जून १९७२
- शिवकालातील व पेशवाईतील स्त्री जीवन शारदा देशमुख, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे - आ. १. १९७३
- श्री देवनाथ महाराजांची कविता - वैदर्भ काव्यसंग्रह गुच्छ-२रा. संपा. अ. सि. साठी, आर्यभूषण, पुणे - १९१५
- साहित्यधारा - श्री. म. माटे मुद्रक - ल. स. केळकर, पुणे प्र. आ. २६/१०४३
- साहित्य विवेचन, ना. ग. जोशी, व्हीनस प्रकाशन, प्र. आ. १९६८
- साहित्यसाधना, मा. का. देशपांडे, कॉन्टिनेटल प्रकाशन, १९६१ प्रकरण-४, काही काव्यप्रकार
- साहित्यातील अश्लील आणि ग्राम्य. रा. शं. वाळिंबे सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे-नागपूर - प्र. आ. जाने. १९७०
- संगीत शास्त्रकार व कलावंत यांचा इतिहास ल. द. जोशी, पुणे जून - १९३५
- सुलभ विश्वकोश - संपा. य. रा. दाते, चिं. ग. कर्वे
- हिन्दी और मराठी का रीति श्रृंगार (शोधप्रबंध) (हिन्दी) इन्द्रराव पवार, ज्ञानविज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद २-१०-१९६६.

❏

अनुक्रम

❑ शाहीर रामजोशी यांच्या लावणी व पोवड्यांची आकारविल्ह्यानुसार सूची

❑ ❑

अनुक्रम

(अ)
अगे सखे यशोदेबाई
अमोल काया जाईल वाया ✹
अयि अयि भज मानव
अरे काही बोल
अरे मुखरसा रसाते
अरे सख्या समजधर काही
अशि कशिरे तुझी होरी
अहा या हरिने
अहो सख्या जीवलगा
आता काय आम्ही
❑ ❑

(उ)
उगा भ्रमसी वाऊगा
उद्धवजी मधुवनी
❑ ❑

(ऐ)
ऐक सखे गडणी ○
ऐक सज्जना अरे मनमोहना ✹
❑ ❑

✹ (रामजोशींची नाममुद्रा नसलेली रचना)
○ (धोंडी शाहीराने गायलेली रचना)

(क)
करू तरी काय गे सईबाई
कसे करू एकांतीची
का मजसी अबोला धरूनी
काय म्हणूनी झटशील
काय म्हणावे मुलगा दिसतो
कारटा तुझा हा द्वाड
कारे मनी माधवाचे चरण धरा ना
कारे हे कळेजा
काही नाही लाज पोटी

अनुक्रम

काही लाज यशोदेच्या पोरारे
कांताला एकांती पाहु गे
किती गोड किती गोड
कुठवर हा भव पुरे पुरे
कुंजात मधुप गुंजारव
कुंजात वाजवी वेणू
कुंदरदन तनु श्याम
कृष्ण जन्म आनंद वाटतो (पोवाडा पेशव्यांच्या शुक्रवार वाड्याचा)
कैसा निपटपटु जाहलासि कान्ह्या रे
कोणाची रमा हे मानवा ✹
कोण्या ग सुभगाची
❑ ❑

(ख)
खोडा हा संसार जनाचा
❑ ❑

(घ)
घडिभर तरी सदनासी येऊन जा
घडिभर या हो माझ्या घरासी राया
❑ ❑

(च)
चैन पडेना कसे करू
❑ ❑

(ज)
जाऊ नकारे विषयाट विची ✹
जा गडे त्याला तू द्याल माझी आण
❑ ❑

(झ)
झाला पहाहो मानव की
झाली तरुणपणाती धूळ ○
❑ ❑

अनुक्रम

(त)
तनु दारोदार भरणाच्या भरी गेली
तरुणि तवेयं (सं) ✹
त्या रामाला पायावर अबला न्हाणी
तुम्ही सजना-सुजना
❑❑

(द)
दाट साधुचा हाट
दीनानाथ द्वारकाधीश ✹
दूर होय कान्हा
दैवे ही गाठ बयाबाईची
दो दिवसाची तनु हे साची
❑❑

(ध)
धरि हरिचरण तरि तरि
धाव गणपते सदनी
धीर धरी नंदाच्या पोरा रे
❑❑

(न)
नका हरि हा दंगा करू
नरजन्मामधि जरा
नरदेहामधि येऊन गड्या
निजरे बाळा घननीळा *
निजवदनी या गजवदनाचे
नंदकिशोराची होरि जळो
नंदात्मज मदंमदं मा याहि
❑❑

(प)
पहा विचारूनी सारा सार ✹
पळु नको थांब रे गवळिया
पाहि पाहि निजभवनं प्रति ✹ (मराठी, संस्कृत, कानडी हिंदी रचना)
पाहून सख्या मी भुललो ○

अनुक्रम

प्राकृत म्हणती बाबासाहेब बाजीराव पेशव्या
❑ ❑

(ब)
बा काय घालसिल संसृतीचा पिंगा
बाई नको जाऊ यमुनातीरी ✹
बाई नंदाचा मुल पहा
बाई नंदाचा मुल माझ्या डाई हो
बाई यशोदे बाळ तुझा तान्हा
बापा अति हितकर गुरूशी भजावे
बोलु तरी काय रे सावळिया मी
ब्राह्मणी राज्य जोरदार (पोवाडा पुणे वर्णनपर)
❑ ❑

(भ)
भज भज भवजलाधिमाजि
भला जन्म हा तुला लाभला
भीमक बाला म्हणे नृपाळा *
भूतळात जशि या स्थळात
❑ ❑

(म) महाराज गवरीनंदना
मज वाटे हरिसी आज होरी बाई खेळावी
मनुजा सुखदायक हरिला गावे
मायबापाच्या श्रीकृष्णाचा विचार (पोवाडा सुभद्रेचा)
मी सांगू चुकते कान्हा ✹
मूल तुझा अति अनिवार
मंदा किति करशिल हा घरधंदा
म्हणे रूक्मिणी ✹
मृगजळवत जग उद्‌भवले हे
❑ ❑

(य)
यशोदे बाई मूल तुझा अनिवाळ
या नंदनंदने फटफट मन विटविले
या प्रपंची सौख्य तुला काय रे

अनुक्रम

या भवात सुख पाहसी हे काय
या मदने मज गांजियेले
या हरिसाठी मी जाहले पहा वेडी
येऊनिया नरजन्माशी
यंदा घर धन्याने
❑ ❑

(र)
रघुवीर माझा जोडा हो
राधा धरि संवादे छेकापन्हुनी
राधा मुखरमण गोविंदा
राधिका रमण गोविंदा
रूसु नये कामिनी
रंग सावळा गडे
❑ ❑

(ल)
लाजुनिया न परतला
❑ ❑

(व)
वदनी श्री विघ्नविनायक
वंदे श्री गजमुख
व्यासभारती कथन
❑ ❑

(श)
शेषाचलकृत निवास हानत
❑ ❑

(श्र) श्रीनाथ सद्‌गुरूपदा ✹
श्रीरंग गोपिकोत्संग
श्रीरंग कमलाकांता
श्री सांबाच्या समान दैवत ✹
❑ ❑

(स)
सती सुमती गुणवती ✹
साजणी समयिं घरधणी
सुभग सखीयं नितांत ✹
सुंदरा मनामधिं भरली
सैरंध्रीशी कीचक वांछी ✹
सोड सोड पदर मुलगीचा
संत थोडे थोडे थोडे
संसार कुणाचा गड्या
❑ ❑

(ह) हरिच्या पायी गड्या
हरिपद वंदा मग धंदा दुजा गोड रे
हरि मथुरेला अजि कां गडे जातो
हरिवांचून संसार कशाचा
हरिवाचुनि नेला बाई
हा हार माझ्या ख्याली कां पडला
❑ ❑

(क्ष)
क्षणभरी गारे कोणी
क्षणभरी चाल माझ्या सदनाशी
क्षमातळी इजसमान नाही
❑ ❑

❑ **अभ्यासग्रंथ ❑**


❑ अनेक कविकृत पदे, कटाव, लावण्या भाग १ ते ३ संपा. वा. दा. ओक १९०७, १९११, १९१७

❑ अंधारातील लावण्या, य. न. केळकर प्रकाशक ग. ठ. ठोकळ, पुणे १९५६

❑ ऐतिहासिक पोवाडे, भाग १ ते ३, य. न. केळकर

❑ ऐतिहासिक व इतर पोवाड्याचा संग्रह, गो. ब. शितूत, कोल्हापूर १९०३.

❑ कविचरित्र, भाग २ द. अ. आपटे

❑ नाचू कीर्तनाचे रंगी, यशवंत पाठक, कॉन्टिनेण्टल, पुणे आ. १/१९८०

❑ पैंजण, म. ना. अदवंत

❑ प्राचीन गीत भांडार, संपा. ना. ग. जोशी मौज प्रकाशन.

❑ मराठी आध्यात्मिक शाहिरी - परंपरा व वाङ्मय (प्रबंध) प्रा. शिवाजी रामचंद्र चव्हाण वाई.

❑ मराठी कवितेचा उषःकाल, श्री. म. वर्दे

❑ मराठी तमाशा - उगम आणि वाटचाल, पंढरीनाथ धनाजी काळे लोककला प्रतिष्ठान, पुणे आ. १/१९९५

❑ मराठी लावणी वाङ्मय, गंगाधर मोरजे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे आ.१/१९७४

❑ मऱ्हाटी लावणी, म. वा. धोंड मौज प्रकाशन, आ.१/१९५६

❑ महाराष्ट्र कविचरित्र, ज. र. आजगावकर भाग १ ते ६

❑ महाराष्ट्र सारस्वत, वि. ल. भावे

❑ रागदारीच्या तालासुरावरील बैठकीच्या सुरस लावण्या. ह. म. थळकर १८९५

❑ रामजोशीकृत लावण्या, भाग १ व २ रा. श्री. गोंधळेकर आ.१/१८८९, आ.२/१८९५

❑ रामजोशीकृत लावण्या, शं. तु. शाळिग्राम १९०८


❑ रामजोशी यांच्या सुरस लावण्या, र. कृ. मुळे

❑ पुरंदरे आणि कंपनी १९०९

❑ रामजोशीकृत लावण्या, संपा. वि. म. कुलकर्णी/गंगाधर मोरजे पद्मगंधा प्रकाशन आ.५/१९९८

❑ लावण्या भाग-१ रा. ब. कापडी १७७६

❑ लावण्या रागदारीच्या आणि साध्या, वि. स. अग्निहोत्री १८५३



**शिरीष श्रीकृष्ण गंधे**

- जन्म : ३-१-१९५६
- शिक्षण : एम. ए. बी. एड.
- कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, लासलगाव येथे मराठीचे अध्यापक
- महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रे, नियतकालिके यामधून लेख, कविता, हास्यचित्रे प्रकाशित
- आई शक्ती देवता या मराठी चित्रपटात धनगराची भूमिका
- प्रकाशित ग्रंथ

  १) ज्ञानदेवांचे सप्तरंग, ऋचा प्रकाशन, नागपूर
  २) स्वाध्यायाची सत्त्वधारा, ग्रंथाली, मुंबई
  ३) ऐसा भक्तराज निका, अक्षरमुद्रा प्रकाशन, नाशिक (संत नामदेव चरित्र, वाङ्मय)
  ४) फुलांची शाळा (संपादन) अनिष प्रकाशन, लासलगाव
- आगामी

  १) बोलिलो मराठी (संपादन)
  २) पुत्रपयोधरेचा (कादंबरी)
  ३) शाहीर अनंतफंदी चरित्र, वाङ्मय
  ४) वाती सांजफुलांच्या (ललित)
  ५) ज्ञानदेवपासष्टी (संपादन)
  ६) ज्ञानोपासकांच्या गोष्टी (कुमारांसाठी)
  ७) कै. श्रीकृष्ण गंधे यांचे बालसाहित्य एक समालोचन (समीक्षा)
- सदस्य

  १) अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ, कोल्हापूर.
  २) स्पीक मॅके, नवी दिल्ली
- संतसाहित्य, कार्य या विषयावर महाराष्ट्रात शंभरहून अधिक व्याख्याने

अनुक्रम